**दिनांक ३०/०१/२०२३ रोजी मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समितीच्या (DCZMA) आयोजित केलेल्या सभेचे इतिवृत्त**

---

सदर सभेस खालीलप्रमाणे समितीमधील अध्यक्ष व इतर सदस्य असलेले अधिकारी/ कर्मचारी प्रत्यक्ष/वेबेक्स व्ही.सी. द्वारे उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | निवासी उपजिल्हाधिकारी | सदस्य सचिव |
| 3. | जिल्हा पोलीस अधिक्षक, रत्नागिरी | सदस्य |
| ४. | प्रतिनिधी जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख रत्नागिरी | सदस्य |
| ५. | प्रतिनिधी सहाय्यक संचालक, नगर रचना रत्नागिरी | सदस्य |
| ६. | उपविभागीय अधिकारी रत्नागिरी | सदस्य |
| ७. | प्रतिनिधी उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी | सदस्य |
| ८. | प्रतिनिधी उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण | सदस्य |

तसेच वरील समिती सदस्यां व्यतिरीक्त अन्य संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना बैठकीस उपस्थित रहाणेबाबत कळविणेत आलेमुळे खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी हे प्रत्यक्ष/वेबेक्स व्ही.सी. द्वारे बैठकीस उपस्थित राहिलेले आहेत.

१. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ रत्नागिरी

---

सदस्य सचिव, जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समिती, तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

**1. मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांनी केलेल्या बांधकामावर कारवाई करणेबाबत –**

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांनी केलेल्या बांधकामावर कारवाई करणेबाबत मा. MoEF&CC, नवी दिल्ली यांनी निर्गमीत केलेले दिनांक 22/08/2022 रोजीचे निर्देश या कार्यालयाकडे मा. अवर सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडून दिनांक 25/08/2022 रोजीचे पत्रान्वये प्राप्त झाले आहेत.

सदर पत्राचे अनुषंगाने दिनांक 29/08/2022, 26/09/2022, 17/10/2022, 14/11/2022 व दिनांक 05/12/2022 रोजी जिल्हास्तरीय सागरी किनारा व्यवस्थापन समिती (DCZMA) च्या बैठकीमध्ये समितीचे मान्यतेने निर्णय घेण्यात आले असून संबंधीत सर्व अधिकारी/यंत्रणा यांना कार्यवाही करणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

**a) मा. एमसीझेडएमए, मुंबई यांजकडील दिनांक 12/10/2022 रोजीचे पत्राबाबत –**

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट चे बांधकामावर कारवाई करणेबाबत मा. एमसीझेडएमए, मंत्रालय, मुंबई यांचे दिनांक 12/10/2022 रोजीचे निर्देश या कार्यालयास प्राप्त झाले आहेत.

सदर पत्रामध्ये पुढील बाबी नमुद करण्यात आल्या आहेत.

i) पर्यावरण विभागाकडे अंदाजपत्रक मंजूर करण्याचे कोणतेही आदेश नाहीत. त्याबाबतची आवश्यक मान्यता सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्राप्त केली जाईल.

ii) 12 सप्टेंबर 2022 रोजी झालेल्या MCZMA च्या 160 व्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार, MOEFCC च्या दिनांक 22.08.2022 च्या आदेशाच्या अंमलबजावणीनंतर, प्रकल्प प्रस्तावकांकडून सदर रक्कम वसूल करून MCZMA कडे जमा करावी असे निर्देश आहेत.

त्याप्रमाणे सामाजिक वनीकरण विभाग यांचेकडील दिनांक 21/11/2022 रोजीच्या अहवालानुसार साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांना वसुलपात्र रक्कम उपविभागीय अधिकारी, दापोली यांचेमार्फत कळविणेत आलेली आहे.

## b) कार्यारंभ आदेशानुसार बांधकाम निष्कासनाबाबत –

सी कौंच रिसॉर्टचे बांधकाम निष्कासन करणेबाबत मे. यश कन्स्ट्रक्शन प्रोप्रा. नंदकुमार सी. म्हात्रे, तळोजा यांना कार्यारंभ आदेश सार्वजनिक बांधकाम विभाग, चिपळूण यांचेमार्फत दिनांक 21/11/2022 रोजीचे पत्रान्वये देणेत आले होते. त्याप्रमाणे सी कौंच रिसॉर्टचे बांधकाम पुर्णपणे पाडण्यात आले असून सदर मलब्याची विल्हेवाट मौजे वाघवे, ता. दापोली येथे अधिकृत ठिकाणी लावण्यात आली असलेबाबत उपप्रादेशिक अधिकारी, प्रदुषण नियंत्रण मंडळ चिपळूण यांनी दिनांक 27/01/2023 रोजीचे ई-मेल संदेशान्वये कळविले आहे. तरी सी कौंच रिसॉर्टचे बांधकाम पुर्णपणे निष्कासीत झालेबाबतचा अहवाल उपप्रादेशिक अधिकारी, प्रदुषण नियंत्रण मंडळ चिपळूण व उपविभागीय अधिकारी, दापोली यांनी स्थळपहाणीसह या कार्यालयाकडे सादर करावा.

तसेच साई रिसॉर्ट एनएक्सचे बांधकाम निष्कासन करणेबाबत संबंधित प्रकल्प प्रस्तावकास अंदाजित रक्कम कळविणेत आलेनंतर व मा. दिवाणी न्यायालय, खेड यांचे न्यायालयात दाखल दावा क्र. 57/2021 मध्ये निशाणी 6-तुर्तातुर्त ताकिदीच्या अर्जाच्या अनुषंगाने जैसे-थे चा पारित केलेला दिनांक 19/07/2021 रोजीचा आदेश रद्द झालेनंतर साई रिसॉर्ट एनएक्सचे बांधकाम निष्कासन करणेसाठी मे. यश कन्स्ट्रक्शन प्रोप्रा. नंदकुमार सी. म्हात्रे, तळोजा यांना कार्यारंभ आदेश देणेबाबत कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग चिपळूण यांना या कार्यालयाकडील दिनांक 21/11/2022 रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले आहे.

## c) पर्यावरणीय नुकसान भरपाईबाबत –

सी कौंच रिसॉर्ट व साई रिसॉर्ट एनएक्स यांजकडून पर्यावरणीय नुकसान भरपाई (Environmental Compensation) वसूल करणेबाबत यापुर्वीच्या दिनांक 05/12/2022 रोजीच्या जिल्हास्तरीय सागरी किनारा व्यवस्थापन समितीच्या बैठकीमध्ये महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळानेच वसुलीबाबत नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी असे निर्देश देण्यात आले होते. त्याप्रमाणे उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांना दिनांक 08/12/2022 रोजीचे पत्रान्वये लेखी निर्देश देण्यात आले आहेत.

प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर यांनी दिनांक 16/12/2022 रोजीचे आदेशान्वये पर्यावरणीय नुकसान भरपाईची रक्कम जमीन महसूल वसूली म्हणून वसूल करणेबाबत कळविले होते. त्यानुषंगाने दिनांक 28/12/2022 रोजीचे पत्रान्वये महसूल वसूली प्रमाणपत्र सक्षम प्राधिकारी यांच्या सही व शिक्क्यानिशी थकबाकीदार यांचे स्थावर व जंगम मालमत्तेच्या तपशीलासह सादर करणेबाबत प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर यांना कळविण्यात आले आहे.

## d) Provisional Attachment Order - 7/2023 issued by Directorate of Enforcement

### i) 7/12 सदरी उक्त आदेशाची नोंद घेणेबाबत –

मा. Directorate of Enforcement, Mumbai यांनी मौजे मुरुड, ता. दापोली येथील गट क्र. 446 मधील श्री. सदानंद गंगाराम कदम यांचे नांवे असलेल्या Schedule-I मधील मालमत्तेबाबत दिनांक 04/01/2023 च्या आदेशापासून पुढे 180 दिवस किंवा पुढील आदेश होईपर्यंत हस्तांतरित करु नये, तिची कोणत्याही प्रकारे विल्हेवाट लावू नये किंवा सदर मालमत्तेबाबत कोणत्याही प्रकारचा व्यवहार करण्यात येवू नये असे निर्देश Provisional Attachement Order - 07/2023 अन्वये प्राप्त झाले आहेत.

मा. Directorate of Enforcement, Mumbai यांजकडील दिनांक 04/01/2023 रोजीच्या आदेशाची नोंद 7/12 सदरी घेणेबाबत तहसीलदार दापोली यांना दिनांक 18/01/2023 रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले होते. त्याप्रमाणे मा. Directorate of Enforcement, Mumbai यांजकडील दिनांक 04/01/2023 रोजीच्या आदेशाची नोंद 7/12 सदरी घेणेत आलेबाबत तहसीलदार दापोली यांजकडील दिनांक 24/01/2023 रोजीचा अहवाल उपविभागीय अधिकारी, दापोली यांजकडील दिनांक 25/01/2023 चे पत्रान्वये या कार्यालयाकडे प्राप्त झाला आहे.

**ii) Provisional Attachment Order 7/2023 अंमलात असताना मा. MoEF&CC, नवी दिल्ली यांजकडील दिनांक 22/08/2022 रोजीचे निर्देशांनुसार कार्यवाही करणेबाबत –**

मा. Directorate of Enforcement, Mumbai यांनी मौजे मुरुड, ता. दापोली येथील गट क्र. 446 मधील श्री. सदानंद गंगाराम कदम यांचे नांवे असलेल्या Schedule-I मधील मालमत्तेबाबत दिनांक 04/01/2023 च्या आदेशापासून पुढे 180 दिवस किंवा पुढील आदेश होईपर्यंत हस्तांतरित करु नये, तिची कोणत्याही प्रकारे विल्हेवाट लावू नये किंवा सदर मालमत्तेबाबत कोणत्याही प्रकारचा व्यवहार करण्यात येवू नये असे निर्देश Provisional Attachement Order - 07/2023 अन्वये प्राप्त झाले आहेत.

तथापि मौजे मुरुड, ता. दापोली येथील गट क्र. 446 मधील सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांनी केलेल्या बांधकामावर कारवाई करणेबाबत मा. MoEF&CC, नवी दिल्ली यांजकडील दिनांक 22/08/2022 रोजीचे निर्देश प्राप्त आहेत. प्रस्तुत प्रकरणी मा. दिवाणी न्यायालय खेड येथे दाखल दावा रेदिमु क्र. 57/2021 मधील आदेशास अधीन राहुन उक्त मिळकतीमधील साई रिसॉर्ट एनएक्स चे बांधकाम निष्कासन करणेची पुढील कार्यवाही या कार्यालयामार्फत प्रस्तावित आहे. मा. दिवाणी न्यायालय खेड येथे दाखल दावा क्र रेदिमु क्र. 57/2021 मध्ये निशाणी 6-तुर्तातुर्त ताकीद अर्जावरील निर्णयाकरीता पुढील सुनावणीची तारीख दिनांक 03/02/2023 रोजी नेमणेत आली आहे.

मा. दिवाणी न्यायालय खेड येथे दाखल दावा रेदिमु क्र. 57/2021 मधील आदेशास अधीन राहुन बांधकाम निष्कासीत करणेची कार्यवाही करणे क्रमप्राप्त झाल्यास त्यास मा. Directorate of Enforcement, Mumbai यांजकडील दिनांक 04/01/2023 मधील आदेशाची बाधा निर्माण होवुन आदेशाचा भंग होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सदर वस्तुस्थितीबाबत मा. Directorate of Enforcement, Mumbai यांना या कार्यालयाकडील दिनांक 20/01/2023 रोजीचे पत्रान्वये अवगत करण्यात आले आहे.

**e) न्यायालयीन बाबींबाबत कार्यवाही –**

i) श्री. सदानंद गंगाराम कदम यांनी मा. दिवाणी न्यायालय खेड येथे दावा क्र. 57/2021 दिनांक 01/07/2021 अन्वये दाखल केला. मा. दिवाणी न्यायालय, खेड यांनी दिनांक 19/07/2021 रोजीच्या आदेशान्वये प्रस्तुत दाव्यामध्ये जैसे-थे चे आदेश पारित केले आहेत. सदर दावा प्रकरणी मा. शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडील प्राप्त निर्देश व कायदेशीर बाबींबाबत मार्गदर्शन पुढीलप्रमाणे आहे –

- **मा. शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडील दिनांक 24/01/2023 रोजीचे पत्र-**

मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, खेड यांचे न्यायालयात दाखल दावा क्र. रेमुनं. 57/2021 मध्ये मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, खेड यांनी दिनांक 11/10/2022 व दिनांक 13/12/2022 रोजी पारित केलेल्या सुनावणी आदेशांवर मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे अपिल दाखल करणे आवश्यक असून दावा क्र. रेमुनं. 57/2021 चे प्रकरणी खेड न्यायालयात अन्य सरकारी वकीलांची नेमणूक तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे फेरतपासणी अपिल दाखल करणेकामी सरकारी वकीलांची नियुक्ती मा. शासनामार्फत होवुन मिळणेबाबत मा. शासन, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे या कार्यालयाकडून दिनांक 15/12/2022 रोजीचे पत्रान्वये प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

या कार्यालयाकडील दिनांक 15/12/2022 चे प्रस्तावाचे अनुषंगाने मा. शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक 24/01/2023 रोजीचे पत्रान्वये "जिल्हा सरकारी वकील, खेड जिल्हा व सत्र न्यायालय, ता. खेड यांना मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, खेड यांजकडील दिनांक 11/10/2022 व दिनांक 13/12/2022 रोजी पारित केलेल्या सुनावणी आदेशांविरुध्द अपिल दाखल करणेबाबत योग्य ती कार्यवाही करणेचे निर्देश दिलेले आहेत. तसेच उक्त दावा प्रकरणी सरकारी वकीलांच्या नियुक्ती संदर्भात जिल्हा सरकारी वकील, रत्नागिरी यांना प्रतिवादी पक्षाचे प्रतिनिधित्व करण्याची विनंती करता येवु शकेल", असे उपसचिव, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई यांना कळविले आहे.

त्यानुषंगाने मा. शासन, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक 27/01/2023 रोजीचे पत्रान्वये " मा. सरकारी वकील, खेड जिल्हा व सत्र न्यायालय, खेड यांना दिनांक 11/10/2022 व दिनांक 13/12/2022 चे आदेशाविरुध्द जिल्हा सत्र न्यायालय, खेड येथे फेरतपासणी अपील दाखल करणेकामी सूचित करण्यात आले आहे. त्याप्रमाणे आवश्यक ती कागदपत्रे पुरविण्याची उचित कार्यवाही करावी", असे निर्देश या कार्यालयास दिलेले आहेत.

सदर दावा प्रकरणी मा. शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडील दिनांक 24/01/2023 रोजीच्या पत्रात नमुद केलेप्रमाणे मा. दिवाणी न्यायालय, (व- स्तर) खेड यांचे न्यायालयात दिनांक 03/02/2023 रोजीचे सुनावणीपासुन उपस्थित राहणेबाबत तसेच मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, खेड यांनी दिनांक 11/10/2022 व दिनांक 13/12/2022 रोजी पारित केलेल्या सुनावणी आदेशांवर अपिल/फेरतपासणी अपिल दाखल करणेबाबत पुढील योग्य ती कार्यवाही करणेबाबत प्रभारी जिल्हा

सरकारी वकील, रत्नागिरी यांना या कार्यालयाकडील दिनांक 27/01/2023 रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले आहे. तसेच रेमुनं. 57/2021 या दाव्याचे कामी प्रभारी जिल्हा सरकारी वकील, रत्नागिरी व सहा. सरकारी वकील, खेड जिल्हा व सत्र न्यायालय, खेड यांचेशी संपर्क साधून आवश्यक माहिती व कागदपत्रे तात्काळ पुरविणेची कार्यवाही करणेबाबत उपविभागीय अधिकारी, दापोली यांना दिनांक 27/01/2023 रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले आहे.

दावा क्र. रेमुनं. 57/2021 चे प्रकरणी सुनावणीची पुढील तारीख दिनांक 03/02/2023 रोजी असून निशाणी 6-तुर्तातुर्त ताकीद अर्जावरील निर्णयाकरीता ठेवणेत आली आहे. उपविभागीय अधिकारी, दापोली यांनी दिनांक 27/01/2023 रोजीचे पत्रान्वये कळविले प्रमाणे तात्काळ कार्यवाही करुन अनुपालन या कार्यालयाकडे सादर करावा असे निर्देश अध्यक्ष यांनी दिले.

- **<u>मा. शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडील कायदेशीर बाबींबाबत मार्गदर्शन-</u>**

मौजे मुरुड ता. दापोली येथील गट क्र. 446 मधील बांधकाम प्रकरणी न्यायालयीन बाबींमधील वस्तुस्थिती व मा. दिवाणी न्यायालय, खेड येथे रे.दि.मु.नंबर 57/2021 हा सुनावणीवर प्रलंबित असताना व जैसे-थे चे आदेश मा. न्यायालयाने पारित केलेले असताना मा. MoEF&CC, नवी दिल्ली यांजकडील दिनांक 22/08/2022 रोजीचे निर्देशाप्रमाणे कारवाई करणे संयुक्तीक होईल अगर कसे? याबाबत या कार्यालयास कायदेशीर बाबींचे दृष्टीने मार्गदर्शन मिळणेचा प्रस्ताव अभिप्रायासह मा. शासन, विधी व न्याय विभागाकडे सादर करणेबाबत मा. संचालक, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे दिनांक 14/11/2022 रोजीचे पत्रान्वये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावाचे अनुषंगाने मा. एमसीझेडएमए, मुंबई यांजकडील दिनांक 24/01/2023 रोजीचे पत्रान्वये मा. शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे मार्गदर्शन प्राप्त झाले त्यामध्ये पुढीलप्रमाणे नमुद केले आहे-

> 8. In view of this legal position, even for the sake of argument it is presumed that the order passed by Ld. CJSD, Khed is not in accordance with law and is void, in view of the aforesaid legal position, unless the order is declared void by a competent court, it is not permissible to ignore the same.
> 9. Therefore, if the Department feels that the order of CJSD, Khed is not in consonance with the provisions under the Environment (Protection) Act, it may file appropriate proceedings before the competent Court for getting the status-quo order dated 19.07.2021 vacated.

वरील मार्गदर्शनाचे अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, दापोली यांनी प्रभारी सरकारी वकील, रत्नागिरी यांचेशी संपर्क साधून उक्त दावा रेदिमु क्र. 57/2021 मध्ये पारित केलेला जैसे-थे चा आदेश रद्दबातल करणेकामी आवश्यक ती कार्यवाही करावी. असे निर्देश अध्यक्ष यांनी दिले.

ii) श्री. किरीट सोमय्या यांनी मौजे मुरुड, ता.दापोली येथील गट.नं 446 मधील बांधकामाबाबत 58/2021 अन्वये मा. राष्ट्रीय हरित लवाद वेस्टर्न झोन बेंच पुणे येथे दावा दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये उपविभागीय अधिकारी, दापोली यांचेमार्फत प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले आहे. सदर दाव्याची सुनावणी दिनांक 13/03/2023 रोजी निश्चित करण्यात आलेली आहे.

iii) मा. पर्यावरण, वन आणि जलवायू परिवर्तन मंत्रालय, एकात्मिक प्रादेशिक कार्यालय, नागपुर द्वारा श्री. सुरेशकुमार अडप्पा, शास्त्रज्ञ-डी यांनी मा. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, खेड यांचे न्यायालयात 1. श्री. अनिल दत्तात्रय परब, 2. साई रिसॉर्ट एनएक्स 3. सी कौंच रिसॉर्ट यांचे विरुध्द पर्यावरण (संरक्षण) कायदा अधिनियम 1986 मधील कलम 19 व 15 चे 7 अन्वये रेग्युलर क्रिमीनल केस नंबर 12/2022 अन्वये दावा दाखल केलेला आहे. सदर दावा आज मितीस न्यायप्रविष्ठ असुन पर्यावरण संरक्षण कायदा 1986 चे कलम 5 व 7 सह कलम 15 अंतर्गत शिक्षापात्र गुन्हयासाठी आरोपींविरुध्द समन्स काढणेबाबत आदेश करण्यात आला असुन, सदर दाव्यामध्ये दिनांक 23/02/2023 रोजी सुनावणी निश्चित करण्यात आलेली आहे.

iv) मौजे मुरुड, ता. दापोली येथील सर्व्हे नं. 446 मधील साई रिसॉर्ट एनएक्स या रिसॉर्टचे सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत बांधकाम निष्कासीत करण्याबाबत सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल, मुंबई यांचेकडील दिनांक 31/01/2022 चे ज्ञापन व अंमलबजावणी पत्र दिनांक 22/08/2022 व उपविभागीय अधिकारी, दापोली यांचेकडील दिनांक 25/08/2022 चे पत्र रदद करण्याबाबत श्री. सदानंद गंगाराम कदम यांनी भारत सरकार व इतर यांचेविरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे Writ Petition No.11 .25/2022 दाखल केले आहे. सदर दाव्यामध्ये अन्य बेंचकडे दावा वर्ग करणेवर प्रलंबित आहे.

v) मौजे मुरुड, ता. दापोली येथील सर्व्हे नं. 446 मधील साई रिसॉर्ट एनएक्स चे बांधकाम पुर्ण नसताना कर आकारणी करणेसाठी श्री. अनिल दत्तात्रय परब यांनी अर्ज करुन शासनाची फसवणुक केलेमुळे गटविकास अधिकारी, पंचायत समिती दापोली यांनी श्री. अनिल दत्तात्रय परब व. 3 यांचेविरुध्द प्रथम खबर क्र. 0406 दिनांक 07/11/2022 अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

vi) मौजे मुरूड, ता. दापोली येथील गट नं. 446 या मिळकतीमधील सी कौंच रिसॉर्टचे अनधिकृत बांधकाम केलेमुळे श्री. पुष्कर श्रीकृष्ण मुळे यांचेविरुध्द पोलीस ठाणे दापोली येथे गुन्हा प्रथम खबर क्रमांक 0043 दिनांक - 08.03.2022 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच मौजे मुरूड, ता. दापोली येथील गट नं. 446 या मिळकतीमधील साई रिसॉर्ट एनएक्स चे बांधकामाबाबत जमीन मालक श्री. सदानंद गंगाराम कदम यांचेवर मंडळ अधिकारी बुरोंडी यांचेमार्फत दापोली पोलीस ठाणे येथे गुन्हा प्रथम खबर क्र. 0178 दिनांक 14/11/2022 नुसार एफआयआर दाखल करण्यात आला आहे.

**2. मौजे मुरुड, ता. दापोली येथील समुद्र किना-यावरील साई रिसॉर्ट एनएक्स/ सी कौंच रिसॉर्ट यांनी सरकारी जमिनीवर अतिक्रमण करुन बांधकाम केलेबाबत व भूमिगत ड्रेनेज पाईपलाईन बाबत-डॉ. किरीट सोमैया यांचा तक्रारी अर्ज**

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 लगत पश्चिम दिशेच्या समुद्रावरील वाळूवर केलेले अतिक्रमण म.ज.म.अ.1966 चे कलम 50(3) व कलम 53 नुसार दिलेल्या नोटीसप्रमाणे संबंधितांनी शासकीय जमिनीवरील अतिक्रमण हे मुदतीत काढून टाकलेले आहे. तसेच उक्त निष्कासनामुळे तयार झालेला मलबा स्वखर्चाने, निसर्गास प्रदुषणदृष्टया (पाणी, हवा इ.) कोणतीही बाधा/हानी पोहोचणार नाही व निसर्गाचा समतोल राखुन पर्यावरण पुरक पध्दतीने (Eco-Friendly) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांचे मार्गदर्शनानुसार विल्हेवाटीसाठी मौजे वाघवे, ता. दापोली येथील स.नं. 25 हि.नं. 10/3 मध्ये टाकणेत आला आहे, असे उपविभागीय अधिकारी दापोली यांनी दिनांक 03/01/2023 रोजीचे पत्रान्वये अहवाल सादर केला आहे.

उपविभागीय अधिकारी, दापोली यांनी उक्त दिनांक 03/01/2023 रोजीचे पत्रान्वये उक्त प्रकरणामध्ये पर्यावरण (संरक्षण आणि संवर्धन) अधिनियम 1986 चे कलम 15(1) प्रमाणे फिर्याद दाखल करावी अगर कसे? याबाबत मा. शासन विधी व न्याय विभागाचे अभिप्राय/मार्गदर्शन मिळणेबाबत या कार्यालयास विनंती केली आहे.

मौजे मुरुड, ता. दापोली येथील गट नं. 446 च्या बाहेरील अतिक्रमण करण्यात आलेली शासकीय जमीन ही गाळाने तयार झालेली किना-यालगतची जमीन (Foreshore Land) आहे. सबब सीआझेड तरतूदींचे अनुषंगाने प्रशासकीय विभाग म्हणुन पर्यावरण (संरक्षण आणि संवर्धन) अधिनियम 1986 चे कलम 15(1) प्रमाणे फिर्याद दाखल करावी अगर कसे? याबाबत मार्गदर्शन मिळणेबाबत या कार्यालयाकडील दिनांक 18/01/2023 रोजीचे पत्रान्वये प्रस्ताव मा. संचालक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे त्यांचे अभिप्रायासह मा. शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे सादर करणेबाबत विनंती करण्यात आली आहे.

**3. प्राप्त तक्रारींबाबत कार्यवाहीचा अहवाल**

या कार्यालयाकडे मा. एमसीझेडएमए, पर्यावरण विभाग, मुंबई तसेच नागरिकांकडून सीआरझेड क्षेत्रामध्ये विनापरवाना बांधकाम केलेबाबत तक्रारी प्राप्त होत असतात. उपविभागीय अधिकारी यांचेकडे प्रलंबित असलेल्या तक्रारींबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे. —

| उपविभाग | माहे डिसेंबर २०२२ अखेर प्रलंबित तक्रारींची संख्या | माहे जानेवारी २०२३ मध्ये प्राप्त तक्रारींची संख्या | एकुण तक्रारींची संख्या | निकाली तक्रारींची संख्या | शिल्लक तक्रारींची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी अहवाल प्राप्त प्रकरणांची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी अहवालासाठी प्रलंबित प्रकरणांची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी न्यायालयात प्रलंबित प्रकरणे | उपविभागीय अधिकारी यांचेकडे प्रलंबित |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दापोली | १४ | ० | १४ | ० | १४ | ४ | १० | ६ | ४ |
| खेड | १ | ० | १ | ० | १ | ० | १ | ० | १ |
| चिपळूण | ५ | ० | ५ | ० | ५ | ३ | २ | २ | ० |
| रत्नागिरी | १५ | ० | १५ | ० | १५ | २ | १३ | ९ | ४ |
| राजापूर | ५ | ० | ५ | ० | ५ | १ | ४ | १ | ३ |
| | **४०** | **०** | **४०** | **०** | **४०** | **१०** | **३०** | **१८** | **१२** |

| उपविभाग | MCZMA कडील प्रलंबित तक्रारींची संख्या | अन्य व्यक्तींकडील प्रलंबित तक्रारींची संख्या | एकुण तक्रारींची संख्या |
|---|---|---|---|
| दापोली | १ | ९ | १० |
| खेड | ० | १ | १ |
| चिपळूण | १ | १ | २ |
| रत्नागिरी | २ | ११ | १३ |
| राजापूर | १ | ३ | ४ |
| | **५** | **२५** | **३०** |

**उपविभाग दापोली –**

१. मौजे लाडघर, ता. दापोली येथील श्री. सुरेश धोंडु मोरे यांनी हॉटेलचे बांधकामाबाबत व मौजे तामसतिर्थ, ता. दापोली येथील समुद्राजवळील बेकायदेशीर बांधकामाबाबत या दोन्ही प्रकरणी पर्यावरण (सरंक्षण) अधिनियम 1986 अंतर्गत कलम 15(1) अंतर्गत कारवाई सुरु करण्यात आली आहे. तसेच मौजे लाडघर (सीआर क्र. ५५) येथील बांधकामाबाबत तहसीलदार दापोली यांचा फेरअहवाल मागविणेत आला आहे. असे उपविभागीय अधिकारी दापोली यांनी सांगितले.

**उपविभाग खेड –**

१. मौजे भरणेनाका, ता. खेड येथील स.नं. २१/ब मधील बांधकाम प्रकरणी नियोजीत मोजणीचे दिवशी उप अधिक्षक, भूमी अभिलेख खेड यांचेमार्फत मोजणीची कार्यवाही झालेली नाही, असे उपविभागीय अधिकारी खेड यांनी सांगितले. तरी सदर प्रकरणी प्राधान्याने मोजणीची कार्यवाही करुन उपविभागीय अधिकारी खेड यांना अहवाल सादर करावा.

**उपविभाग राजापूर –**

१. मौजे इंगळेवाडी नाणार, ता. राजापूर येथील बांधकाम प्रकरणी मोजणी नकाशा सादर करणेबाबत उप अधिक्षक, भूमी अभिलेख राजापूर यांना उपविभागीय अधिकारी राजापूर यांनी कळविले होते. तरी सदर प्रकरणी प्राधान्याने मोजणी नकाशा उपविभागीय अधिकारी राजापूर यांना सादर करावा.

वरील उपविभागातील मोजणी प्रकरणात तात्काळ कार्यवाही करणेच्या सूचना संबंधित उपअधिक्षक, भूमी अभिलेख यांना अधिक्षक, भूमी अभिलेख यांनी दयाव्यात.

**प्राप्त तक्रारींबाबत सर्वसाधारण सूचना –**

१. प्रलंबित तक्रारी या ब-याच कालावधीपासून प्रलंबित असलेचे दिसून येते. तरी प्रलंबित तक्रारी अर्जांमध्ये तात्काळ स्थळपहाणी करुन सीआरझेड तरतूदींचे अनुषंगाने कार्यवाही करुन प्रकरणनिहाय अनुपालन अहवाल तात्काळ सादर करणेत येईल याकडे विशेष लक्ष पुरवावे.
२. न्यायालयीन स्तरावर प्रलंबित प्रकरणी अपिल दाखल करुन घेण्यात आले असल्यास अपिलाचा क्रमांक व सुनावणीची पुढील तारीख तपशिलामध्ये नमुद करण्यात यावी.
३. न्यायप्रविष्ट प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी यांनी पाठपुरावा करावा. तसेच सुनावणी तारखेस उपस्थित रहावे व दरमहा सदयस्थितीचा अहवाल कार्यालयास सादर करावा.
४. FIR दाखल प्रकरणांमध्ये सदयस्थितीचा अहवाल दर महाचे बैठकीपुर्वी सादर करणेबाबत सर्व उपविभागीय अधिकारी यांना सांगण्यात आले.
५. ज्या प्रकरणी नगर रचना विभाग/ भूमी अभिलेख विभागांचे अभिप्राय अपेक्षिलेले आहेत त्या प्रकरणी संबंधित विभागाने तात्काळ कार्यवाही करावी.

**सीआरझेड क्षेत्रामधील अनधिकृत बांधकामाबाबत सर्वसाधारण सूचना –**

१. सर्व्हेक्षणामध्ये आढळून आलेल्या बांधकामाची यादी तयार करुन त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पाठविणेत आलेल्या विहीत नमुन्यात माहिती सादर करावी.

२. सीआरझेड क्षेत्रात बांधकामे होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

३. उपविभागीय अधिकारी यांनी त्यांचेस्तरावर संबंधित विभागाची मासिक बैठक घेवून आढावा घ्यावा.

४. अकृषीक परवानगी तसेच बांधकाम परवानगीसाठी आलेल्या अर्जांबाबत सहाय्यक संचालक नगर रचना विभागाचे अभिप्राय घ्यावेत. सागरतटिय क्षेत्रात येणा-या महानगरपालिका/नगरपालिका/ नगरपरिषदा/ग्रामपंचायत व इतर ठिकाणी कोणत्याही बांधकामास परवानगी देण्यापूर्वी महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटी किंवा केंद्रिय पर्यावरण व वन मंत्रालयाची पूर्व परवानगी प्राप्त असल्याची खातरजमा संबंधितांनी करावयाची आहे. पूर्व परवानगी नसताना सागरतटिय क्षेत्रात कोणत्याही कामांना अनुमती देण्यात येवू नये.

५. सागरतटिय क्षेत्रातील निवासी/ वाणिज्य बांधकाम प्रकरणांमध्ये नियोजनाचे अनुषंगाने सहाय्यक संचालक, नगर रचना, रत्नागिरी यांनी तात्काळ अभिप्राय सादर करावेत. तसेच दरमहा अहवाल सादर करावा.

६. सागरतटिय क्षेत्रातील निवासी/ वाणिज्य बांधकाम प्रकरणांमध्ये सीआरझेड परवानगीचे प्रस्ताव तात्काळ महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटीकडे उपविभागीय अधिकारी यांनी सादर करावेत. तसेच दरमहा अहवाल सादर करावा.

७. सीआरझेड व कांदळवनासाठी शासनाने दिलेल्या आदेशाचे पालन करावे.

८. सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत/विनापरवाना बांधकाम प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत भूमी अभिलेख विभागाकडे मोजणीसाठी पाठविण्यात येणा-या प्रकरणांमध्ये भूमी अभिलेख विभागाने शासकीय मोजणी करुन दयावी.

वरीलप्रमाणे विचारविनीमय/चर्चा करुन जे निर्णय सर्वानुमते घेण्यात आले त्याबाबत आणखी काही शंका असल्यास त्यांचे निरसन सर्वानुमते करणेसाठी त्या उपस्थित करणेबाबत समिती सदस्य व संबंधित विभाग/यंत्रणा यांना विचारणा करण्यात आली असता कोणीही शंका उपस्थित केली नाही.

उपस्थितांचे आभार मानुन बैठक समाप्त झालेचे सदस्य सचिव तथा निवासी उपजिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी जाहीर केलेवरुन बैठक समाप्त करण्यात आली.

**स्थळप्रत मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी यांच्या स्वाक्षरीची असे.**

Sury ठाणे,
**(चंद्रकांत सुर्यवंशी)**
सदस्य सचिव, सागरी किनारा व्यवस्थापन समिती, रत्नागिरी
तथा निवासी उपजिल्हाधिकारी

क्र. महसूल/कार्या/अे.के. ६/DCZMA/०१/२०२३
जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
दिनांक - २०/०४/२०२३

प्रतिलिपी – सर्व संबंधितांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी

**दिनांक २७/०२/२०२३ रोजी मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समितीच्या (DCZMA) आयोजित केलेल्या सभेचे इतिवृत्त**

---

सदर सभेस खालीलप्रमाणे समितीमधील अध्यक्ष व इतर सदस्य असलेले अधिकारी/ कर्मचारी प्रत्यक्ष/वेबेक्स व्ही.सी. द्वारे उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | निवासी उपजिल्हाधिकारी | सदस्य सचिव |
| 3. | प्रतिनिधी जिल्हा पोलीस अधिक्षक, रत्नागिरी | सदस्य |
| ४. | प्रतिनिधी जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख रत्नागिरी | सदस्य |
| ५. | विभागीय वन अधिकारी चिपळूण | सदस्य |
| ६. | सहाय्यक संचालक, नगर रचना रत्नागिरी | सदस्य |
| ७. | उपविभागीय अधिकारी रत्नागिरी | सदस्य |
| ८. | उपविभागीय अधिकारी दापोली | सदस्य |
| ९. | उपविभागीय अधिकारी खेड | सदस्य |
| १०. | उपविभागीय अधिकारी चिपळूण | सदस्य |
| ११. | उपविभागीय अधिकारी राजापूर | सदस्य |
| १२. | प्रतिनिधी उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी | सदस्य |
| १३. | उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण | सदस्य |
| १४. | मुख्याधिकारी गुहागर | सदस्य |

तसेच वरील समिती सदस्यांव्यतिरीक्त अन्य संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना बैठकीस उपस्थित रहाणेबाबत कळविणेत आलेमुळे खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी हे प्रत्यक्ष/वेबेक्स व्ही.सी. द्वारे बैठकीस उपस्थित राहिलेले आहेत.

१. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम चिपळूण
२. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी
३. तहसीलदार दापोली
४. गटविकास अधिकारी, पंचायत समिती दापोली

---

सदस्य सचिव, जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समिती, तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

**1. मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांनी केलेल्या बांधकामावर कारवाई करणेबाबत –**

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांनी केलेल्या बांधकामावर कारवाई करणेबाबत मा. MoEF&CC, नवी दिल्ली यांनी निर्गमीत

केलेले दिनांक 22/08/2022 रोजीचे निर्देश या कार्यालयाकडे मा. अवर सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडून दिनांक 25/08/2022 रोजीचे पत्रान्वये प्राप्त झाले आहेत.

सदर पत्राचे अनुषंगाने दिनांक 29/08/2022, 26/09/2022, 17/10/2022, 14/11/2022, 05/12/2022 व दिनांक 30/01/2023 रोजी जिल्हास्तरीय सागरी किनारा व्यवस्थापन समिती (DCZMA) च्या बैठकीमध्ये समितीचे मान्यतेने निर्णय घेण्यात आले असून संबंधीत सर्व अधिकारी/यंत्रणा यांना कार्यवाही करणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

**a) मा. एमसीझेडएमए, मुंबई यांजकडील दिनांक 12/10/2022 रोजीचे पत्राबाबत –**

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट चे बांधकामावर कारवाई करणेबाबत मा. एमसीझेडएमए, मंत्रालय, मुंबई यांचे दिनांक 12/10/2022 रोजीचे निर्देश या कार्यालयास प्राप्त झाले आहेत.

सदर पत्रामध्ये पुढील बाबी नमुद करण्यात आल्या आहेत.

i) पर्यावरण विभागाकडे अंदाजपत्रक मंजूर करण्याचे कोणतेही आदेश नाहीत. त्याबाबतची आवश्यक मान्यता सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्राप्त केली जाईल.
ii) 12 सप्टेंबर 2022 रोजी झालेल्या MCZMA च्या 160 व्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार, MOEFCC च्या दिनांक 22.08.2022 च्या आदेशाच्या अंमलबजावणीनंतर, प्रकल्प प्रस्तावकांकडून सदर रक्कम वसूल करून MCZMA कडे जमा करावी असे निर्देश आहेत.

त्याप्रमाणे सामाजिक वनीकरण विभाग यांचेकडील दिनांक 21/11/2022 रोजीच्या अहवालानुसार साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांना वसुलपात्र रक्कम उपविभागीय अधिकारी, दापोली यांचेमार्फत दिनांक 22/12/2022 रोजीचे पत्रान्वये कळविणेत आलेली आहे.

तथापि उपविभागीय अधिकारी, दापोली यांजकडील दिनांक 22/12/2022 रोजीचे पत्राचे अनुषंगाने श्री. सदानंद गंगाराम कदम यांचे तर्फे ॲड. सुधीर बुटाला, खेड यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता अंतर्गत कलम 80 अंतर्गत दिनांक 03/02/2023 अन्वये दावा पूर्व नोटीस जिल्हाधिकारी रत्नागिरी यांना पाठविलेली आहे. सदर नोटिशीचे अनुषंगाने अर्जदार यांना विहित मुदतीत समर्पक उत्तर देवुन केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल या कार्यालयाकडे सादर करणेबाबत उपविभागीय अधिकारी दापोली यांना कळविणेत यावे.

**b) कार्यारंभ आदेशानुसार बांधकाम निष्कासनाबाबत –**

सी कौंच रिसॉर्टचे बांधकाम निष्कासन करणेबाबत मे. यश कन्स्ट्रक्शन प्रोप्रा. नंदकुमार सी. म्हात्रे, तळोजा यांना कार्यारंभ आदेश सार्वजनिक बांधकाम विभाग, चिपळूण यांचेमार्फत दिनांक 21/11/2022 रोजीचे पत्रान्वये देणेत आले होते. त्याप्रमाणे सी कौंच रिसॉर्टचे बांधकाम पुर्णपणे पाडण्यात आले असून सदर मलब्याची विल्हेवाट मौजे वाघवे, ता. दापोली येथे अधिकृत ठिकाणी लावण्यात आली असलेबाबत उपप्रादेशिक अधिकारी, प्रदुषण नियंत्रण मंडळ चिपळूण यांनी दिनांक 27/01/2023 रोजीचे ई-मेल संदेशान्वये कळविले आहे. तरी सी कौंच रिसॉर्टचे बांधकाम पुर्णपणे निष्कासीत झालेबाबतचा अहवाल उपप्रादेशिक अधिकारी, प्रदुषण नियंत्रण मंडळ चिपळूण व उपविभागीय अधिकारी, दापोली यांनी स्थळपहाणीसह या कार्यालयाकडे सादर करावा.

तसेच साई रिसॉर्ट एनएक्सचे बांधकाम निष्कासन करणेबाबत संबंधित प्रकल्प प्रस्तावकास अंदाजित रक्कम कळविणेत आलेनंतर व मा. दिवाणी न्यायालय, खेड यांचे न्यायालयात दाखल दावा क्र. 57/2021 मध्ये निशाणी 6-तुर्तातुर्त ताकिदीच्या अर्जाच्या अनुषंगाने जैसे-थे चा पारित केलेला दिनांक 19/07/2021 रोजीचा आदेश रद्द झालेनंतर साई रिसॉर्ट एनएक्सचे बांधकाम निष्कासन करणेसाठी मे. यश कन्स्ट्रक्शन प्रोप्रा. नंदकुमार सी. म्हात्रे, तळोजा यांना कार्यारंभ आदेश देणेबाबत कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग चिपळूण यांना या कार्यालयाकडील दिनांक 21/11/2022 रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले आहे.

**c) पर्यावरणीय नुकसान भरपाईबाबत –**

सी कौंच रिसॉर्ट व साई रिसॉर्ट एनएक्स यांजकडून पर्यावरणीय नुकसान भरपाई (Environmental Compensation) वसूल करणेबाबत यापुर्वीच्या दिनांक 05/12/2022 रोजीच्या जिल्हास्तरीय सागरी किनारा व्यवस्थापन समितीच्या बैठकीमध्ये महाराष्ट्र प्रदुषण

नियंत्रण मंडळानेच वसुलीबाबत नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी असे निर्देश देण्यात आले होते. त्याप्रमाणे उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांना दिनांक 08/12/2022 रोजीचे पत्रान्वये लेखी निर्देश देण्यात आले आहेत.

प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर यांनी दिनांक 16/12/2022 रोजीचे आदेशान्वये पर्यावरणीय नुकसान भरपाईची रक्कम जमीन महसूल वसूली म्हणून वसूल करणेबाबत कळविले होते. त्यानुषंगाने दिनांक 28/12/2022 रोजीचे पत्रान्वये महसूल वसूली प्रमाणपत्र सक्षम प्राधिकारी यांच्या सही व शिक्क्यानिशी थकबाकीदार यांचे स्थावर व जंगम मालमत्तेच्या तपशीलासह सादर करणेबाबत प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर यांना कळविण्यात आले आहे.

उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांनी दिनांक 14/02/2023 रोजीचे पत्रान्वये पर्यावरणीय नुकसान भरपाईची रक्कम जमीन महसूल वसूली म्हणून वसूल करणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केला आहे. सदर प्रस्तावास अनुसरुन खालीलप्रमाणे कार्यवाही करणेत आली आहे –

1. मौजे मुरुड, ता. दापोली येथील गट क्र. 446 मध्ये मा. Directorate of Enforcement, Mumbai यांजकडील दिनांक 04/01/2023 रोजीच्या आदेशाची नोंद 7/12 सदरी घेणेत आलेली असलेमुळे सदर मालमत्तेची विक्री करुन महसूल वसुली प्रमाणपत्रानुसार वसुली करता येणार नसलेमुळे, महसूल वसुली प्रमाणपत्रानुसार संबंधितांना वसुलीची नोटीस बजावुन सदर जमिनीचे अधिकार अभिलेख 7/12 सदरी वसुलीचा बोजा ठेवणेबाबत तहसीलदार दापोली यांना या कार्यालयाकडील दिनांक 21/02/2023 रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले आहे.
2. महसूल वसुली प्रमाणपत्रानुसार महाराष्ट्र जमीन महसूल (जमीन महसूलाच्या वसूलीबाबत) नियम 1967 चे नियम 17 अन्वये वसुलीबाबत कार्यवाही करणेबाबत तहसीलदार खेड यांना या कार्यालयाकडील दिनांक 21/02/2023 रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले आहे.
3. महसूल वसूली प्रमाणपत्रामध्ये दिलेल्या तपशीलानुसार जमीन मिळकतीचे नोंदणकृत दस्त क्र. 6353/2010 अन्वये श्री. अनिल दत्तात्रय परब यांची मिळकत श्रीम. विजया दत्तात्रय परब यांचे नांवे करण्यात आली आहे. श्री. अनिल परब यांचे नावे सदयस्थितीत मालमत्ता असल्याचा तपशील दिसून येत नसल्याने श्री. अनिल परब यांचेकडून वसुली करता येणार नाही. तरी श्री. अनिल परब यांचे अन्य जमिनीचा/मालमत्तेचा शोध घेवून महसूल वसुली प्रमाणपत्र या कार्यालयाकडे सादर करणेबाबत उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण या कार्यालयाकडील दिनांक 21/02/2023 रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले आहे.
4. मौजे मुरुड, ता. दापोली येथील गट क्र. 446 मधील सी कौंच रिसॉर्टबाबत श्री. पुष्कर श्रीकृष्ण मुळये यांचे नांव खरेदीखत झाले असुन त्याचा दस्त क्र. 1551/2017 दिनांक 29/01/2017 चा अंमल 7/12 सदरी दिसून येत नाही. त्यामुळे श्री. पुष्कर श्रीकृष्ण मुळये यांचेकडुन वसुली करता येत नसलेने त्यांचे अन्य जमिनीचा/मालमत्तेचा शोध घेवून महसूल वसुली प्रमाणपत्र या कार्यालयाकडे सादर करणेबाबत उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण या कार्यालयाकडील दिनांक 21/02/2023 रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले आहे.

**d) Provisional Attachment Order – Mum/BPU-2/Sadanand/24(4)/2022-23/1 Dated 23/11/2022 Under Sub-Section (4) of Section 24 of THE PROHIBITION OF BENAMI PROPERTY TRANSACTION ACT 1988 by Assistant Commissioner of Income Tax (B.P.) Unit-2, Mumbai.**

मा. सहा. आयकर आयुक्त, (बी.पी.) युनिट-2, मुंबई यांनी मौजे मुरुड, ता. दापोली येथील गट क्र. 446, घर क्र. 1074 मधील श्री. सदानंद गंगाराम कदम यांचे नांवे असलेल्या मालमत्तेबाबत दिनांक 23/11/2022 च्या आदेशान्वये जप्त करणेबाबत दिनांक 23/11/2022 अन्वये निर्देश प्राप्त झाले आहेत.

मा. सहा. आयकर आयुक्त, (बी.पी.) युनिट-2, मुंबई यांजकडील दिनांक 23/11/2022 रोजीच्या आदेशाची नोंद 7/12 सदरी घेणेबाबत तहसीलदार दापोली यांना दिनांक 17/02/2023 रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले आहे.

**e) न्यायालयीन बाबींबाबत कार्यवाही –**

i) श्री. सदानंद गंगाराम कदम यांनी मा. दिवाणी न्यायालय खेड येथे दावा क्र. 57/2021 दिनांक 01/07/2021 अन्वये दाखल केला. मा. दिवाणी न्यायालय, खेड यांनी दिनांक 19/07/2021 रोजीच्या आदेशान्वये प्रस्तुत दाव्यामध्ये जैसे-थे चे आदेश पारित केले आहेत. सदर दावा प्रकरणी मा. शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडील प्राप्त निर्देश व कायदेशीर बाबींबाबत मार्गदर्शन पुढीलप्रमाणे आहे –

- **मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, खेड यांचे न्यायालयात दाखल दावा क्र. रेमुनं. 57/2021 मध्ये मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, खेड यांनी दिनांक 11/10/2022 व दिनांक 13/12/2022 रोजी पारित केलेल्या सुनावणी आदेशाविरुध्द अपील दाखल करणेबाबत -**

मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, खेड यांचे न्यायालयात दाखल दावा क्र. रेमुनं. 57/2021 मध्ये मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, खेड यांनी दिनांक 11/10/2022 व दिनांक 13/12/2022 रोजी पारित केलेल्या सुनावणी आदेशाविरुध्द जिल्हा सत्र न्यायालय, खेड येथे फेरतपासणी अपील दाखल करणेबाबत या कार्यालयास मा. शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडुन निर्देश प्राप्त आहेत.

तथापि श्रीम. नलावडे, सहा. सरकारी वकील खेड यांनी दिनांक 20/02/2023 रोजीचे पत्रान्वये मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे निशाणी-33 वर रिट दाखल करणे व निशाणी-35 वर रिव्हिजन दाखल करणे आवश्यक असलेने नि.33 व नि. 35 चे आदेशाविरुध्द मा. जिल्हा सत्र न्यायालय, खेड येथे अपिल, रिव्हीजन दाखल करणे अशक्य असलेबाबत मा. विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना कळविले असून सदर पत्राची प्रत या कार्यालयाकडे प्राप्त झाली आहे.

तरी श्रीम. नलावडे, सहा. सरकारी वकील खेड यांनी दिनांक 20/02/2023 रोजीचे पत्रान्वये नमुद केलेप्रमाणे मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे निशाणी-33 वर रिट दाखल करणे व निशाणी-35 वर रिव्हिजन दाखल करणेबाबत सरकारी वकीलांची नियुक्ती मा. शासनामार्फत होवुन मिळणेचा प्रस्ताव मा. शासन, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे सादर करणेत यावा.

- **हस्तांतरण अर्जाबाबत (Transfer Application) -**

मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, खेड यांचे न्यायालयात दाखल दावा क्र. रेमुनं. 57/2021 मध्ये मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, जिल्हा न्यायालय यांचे न्यायालयात दाखल करावयाचा हस्तांतरण अर्ज (Transfer Application) व त्यानुषंगाने आवश्यक प्रतिज्ञापत्राच्या मसुदयास मंजुरी मिळणेबाबत उपविभागीय अधिकारी, दापोली यांनी दिनांक 23/02/2023 रोजीचे पत्रान्वये या कार्यालयाकडे विनंती केली आहे.

उक्त हस्तांतरण अर्ज व त्यानुषंगाने आवश्यक प्रतिज्ञापत्र कायदेशीरप्रक्रियेनुसार मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, जिल्हा न्यायालय यांचे न्यायालयात दाखल करणेच्या कार्यवाहीबाबत उपविभागीय अधिकारी, दापोली यांना पुढील निर्देश देण्यात यावेत.

- **पुढील सुनावणीबाबत -**

दावा क्र. रेमुनं. 57/2021 चे प्रकरणी निशाणी 6 वर म्हणणे/ युक्तीवादा याबाबत कार्यवाही झालेली आहे. प्रकरणी सुनावणीची पुढील तारीख दिनांक 17/03/2023 रोजी असून निशाणी 6-तुर्तातुर्त ताकीद अर्जावरील निर्णयाकरीता ठेवणेत आली आहे.

ii) श्री. किरीट सोमय्या यांनी मौजे मुरुड, ता.दापोली येथील गट.नं 446 मधील बांधकामाबाबत 58/2021 अन्वये मा. राष्ट्रीय हरित लवाद वेस्टर्न झोन बेंच पुणे येथे दावा दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये उपविभागीय अधिकारी, दापोली यांचेमार्फत प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले आहे. सदर दाव्याची सुनावणी दिनांक 13/03/2023 रोजी निश्चित करण्यात आलेली आहे.

iii) मा. पर्यावरण, वन आणि जलवायू परिवर्तन मंत्रालय, एकात्मिक प्रादेशिक कार्यालय, नागपुर द्वारा श्री. सुरेशकुमार अडप्पा, शास्त्रज्ञ-डी यांनी मा. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, खेड यांचे न्यायालयात 1. श्री. अनिल दत्तात्रय परब, 2. साई रिसॉर्ट एनएक्स 3. सी कौंच रिसॉर्ट यांचे विरुध्द पर्यावरण (संरक्षण) कायदा अधिनियम 1986 मधील कलम 19 व 15 चे 7 अन्वये रेग्युलर क्रिमीनल केस नंबर 12/2022 अन्वये दावा दाखल केलेला आहे. सदर दावा आज मितीस न्यायप्रविष्ठ असुन आरोपींचे जामीन कदबे घेण्यात आले आहेत. फिर्यादीतर्फे दोषारोपपुर्व पुरावा देणेकामी पुढील सुनावणीची तारीख दिनांक 16/03/2023 रोजी निश्चित करण्यात आलेली आहे.

iv) मौजे मुरुड, ता. दापोली येथील सर्व्हे नं. 446 मधील साई रिसॉर्ट एनएक्स या रिसॉर्टचे सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत बांधकाम निष्कासीत करण्याबाबत सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल, मुंबई यांचेकडील दिनांक 31/01/2022 चे ज्ञापन व अंमलबजावणी पत्र दिनांक 22/08/2022 व उपविभागीय अधिकारी, दापोली यांचेकडील दिनांक 25/08/2022 चे पत्र रदद करण्याबाबत श्री. सदानंद गंगाराम कदम यांनी भारत सरकार व इतर यांचेविरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे Writ Petition No.11125/2022 दाखल केले आहे. सदर दाव्यामध्ये अन्य बेंचकडे दावा वर्ग करणेवर प्रलंबित आहे.

v) मौजे मुरुड, ता. दापोली येथील सर्व्हे नं. 446 मधील साई रिसॉर्ट एनएक्स चे बांधकाम पुर्ण नसताना कर आकारणी करणेसाठी श्री. अनिल दत्तात्रय परब यांनी अर्ज करुन शासनाची फसवणुक केलेमुळे गटविकास अधिकारी, पंचायत समिती दापोली यांनी श्री. अनिल दत्तात्रय परब व. 3 यांचेविरुध्द प्रथम खबर क्र. 0406 दिनांक 07/11/2022 अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

vi) मौजे मुरूड, ता. दापोली येथील गट नं. 446 या मिळकतीमधील सी कौंच रिसॉर्टचे अनधिकृत बांधकाम केलेमुळे श्री. पुष्कर श्रीकृष्ण मुळे यांचेविरुध्द पोलीस ठाणे दापोली येथे गुन्हा प्रथम खबर क्रमांक 0043 दिनांक - 08.03.2022 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच मौजे मुरूड, ता. दापोली येथील गट नं. 446 या मिळकतीमधील साई रिसॉर्ट एनएक्स चे बांधकामाबाबत जमीन मालक श्री. सदानंद गंगाराम कदम यांचेवर मंडळ अधिकारी बुर्रोंडी यांचेमार्फत दापोली पोलीस ठाणे येथे गुन्हा प्रथम खबर क्र. 0178 दिनांक 14/11/2022 नुसार एफआयआर दाखल करण्यात आला आहे.

## 2. मौजे मुरुड, ता. दापोली येथील समुद्र किना-यावरील साई रिसॉर्ट एनएकस/ सी कौंच रिसॉर्ट यांनी सरकारी जमिनीवर अतिक्रमण करुन बांधकाम केलेबाबत व भूमिगत ड्रेनेज पाईपलाईन बाबत-डॉ. किरीट सोमैया यांचा तक्रारी अर्ज

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 लगत पश्चिम दिशेच्या समुद्रावरील वाळूवर केलेले अतिक्रमण म.ज.म.अ.1966 चे कलम 50(3) व कलम 53 नुसार दिलेल्या नोटीसप्रमाणे संबंधितांनी शासकीय जमिनीवरील अतिक्रमण हे मुदतीत काढून टाकलेले आहे.

मौजे मुरुड, ता. दापोली येथील गट नं. 446 च्या बाहेरील अतिक्रमण करण्यात आलेली शासकीय जमीन ही गाळाने तयार झालेली किना-यालगतची जमीन (Foreshore Land) आहे. सबब सीआझेड तरतूदींचे अनुषंगाने प्रशासकीय विभाग म्हणुन पर्यावरण (संरक्षण आणि संवर्धन) अधिनियम 1986 चे कलम 15(1) प्रमाणे फिर्याद दाखल करावी अगर कसे? याबाबत मार्गदर्शन मिळणेबाबत या कार्यालयाकडील दिनांक 18/01/2023 रोजीचे पत्रान्वये प्रस्ताव मा. संचालक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे त्यांचे अभिप्रायासह मा. शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे सादर करणेबाबत विनंती करण्यात आली आहे. तथापि अदयाप पर्यंत मार्गदर्शन प्राप्त झालेले नाही.

## 3. तत्कालीन उपविभागीय अधिकारी, दापोली यांचेविरुध्द करण्यात आलेली कारवाई --

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं ४४६ क्षेत्र ४२००.०० चौ.मी. या मिळकतीसह मौजे हर्णे, मुरुड, लाडघर, कर्दे, आंजर्ले, मांदिवली, ता. तीर्थ, सालदुरे या गावातील मिळकतींना श्री. जयराम देशपांडे, तत्कालीन उपविभागीय अधिकारी, दापोली जि. रत्नागिरी यांनी नगर रचनाकार व एमसीझेडएमएची पूर्वपरवानगी न घेता बिनशेती आदेश निर्गमित केलेले असल्याने प्रकरणी त्याचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील), नियम, १९७९ अन्वये शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरु करण्यात आली.

श्री. जयराम देशपांडे, तत्कालीन उपविभागीय अधिकारी, दापोली जि. रत्नागिरी यांना शासन, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडील आदेश क्र. विभाचौ-२०२२/२९१/प्र.क्र.८६/ई-४ दिनांक २३/०१/२०२३ या आदेशाच्या दिनांकापासून शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

## 4. प्राप्त तक्रारींबाबत कार्यवाहीचा अहवाल

उपविभागीय अधिकारी यांचेकडे प्रलंबित असलेल्या तक्रारींबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे. —

| उपविभाग | माहे डिसेंबर 2022 अखेर प्रलंबित तक्रारींची संख्या | माहे जानेवारी 2023 ते फेब्रुवारी 2023 मध्ये प्राप्त तक्रारींची संख्या | एकुण तक्रारींची संख्या | निकाली तक्रारींची संख्या | शिल्लक तक्रारींची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी अहवाल प्राप्त प्रकरणांची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी अहवालासाठी प्रलंबित प्रकरणांची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी न्यायालयात प्रलंबित प्रकरणे | उपविभागीय अधिकारी यांचेकडे प्रलंबित |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दापोली | 14 | 1 | 15 | 0 | 15 | 4 | 11 | 6 | 5 |
| खेड | 1 | 0 | 1 | 0 | 1 | 0 | 1 | 0 | 1 |
| चिपळूण | 5 | 0 | 5 | 0 | 5 | 3 | 2 | 2 | 0 |
| रत्नागिरी | 15 | 0 | 15 | 0 | 15 | 2 | 13 | 9 | 4 |
| राजापूर | 5 | 0 | 5 | 0 | 5 | 1 | 4 | 1 | 3 |
| | 40 | 01 | 41 | 0 | 41 | 10 | 31 | 18 | 13 |

| उपविभाग | MCZMA कडील प्रलंबित तक्रारींची संख्या | अन्य व्यक्तींकडील प्रलंबित तक्रारींची संख्या | एकुण तक्रारींची संख्या |
|---|---|---|---|
| दापोली | 1 | 10 | 11 |
| खेड | 0 | 1 | 1 |
| चिपळूण | 1 | 1 | 2 |
| रत्नागिरी | 2 | 11 | 13 |
| राजापूर | 1 | 3 | 4 |
| | **5** | **26** | **31** |

तरी प्रलंबित तक्रारी अर्जांमध्ये तात्काळ स्थळपहाणी करुन सीआरझेड तरतूदींचे अनुषंगाने कार्यवाही करुन अनुपालन अहवाल तात्काळ सादर करता येईल याकडे विशेष लक्ष पुरवावे असे निर्देश सदस्य सचिव यांनी उपविभागीय अधिकारी यांना दिले.

## प्राप्त तक्रारींबाबत सर्वसाधारण सूचना –

१. प्रलंबित तक्रारी या ब-याच कालावधीपासून प्रलंबित असलेचे दिसून येते. तरी प्रलंबित तक्रारी अर्जांमध्ये तात्काळ स्थळपहाणी करुन सीआरझेड तरतूदींचे अनुषंगाने कार्यवाही करुन प्रकरणनिहाय अनुपालन अहवाल तात्काळ सादर करणेत येईल याकडे विशेष लक्ष पुरवावे.

२. न्यायालयीन स्तरावर प्रलंबित प्रकरणी अपिल दाखल करुन घेण्यात आले असल्यास अपिलाचा क्रमांक व सुनावणीची पुढील तारीख तपशिलामध्ये नमुद करण्यात यावी.

३. न्यायप्रविष्ट प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी यांनी पाठपुरावा करावा. तसेच सुनावणी तारखेस उपस्थित रहावे व दरमहा सदयस्थितीचा अहवाल कार्यालयास सादर करावा.

४. FIR दाखल प्रकरणांमध्ये सदयस्थितीचा अहवाल दर महाचे बैठकीपुर्वी सादर करणेबाबत सर्व उपविभागीय अधिकारी यांना सांगण्यात आले.

५. ज्या प्रकरणी नगर रचना विभाग/ भूमी अभिलेख विभागांचे अभिप्राय अपेक्षिलेले आहेत त्या प्रकरणी संबंधित विभागाने तात्काळ कार्यवाही करावी.

## सीआरझेड क्षेत्रामधील अनधिकृत बांधकामाबाबत सर्वसाधारण सूचना –

१. सर्व्हेक्षणामध्ये आढळून आलेल्या बांधकामाची यादी तयार करुन त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पाठविणेत आलेल्या विहीत नमुन्यात माहिती सादर करावी.

२. सीआरझेड क्षेत्रात बांधकामे होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

३. उपविभागीय अधिकारी यांनी त्यांचेस्तरावर संबंधित विभागाची मासिक बैठक घेवून आढावा घ्यावा.

४. अकृषीक परवानगी तसेच बांधकाम परवानगीसाठी आलेल्या अर्जांबाबत सहाय्यक संचालक नगर रचना विभागाचे अभिप्राय घ्यावेत. सागरतटिय क्षेत्रात येणा-या महानगरपालिका/नगरपालिका/ नगरपरिषदा/ग्रामपंचायत व इतर ठिकाणी कोणत्याही बांधकामास परवानगी देण्यापूर्वी महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट अ‍ॅथोरिटी किंवा केंद्रिय पर्यावरण व वन मंत्रालयाची पूर्व परवानगी प्राप्त असल्याची खातरजमा संबंधितांनी करावयाची आहे. पूर्व परवानगी नसताना सागरतटिय क्षेत्रात कोणत्याही कामांना अनुमती देण्यात येवू नये.

५. सागरतटिय क्षेत्रातील निवासी/ वाणिज्य बांधकाम प्रकरणांमध्ये नियोजनाचे अनुषंगाने सहाय्यक संचालक, नगर रचना, रत्नागिरी यांनी तात्काळ अभिप्राय सादर करावेत. तसेच दरमहा अहवाल सादर करावा.

६. सागरतटिय क्षेत्रातील निवासी/ वाणिज्य बांधकाम प्रकरणांमध्ये सीआरझेड परवानगीचे प्रस्ताव तात्काळ महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट अ‍ॅथोरिटीकडे उपविभागीय अधिकारी यांनी सादर करावेत. तसेच दरमहा अहवाल सादर करावा.

७. सीआरझेड व कांदळवनासाठी शासनाने दिलेल्या आदेशाचे पालन करावे.

८. सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत/विनापरवाना बांधकाम प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत भूमी अभिलेख विभागाकडे मोजणीसाठी पाठविण्यात येणा-या प्रकरणांमध्ये भूमी अभिलेख विभागाने शासकीय मोजणी करुन दयावी.

वरीलप्रमाणे विचारविनीमय/चर्चा करुन जे निर्णय सर्वानुमते घेण्यात आले त्याबाबत आणखी काही शंका असल्यास त्यांचे निरसन सर्वानुमते करणेसाठी त्या उपस्थित करणेबाबत समिती सदस्य व संबंधित विभाग/यंत्रणा यांना विचारणा करण्यात आली असता कोणीही शंका उपस्थित केली नाही.

उपस्थितांचे आभार मानुन बैठक समाप्त झालेचे सदस्य सचिव तथा निवासी उपजिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी जाहीर केलेवरुन बैठक समाप्त करण्यात आली.

**स्थळप्रत मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी यांच्या स्वाक्षरीची असे.**

क्र. महसूल/कार्या/अे.के. ६/DCZMA/०२/२०२३
जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
दिनांक - २०/०४/२०२३

**(चंद्रकांत सुर्यवंशी)**
सदस्य सचिव, सागरी किनारा व्यवस्थापन समिती,
रत्नागिरी तथा निवासी उपजिल्हाधिकारी

प्रतिलिपी - सर्व संबंधितांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी

**दिनांक २७/०३/२०२३ रोजी मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समितीच्या (DCZMA) आयोजित केलेल्या सभेचे इतिवृत्त**

---

सदर सभेस खालीलप्रमाणे समितीमधील अध्यक्ष व इतर सदस्य असलेले अधिकारी/ कर्मचारी प्रत्यक्ष/वेबेक्स व्ही.सी. द्वारे उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | निवासी उपजिल्हाधिकारी | सदस्य सचिव |
| 3. | जिल्हा पोलीस अधिक्षक, रत्नागिरी | सदस्य |
| ४. | प्रतिनिधी जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख रत्नागिरी | सदस्य |
| ५. | विभागीय वन अधिकारी चिपळूण | सदस्य |
| ६. | सहाय्यक संचालक, नगर रचना रत्नागिरी | सदस्य |
| ७. | उपविभागीय अधिकारी रत्नागिरी | सदस्य |
| ८. | उपविभागीय अधिकारी खेड/अति. दापोली | सदस्य |
| ९. | उपविभागीय अधिकारी चिपळूण | सदस्य |
| १०. | उपविभागीय अधिकारी राजापूर | सदस्य |
| ११. | उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण | सदस्य |
| १२. | मुख्याधिकारी रत्नागिरी | सदस्य |

तसेच वरील समिती सदस्यांव्यतिरीक्त अन्य संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना बैठकीस उपस्थित रहाणेबाबत कळविणेत आलेमुळे खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी हे प्रत्यक्ष/वेबेक्स व्ही.सी. द्वारे बैठकीस उपस्थित राहिलेले आहेत.

१. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कं.लि. रत्नागिरी
२. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम चिपळूण
३. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी
४. तहसीलदार दापोली

---

सदस्य सचिव, जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समिती, तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

**1. मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांनी केलेल्या बांधकामावर कारवाई करणेबाबत -**

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांनी केलेल्या बांधकामावर कारवाई करणेबाबत मा. MoEF&CC, नवी दिल्ली यांनी निर्गमीत केलेले दिनांक 22/08/2022 रोजीचे निर्देश या कार्यालयाकडे मा. अवर सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडून दिनांक 25/08/2022 रोजीचे पत्रान्वये प्राप्त झाले आहेत.

सदर पत्राचे अनुषंगाने आयोजित जिल्हास्तरीय सागरी किनारा व्यवस्थापन समिती (DCZMA) च्या बैठकीमध्ये समितीचे मान्यतेने निर्णय घेण्यात आले असून संबंधीत सर्व अधिकारी/यंत्रणा यांना कार्यवाही करणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

**a) कार्यारंभ आदेशानुसार बांधकाम निष्कासनाबाबत –**

साई रिसॉर्ट एनएक्सचे बांधकाम निष्कासन करणेबाबत संबंधित प्रकल्प प्रस्तावकास अंदाजित रक्कम कळविणेत आलेनंतर व मा. दिवाणी न्यायालय, खेड यांचे न्यायालयात दाखल दावा क्र. 57/2021 मध्ये निशाणी 6-तुर्तातुर्त ताकिदीच्या अर्जाच्या अनुषंगाने जैसे-थे चा पारित केलेला दिनांक 19/07/2021 रोजीचा आदेश रद्द झालेनंतर साई रिसॉर्ट एनएक्सचे बांधकाम निष्कासन करणेसाठी मे. यश कन्स्ट्रक्शन प्रोप्रा. नंदकुमार सी. म्हात्रे, तळोजा यांना कार्यारंभ आदेश देणेबाबत कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग चिपळूण यांना या कार्यालयाकडील दिनांक 21/11/2022 रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले होते.

दिनांक 17/03/2023 रोजी सुनावणी होवुन निशाणी 6-तुर्तातुर्त ताकिदीच्या अर्जावर आदेश पारित करण्यात आला असुन त्यामध्ये "प्रतिवादींना याद्वारे दाव्याचा निकाल लागेपर्यंत अर्जात वर्णन केल्याप्रमाणे दाव्याच्या मालमत्तेत (मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446) केलेले बांधकाम पाडण्यापासून तात्पुरते प्रतिबंधित करण्यात आले आहे."

मौजे मुरुड, ता. दापोली येथील गट क्र. 446 संदर्भात अन्य न्यायालयाकडील आदेश अथवा मा. दिवाणी न्यायालय, खेड यांचे न्यायालयात दाखल दावा क्र. 57/2021 चा अंतीम आदेश यांना अधीन राहून साई रिसॉर्ट एनएक्सचे बांधकाम निष्कासन करणेसाठी मे. यश कन्स्ट्रक्शन प्रोप्रा. नंदकुमार सी. म्हात्रे, तळोजा यांना कार्यारंभ आदेश देणेबाबत कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग चिपळूण यांनी कार्यवाही करावी असे निर्देश अध्यक्ष यांनी बैठकीमध्ये दिले.

**b) पर्यावरणीय नुकसान भरपाईबाबत –**

उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांनी दिनांक 14/02/2023 रोजीचे पत्रान्वये पर्यावरणीय नुकसान भरपाईची रक्कम जमीन महसूल वसूली म्हणून वसूल करणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केला आहे. सदर प्रस्तावास अनुसरुन तहसीलदार खेड व तहसीलदार दापोली यांना दिनांक 21/02/2023 रोजीचे पत्रान्वये कार्यवाही करणेबाबत कळविणेत आले होते. तरी तहसीलदार खेड व तहसीलदार दापोली यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत समितीस अवगत करावे.

तसेच श्री. अनिल परब व श्री. पुष्कर श्रीकृष्ण मुळये यांचे नांवे असलेल्या अन्य जमिनीचा/मालमत्तेचा शोध घेवून महसूल वसुली प्रमाणपत्र या कार्यालयाकडे सादर करणेबाबत उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण या कार्यालयाकडील दिनांक 21/02/2023 रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले होते. तरी उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत पुढील बैठकीमध्ये समितीस अवगत करावे असे निर्देश अध्यक्ष यांनी दिले.

**c) Provisional Attachment Order – Mum/BPU-2/Sadanand/24(4)/2022-23/1 Dated 23/11/2022 Under Sub-Section (4) of Section 24 of THE PROHIBITION OF BENAMI PROPERTY TRANSACTION ACT 1988 by Assistant Commissioner of Income Tax (B.P.) Unit-2, Mumbai.**

मा. सहा. आयकर आयुक्त, (बी.पी.) युनिट-2, मुंबई यांनी मौजे मुरुड, ता. दापोली येथील गट क्र. 446, घर क्र. 1074 मधील श्री. सदानंद गंगाराम कदम यांचे नांवे असलेल्या मालमत्तेबाबत दिनांक 23/11/2022 च्या आदेशान्वये जप्त करणेबाबत दिनांक 23/11/2022 अन्वये निर्देश प्राप्त झाले आहेत.

मा. सहा. आयकर आयुक्त, (बी.पी.) युनिट-2, मुंबई यांजकडील दिनांक 23/11/2022 रोजीच्या आदेशाची नोंद 7/12 सदरी घेणेबाबत तहसीलदार दापोली यांना दिनांक 17/02/2023 रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले होते. तहसीलदार दापोली यांचेमार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल घेणेबाबतचे निर्देश अध्यक्ष यांनी दिले.

**d) न्यायालयीन बाबींबाबत कार्यवाही —**

**i) मा. दिवाणी न्यायालय, खेड येथील दावा क्र. 57/2021**

- **मा. दिवाणी न्यायालय, खेड यांजकडील दिनांक 17/03/2023 रोजीचा आदेश -**

श्री. सदानंद गंगाराम कदम यांनी मा. दिवाणी न्यायालय खेड येथे दावा क्र. 57/2021 दिनांक 01/07/2021 अन्वये दाखल केला. मा. दिवाणी न्यायालय, खेड यांनी दिनांक 19/07/2021 रोजीच्या आदेशान्वये प्रस्तुत दाव्यामध्ये जैसे-थे चे आदेश पारित केले आहेत. सदर दावा प्रकरणी दिनांक 17/03/2023 रोजी सुनावणी होवुन निशाणी 6-तुर्तातुर्त ताकिदीच्या अर्जावर आदेश पारित करण्यात आला आहे. सदर आदेशामध्ये "प्रतिवादींना (महाराष्ट्र शासन करीता जिल्हाधिकारी रत्नागिरी वगैरे) याद्वारे दाव्याचा निकाल लागेपर्यंत अर्जात वर्णन केल्याप्रमाणे दाव्याच्या मालमत्तेत (मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446) केलेले बांधकाम पाडण्यापासून तात्पुरते प्रतिबंधित करण्यात आले आहे." असे नमुद आहे.

मा. दिवाणी न्यायालय,खेड यांजकडील दिनांक 17/03/2023 चे आदेशाविरुध्द सहा. सरकारी वकील, खेड यांचेशी संपर्क साधून पुढील योग्य ती कार्यवाही करणेबाबतचे निर्देश अध्यक्ष यांनी दिले.

- **निशाणी-33 व निशाणी-35 वरील अपील/रिव्हीजनबाबत -**

मा. शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक 24/01/2023 रोजीचे पत्रान्वये जिल्हा सरकारी वकील, खेड जिल्हा व सत्र न्यायालय, ता. खेड यांना मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर खेड यांजकडील दिनांक 11/10/2022 व दिनांक 13/12/2022 रोजी पारित केलेल्या सुनावणी आदेशांविरुध्द अपिल दाखल करणेबाबत योग्य ती कार्यवाही करणेचे निर्देश दिलेले आहेत.

श्रीम. नलावडे, सहा. सरकारी वकील खेड यांनी दिनांक 20/02/2023 रोजीचे पत्रान्वये मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे निशाणी-33 वर रिट दाखल करणे व निशाणी-35 वर रिव्हिजन दाखल करणे आवश्यक असलेने नि. 33 व नि. 35 चे आदेशाविरुध्द मा. जिल्हा सत्र न्यायालय, खेड येथे अपिल, रिव्हीजन दाखल करणे अशक्य असलेबाबत मा. विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना कळविले असून सदर पत्राची प्रत या कार्यालयाकडे प्राप्त झाली आहे. सदर पत्राचे अनुषंगाने मार्गदर्शनासाठी प्रस्ताव मा. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे या कार्यालयाकडील दिनांक 08/03/2023 रोजीचे पत्रान्वये सादर करण्यात आला आहे. तथापि अदयाप पर्यंत मार्गदर्शन प्राप्त झालेले नाही.

- **हस्तांतरण अर्जाबाबत (Transfer Application) -**

मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, खेड यांचे न्यायालयात दावा क्र. रेमुनं. 57/2021 दाखल आहे. सदर दावा हस्तांतरीत करणेबाबत मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, जिल्हा न्यायालय यांचे न्यायालयात Civil M.A. 11/2023 अन्वये हस्तांतरण अर्ज दाखल करण्यात आला असुन पुढील सुनावणीची तारीख दिनांक 15/06/2023 रोजी निश्चित करण्यात आली आहे.

- **पुढील सुनावणीबाबत -**

दावा क्र. रेमुनं. 57/2021 चे प्रकरणी पुढील सुनावणीची तारीख 21/04/2023 रोजी निश्चित करण्यात आली आहे.

**ii) मा. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, पुणे येथील अर्ज क्र. 58/2021**

श्री. किरीट सोमय्या यांनी मौजे मुरुड, ता.दापोली येथील गट.नं 446 मधील बांधकामाबाबत 58/2021 अन्वये मा. राष्ट्रीय हरित लवाद वेस्टर्न झोन बेंच पुणे येथे दावा दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये उपविभागीय अधिकारी, दापोली यांचेमार्फत प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले आहे. सदर दाव्याची सुनावणी दिनांक 02/05/2023 रोजी निश्चित करण्यात आलेली आहे.

**iii) मा. दिवाणी न्यायालय,खेड येथील दावा क्र. 12/2022**

मा. पर्यावरण, वन आणि जलवायू परिवर्तन मंत्रालय, एकात्मिक प्रादेशिक कार्यालय, नागपुर द्वारा श्री. सुरेशकुमार अडप्पा, शास्त्रज्ञ-डी यांनी मा. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, खेड यांचे न्यायालयात 1. श्री. अनिल दत्तात्रय परब, 2. साई रिसॉर्ट एनएक्स 3. सी कौंच रिसॉर्ट यांचे विरुध्द पर्यावरण (संरक्षण) कायदा अधिनियम 1986 मधील कलम 19 व 15 चे 7 अन्वये रेग्युलर क्रिमीनल केस नंबर 12/2022 अन्वये दावा दाखल केलेला आहे. सदर दावा आज मितीस न्यायप्रविष्ठ असुन आरोपींचे जामीन कदबे घेण्यात आले आहेत. फिर्यादीतर्फे दोषारोपपुर्व पुरावा देणेकामी पुढील सुनावणीची तारीख दिनांक 27/04/2023 रोजी निश्चित करण्यात आलेली आहे.

**iv) मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील दावा क्र. 11125/2022**

मौजे मुरुड, ता. दापोली येथील सर्व्हे नं. 446 मधील साई रिसॉर्ट एनएक्स या रिसॉर्टचे सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत बांधकाम निष्कासीत करण्याबाबत सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल, मुंबई यांचेकडील दिनांक 31/01/2022 चे ज्ञापन व अंमलबजावणी पत्र दिनांक 22/08/2022 व उपविभागीय अधिकारी, दापोली यांचेकडील दिनांक 25/08/2022 चे पत्र रदद करण्याबाबत श्री. सदानंद गंगाराम कदम यांनी भारत सरकार व इतर यांचेविरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे Writ Petition No.11125/2022 दाखल केले आहे. सदर दाव्यामध्ये पुढील सुनावणीची तारीख दिनांक 03/04/2023 रोजी निश्चित करण्यात आलेली आहे.

**v) दाखल गुन्हयांबाबत**

- मौजे मुरुड, ता. दापोली येथील सर्व्हे नं. 446 मधील साई रिसॉर्ट एनएक्स चे बांधकाम पुर्ण नसताना कर आकारणी करणेसाठी श्री. अनिल दत्तात्रय परब यांनी अर्ज करुन शासनाची फसवणुक केलेमुळे गटविकास अधिकारी, पंचायत समिती दापोली यांनी श्री. अनिल दत्तात्रय परब व. 3 यांचेविरुध्द प्रथम खबर क्र. 0406 दिनांक 07/11/2022 अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

- मौजे मुरूड, ता. दापोली येथील गट नं. 446 या मिळकतीमधील सी कौंच रिसॉर्टचे अनधिकृत बांधकाम केलेमुळे श्री. पुष्कर श्रीकृष्ण मुळे यांचेविरुध्द पोलीस ठाणे दापोली येथे गुन्हा प्रथम खबर क्रमांक 0043 दिनांक - 08.03.2022 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच मौजे मुरूड, ता. दापोली येथील गट नं. 446 या मिळकतीमधील साई रिसॉर्ट एनएक्स चे बांधकामाबाबत जमीन मालक श्री. सदानंद गंगाराम कदम यांचेवर मंडळ अधिकारी बुरोंडी यांचेमार्फत दापोली पोलीस ठाणे येथे गुन्हा प्रथम खबर क्र. 0178 दिनांक 14/11/2022 नुसार एफआयआर दाखल करण्यात आला आहे.

## 2. मौजे मुरुड, ता. दापोली येथील समुद्र किना-यावरील साई रिसॉर्ट एनएकस/ सी कौंच रिसॉर्ट यांनी सरकारी जमिनीवर अतिक्रमण करुन बांधकाम केलेबाबत व भूमिगत ड्रेनेज पाईपलाईन बाबत - डॉ. किरीट सोमैया यांचा तक्रारी अर्ज

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 लगत पश्चिम दिशेच्या समुद्रावरील वाळूवर केलेले अतिक्रमण म.ज.म.अ.1966 चे कलम 50(3) व कलम 53 नुसार दिलेल्या नोटीसप्रमाणे संबंधितांनी शासकीय जमिनीवरील अतिक्रमण हे मुदतीत काढून टाकलेले आहे.

मौजे मुरुड, ता. दापोली येथील गट नं. 446 च्या बाहेरील अतिक्रमण करण्यात आलेली शासकीय जमीन ही गाळाने तयार झालेली किना-यालगतची जमीन (Foreshore Land) आहे. सबब सीआझेड तरतूदींचे अनुषंगाने प्रशासकीय विभाग

म्हणुन पर्यावरण (संरक्षण आणि संवर्धन) अधिनियम 1986 चे कलम 15(1) प्रमाणे फिर्याद दाखल करावी अगर कसे? याबाबत मार्गदर्शन मिळणेबाबत या कार्यालयाकडील दिनांक 18/01/2023 रोजीचे पत्रान्वये प्रस्ताव मा. संचालक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे त्यांचे अभिप्रायासह मा. शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे सादर करणेबाबत विनंती करण्यात आली आहे. तथापि अदयाप पर्यंत मार्गदर्शन प्राप्त झालेले नाही.

## 3. प्राप्त तक्रारींबाबत कार्यवाहीचा अहवाल

उपविभागीय अधिकारी यांचेकडे प्रलंबित असलेल्या तक्रारींबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे. –

| उपविभाग | माहे डिसेंबर 2022 अखेर प्रलंबित तक्रारींची संख्या | माहे जानेवारी 2023 ते मार्च 2023 मध्ये प्राप्त तक्रारींची संख्या | एकुण तक्रारींची संख्या | निकाली तक्रारींची संख्या | शिल्लक तक्रारींची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी अहवाल प्राप्त प्रकरणांची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी अहवालासाठी प्रलंबित प्रकरणांची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी न्यायालयात प्रलंबित प्रकरणे | उपविभागीय अधिकारी यांचेकडे प्रलंबित |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दापोली | 14 | 1 | 15 | 0 | 15 | 4 | 11 | 6 | 5 |
| खेड | 1 | 0 | 1 | 0 | 1 | 0 | 1 | 0 | 1 |
| चिपळूण | 5 | 0 | 5 | 0 | 5 | 3 | 2 | 2 | 0 |
| रत्नागिरी | 15 | 0 | 15 | 0 | 15 | 2 | 13 | 9 | 4 |
| राजापूर | 5 | 0 | 5 | 0 | 5 | 1 | 4 | 1 | 3 |
| | 40 | 01 | 41 | 0 | 41 | 10 | 31 | 18 | 13 |

| **उपविभाग** | **MCZMA कडील प्रलंबित तक्रारींची संख्या** | **अन्य व्यक्तींकडील प्रलंबित तक्रारींची संख्या** | **एकुण तक्रारींची संख्या** |
|---|---|---|---|
| दापोली | 1 | 10 | 11 |
| खेड | 0 | 1 | 1 |
| चिपळूण | 1 | 1 | 2 |
| रत्नागिरी | 2 | 11 | 13 |
| राजापूर | 1 | 3 | 4 |
| | 5 | 26 | 31 |

तरी प्रलंबित तक्रारी अर्जांमध्ये तात्काळ स्थळपहाणी करुन सीआरझेड तरतूदींचे अनुषंगाने कार्यवाही करुन अनुपालन अहवाल तात्काळ सादर करता येईल याकडे विशेष लक्ष पुरवावे असे निर्देश सदस्य सचिव यांनी उपविभागीय अधिकारी यांना दिले.

**प्राप्त तक्रारींबाबत सर्वसाधारण सूचना –**

१. प्रलंबित तक्रारी या ब-याच कालावधीपासून प्रलंबित असलेचे दिसून येते. तरी प्रलंबित तक्रारी अर्जांमध्ये तात्काळ स्थळपहाणी करुन सीआरझेड तरतूदींचे अनुषंगाने कार्यवाही करुन प्रकरणनिहाय अनुपालन अहवाल तात्काळ सादर करणेत येईल याकडे विशेष लक्ष पुरवावे.

२. न्यायालयीन स्तरावर प्रलंबित प्रकरणी अपिल दाखल करुन घेण्यात आले असल्यास अपिलाचा क्रमांक व सुनावणीची पुढील तारीख तपशिलामध्ये नमुद करण्यात यावी.

३. न्यायप्रविष्ट प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी यांनी पाठपुरावा करावा. तसेच सुनावणी तारखेस उपस्थित रहावे व दरमहा सदयस्थितीचा अहवाल कार्यालयास सादर करावा.

४. FIR दाखल प्रकरणांमध्ये सदयस्थितीचा अहवाल दर महाचे बैठकीपुर्वी सादर करणेबाबत सर्व उपविभागीय अधिकारी यांना सांगण्यात आले.

५. ज्या प्रकरणी नगर रचना विभाग/ भूमी अभिलेख विभागांचे अभिप्राय अपेक्षिलेले आहेत त्या प्रकरणी संबंधित विभागाने तात्काळ कार्यवाही करावी.

## सीआरझेड क्षेत्रामधील अनधिकृत बांधकामाबाबत सर्वसाधारण सूचना —

१. सर्व्हेक्षणामध्ये आढळून आलेल्या बांधकामाची यादी तयार करुन त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पाठविणेत आलेल्या विहीत नमुन्यात माहिती सादर करावी.

२. सीआरझेड क्षेत्रात बांधकामे होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

३. उपविभागीय अधिकारी यांनी त्यांचेस्तरावर संबंधित विभागाची मासिक बैठक घेवून आढावा घ्यावा.

४. अकृषीक परवानगी तसेच बांधकाम परवानगीसाठी आलेल्या अर्जांबाबत सहाय्यक संचालक नगर रचना विभागाचे अभिप्राय घ्यावेत. सागरतटिय क्षेत्रात येणा-या महानगरपालिका/नगरपालिका/ नगरपरिषदा/ग्रामपंचायत व इतर ठिकाणी कोणत्याही बांधकामास परवानगी देण्यापूर्वी महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटी किंवा केंद्रिय पर्यावरण व वन मंत्रालयाची पूर्व परवानगी प्राप्त असल्याची खातरजमा संबंधितांनी करावयाची आहे. पूर्व परवानगी नसताना सागरतटिय क्षेत्रात कोणत्याही कामांना अनुमती देण्यात येवू नये.

५. सागरतटिय क्षेत्रातील निवासी/ वाणिज्य बांधकाम प्रकरणांमध्ये नियोजनाचे अनुषंगाने सहाय्यक संचालक, नगर रचना, रत्नागिरी यांनी तात्काळ अभिप्राय सादर करावेत. तसेच दरमहा अहवाल सादर करावा.

६. सागरतटिय क्षेत्रातील निवासी/ वाणिज्य बांधकाम प्रकरणांमध्ये सीआरझेड परवानगीचे प्रस्ताव तात्काळ महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटीकडे उपविभागीय अधिकारी यांनी सादर करावेत. तसेच दरमहा अहवाल सादर करावा.

७. सीआरझेड व कांदळवनासाठी शासनाने दिलेल्या आदेशाचे पालन करावे.

८. सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत/विनापरवाना बांधकाम प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत भूमी अभिलेख विभागाकडे मोजणीसाठी पाठविण्यात येणा-या प्रकरणांमध्ये भूमी अभिलेख विभागाने शासकीय मोजणी करुन दयावी.

वरीलप्रमाणे विचारविनीमय/चर्चा करुन जे निर्णय सर्वानुमते घेण्यात आले त्याबाबत आणखी काही शंका असल्यास त्यांचे निरसन सर्वानुमते करणेसाठी त्या उपस्थित करणेबाबत समिती सदस्य व संबंधित विभाग/यंत्रणा यांना विचारणा करण्यात आली असता कोणीही शंका उपस्थित केली नाही.

उपस्थितांचे आभार मानुन बैठक समाप्त झालेचे सचिव सदस्य तथा निवासी उपजिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी जाहीर केलेवरुन बैठक समाप्त करण्यात आली.

**स्थळप्रत मा. जिल्हाधिकारी**
**यांच्या स्वाक्षरीची.**

**(चंद्रकांत सुर्यवंशी)**
सदस्य सचिव, सागरी किनारा व्यवस्थापन समिती,
रत्नागिरी तथा निवासी उपजिल्हाधिकारी

क्र. महसूल/कार्या/अे.के. ६/DCZMA/०३/२०२३
जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
दिनांक - ०६/०६/२०२३

प्रतिलिपी - सर्व संबंधितांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी

**दिनांक १५/०५/२०२३ रोजी मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समितीच्या (DCZMA) आयोजित केलेल्या सभेचे इतिवृत्त**

---

सदर सभेस खालीलप्रमाणे समितीमधील अध्यक्ष व इतर सदस्य असलेले अधिकारी/ कर्मचारी प्रत्यक्ष/वेबेक्स व्ही.सी. द्वारे उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | निवासी उपजिल्हाधिकारी | सदस्य सचिव |
| 3. | प्रतिनिधी जिल्हा पोलीस अधिक्षक, रत्नागिरी | सदस्य |
| ४. | प्रतिनिधी जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख रत्नागिरी | सदस्य |
| ५. | विभागीय वन अधिकारी चिपळूण | सदस्य |
| ६. | प्रतिनिधी सहाय्यक संचालक, नगर रचना रत्नागिरी | सदस्य |
| ७. | उपविभागीय अधिकारी रत्नागिरी | सदस्य |
| ८. | उपविभागीय अधिकारी दापोली | सदस्य |
| ९. | प्रतिनिधी उपविभागीय अधिकारी खेड | सदस्य |
| १०. | उपविभागीय अधिकारी चिपळूण | सदस्य |
| ११. | उपविभागीय अधिकारी राजापूर | सदस्य |
| १२. | उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी | सदस्य |
| १३. | जिल्हा सह आयुक्त, न.पा.प्र. शाखा (मुख्याधिकारी रत्नागिरी अतिरिक्त) | सदस्य |
| १४. | डॉ. ए.सी.ठाकूरदेसाई, प्राचार्य, गोगटे जोगळेकर कॉलेज, रत्नागिरी | सदस्य |

---

सदस्य सचिव, जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समिती, तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

1. **मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांनी केलेल्या बांधकामावर कारवाई करणेबाबत –**

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांनी केलेल्या बांधकामावर कारवाई करणेबाबत मा. MoEF&CC, नवी दिल्ली यांनी निर्गमीत केलेले दिनांक 22/08/2022 रोजीचे निर्देश या कार्यालयाकडे मा. अवर सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडून दिनांक 25/08/2022 रोजीचे पत्रान्वये प्राप्त झाले आहेत.

सदर पत्राचे अनुषंगाने यापुर्वी आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय सागरी किनारा व्यवस्थापन समिती (DCZMA) च्या बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. सदर बैठकींमध्ये संबंधीत सर्व अधिकारी/यंत्रणा यांना त्यांचे विभागाशी संबंधित विषयी करावयाच्या कार्यवाहीबाबत सविस्तर चर्चा करणेत आली व समितीचे मान्यतेने निर्णय घेण्यात आले असून सर्व संबंधीत विभागांना कार्यवाही करणेबाबतचे निर्देश देण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे आजच्या बैठकीमध्ये पुढील विषयांबाबत चर्चा होवुन केलेल्या कार्यवाहीबाबत समितीस अवगत करण्यात आले अ हे -

**a) कार्यारंभ आदेशानुसार बांधकाम निष्कासनाबाबत –**

मौजे मुरुड, ता. दापोली येथील गट क्र. 446 संदर्भात अन्य न्यायालयाकडील आदेश अथवा मा दिवाणी न्यायालय, खेड यांचे न्यायालयात दाखल दावा क्र. 57/2021 चा अंतीम आदेश यांना अधीन राहून साई रिसॉर्ट एनएक्सचे बांधकाम निष्कासन करणेच्या कार्यवाहीबाबत अलाहिदा बैठक आयोजित करुन निर्णय घेणेत येईल असे अध्यक्ष यांनी सांगितले.

**b) पर्यावरणीय नुकसान भरपाईबाबत –**

उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांनी दिनांक 14/02/2023 रोजीचे पत्रान्वये पर्यावरणीय नुकसान भरपाईची रक्कम जमीन महसूल वसूली म्हणून वसूल करणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केला आहे. श्री. अनिल परब व श्री. पुष्कर श्रीकृष्ण मुळये यांचे नांवे असलेल्या अन्य जमिनीचा/मालमत्तेचा शोध घेवून महसूल वसुली प्रमाणपत्र या कार्यालयाकडे सादर करणेबाबत उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांना या कार्यालयाकडील दिनांक 21/02/2023 रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले होते. उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांनी पुढील केलेल्या कार्यवाहीबाबत समितीस अहवाल सादर करणेचे निर्देश अध्यक्ष यांनी दिले.

**c) न्यायालयीन बाबींबाबत कार्यवाही –**

**i) मा. दिवाणी न्यायालय, खेड येथील दावा क्र.** 57/2021

- **मा. दिवाणी न्यायालय, खेड यांजकडील दिनांक 17/03/2023 रोजीचा आदेश -**

श्री. सदानंद गंगाराम कदम यांनी मा. दिवाणी न्यायालय खेड येथे दावा क्र. 57/2021 दिनांक 01/07/2021 अन्वये दाखल केला. सदर दावा प्रकरणी दिनांक 17/03/2023 रोजी सुनावणी होवुन निशाणी 6-तुर्तातुर्त ताकिदीच्या अर्जावर निर्णय झाला असून दाव्याचा निकाल लागेपर्यंत अर्जात वर्णन केल्याप्रमाणे दाव्याच्या मालमत्तेत (मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446) केलेले बांधकाम पाडण्यापासून तात्पुरते प्रतिबंधित करण्यात आलेबाबत आदेश पारित करण्यात आला आहे.

मा. दिवाणी न्यायालय,खेड यांजकडील दिनांक 17/03/2023 चे आदेशाविरुध्द मा. जिल्हा व सत्र न्यायालय, खेड येथे दिवाणी किरकोळ अपील क्र. 08/2023 दाखल करणेत आले आहे.

- **निशाणी-33 वरील अपीलबाबत -**

मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, खेड यांजकडील दिनांक 11/10/2022 पारित केलेल्या सुनावणी आदेशांविरुध्द मा. जिल्हा सत्र न्यायालय, खेड येथे अपिल दाखल करणेबाबत उपविभागीय अधिकारी दापोली यांना लेखी कळविणेत आले आहे. त्याप्रमाणे उपविभागीय अधिकारी दापोली यांनी कार्यवाही करावी.

- **हस्तांतरण अर्जाबाबत (Transfer Application) -**

मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, खेड यांचे न्यायालयात दावा क्र. रेमुनं. 57/2021 दाखल आहे. सदर दावा हस्तांतरीत करणेबाबत मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, जिल्हा न्यायालय यांचे न्यायालयात Civil M.A. 11/2023 अन्वये हस्तांतरण अर्ज दाखल करण्यात आला असुन पुढील सुनावणीची तारीख दिनांक 15/06/2023 रोजी निश्चित करण्यात आली आहे.

**ii) मा. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, पुणे येथील अर्ज क्र. 58/2021**

श्री. किरीट सोमय्या यांनी मौजे मुरुड, ता.दापोली येथील गट.नं 446 मधील बांधकामाबाबत 58/2021 अन्वये मा. राष्ट्रीय हरित लवाद वेस्टर्न झोन बेंच पुणे येथे दावा दाखल केला आहे. सदर दाव्याची सुनावणी दिनांक 02/05/2023 रोजी झाली असुन सदर दावा फेटाळून लावणेत (Dismissed) आला आहे.

**iii) मा. दिवाणी न्यायालय,खेड येथील दावा क्र. 12/2022**

मा. पर्यावरण, वन आणि जलवायू परिवर्तन मंत्रालय, एकात्मिक प्रादेशिक कार्यालय, नागपुर द्वारा श्री. सुरेशकुमार अडप्पा, शास्त्रज्ञ-डी यांनी मा. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, खेड यांचे न्यायालयात 1. श्री. अनिल दत्तात्रय परब, 2. साई रिसॉर्ट एनएक्स 3. सी कौंच रिसॉर्ट यांचे विरुध्द पर्यावरण (संरक्षण) कायदा अधिनियम 1986 मधील कलम 19 व 15 चे 7 अन्वये रेग्युलर क्रिमीनल केस नंबर 12/2022 अन्वये दावा दाखल केलेला आहे. सदर दावा आज मितीस न्यायप्रविष्ठ असुन आरोपींचे जामीन कदबे घेण्यात आले आहेत. फिर्यादीतर्फे दोषारोपपुर्व पुरावा देणेकामी पुढील सुनावणीची तारीख दिनांक 08/06/2023 रोजी निश्चित करण्यात आलेली आहे.

**iv) मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील दावा क्र. 11125/2022**

मौजे मुरुड, ता. दापोली येथील सर्व्हे नं. 446 मधील साई रिसॉर्ट एनएक्स या रिसॉर्टचे सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत बांधकाम निष्कासीत करण्याबाबत सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल, मुंबई यांचेकडील दिनांक 31/01/2022 चे ज्ञापन व अंमलबजावणी पत्र दिनांक 22/08/2022 चे पत्र रदद करण्याबाबत श्री. सदानंद गंगाराम कदम यांनी भारत सरकार व इतर यांचेविरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे Writ Petition No.11125/2022 दाखल केले आहे. सदर दाव्यामध्ये सुनावणीची तारीख दिनांक 03/04/2023 रोजी अर्जदार तर्फे वकील यांनी दिलेल्या अर्जावरुन मुळ दावा अर्जामध्ये सुधारणा (Amendment) करण्यात आलेली आहे. सदर सुधारणा अर्जानुसार अतिरिक्त मुद्दयांच्या अनुषंगाने प्रतिज्ञापत्र (Affidavit in Reply) तयार करणेची कार्यवाही जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सुरु असलेचे सांगणेत आले.

## 2. मौजे मुरुड, ता. दापोली येथील समुद्र किना-यावरील साई रिसॉर्ट एनएकस/ सी कौंच रिसॉर्ट यांनी सरकारी जमिनीवर अतिक्रमण करुन बांधकाम केलेबाबत व भूमिगत ड्रेनेज पाईपलाईन बाबत-डॉ. किरीट सोमैया यांचा तक्रारी अर्ज

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 लगत पश्चिम दिशेच्या समुद्रावरील वाळूवर केलेले अतिक्रमण म.ज.म.अ.1966 चे कलम 50(3) व कलम 53 नुसार दिलेल्या नोटीसप्रमाणे संबंधितांनी शासकीय जमिनीवरील अतिक्रमण हे मुदतीत काढून टाकलेले आहे.

मौजे मुरुड, ता. दापोली येथील गट नं. 446 च्या बाहेरील अतिक्रमण करण्यात आलेली शासकीय जमीन ही गाळाने तयार झालेली किना-यालगतची जमीन (Foreshore Land) आहे. सबब सीआझेड तरतूदींचे अनुषंगाने प्रशासकीय विभाग म्हणुन पर्यावरण (संरक्षण आणि संवर्धन) अधिनियम 1986 चे कलम 15(1) प्रमाणे फिर्याद दाखल करावी अगर कसे?याबाबत मार्गदर्शन मिळणेबाबत या कार्यालयाकडील दिनांक 18/01/2023 रोजीचे पत्रान्वये प्रस्ताव मा. संचालक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे त्यांचे अभिप्रायासह मा. शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे सादर करणेबाबत विनंती करण्यात आली आहे. तथापि अदयाप पर्यंत मार्गदर्शन प्राप्त झालेले नाही.

## 3. तत्कालीन मंडळ अधिकारी, मुरुड यांचेविरुध्द करण्यात आलेली कारवाई –

मा. जिल्हा पोलीस अधिक्षक, रत्नागिरी यांजकडील दिनांक २४/०३/२०२३ रोजीचे पत्रान्वये पोलीस निरीक्षक, दापोली पोलीस ठाणे यांजकडील दिनांक २०/०३/२०२३ रोजीचा अहवाल या कार्यालयास प्राप्त झाला आहे.

सदर अहवालाचे अवलोकन केले असता, पोलीस ठाणे दापोली यांचे येथे दाखल गुन्हा रजि.नं. १७७/२०२३ मध्ये श्री. सुधीर शांताराम पारदुले, तत्कालीन मंडळ अधिकारी मुरुड यांना आरोपी करण्यात आले असुन त्यांना दिनांक १५/०३/२०२३ रोजी अटक करण्यात आली होती. श्री. सुधीर शांताराम पारदुले, तत्कालीन मंडळ अधिकारी मुरुड यांची मा. न्यायालयाने दिनांक २०/०३/२०२३ रोजी जामीनावर मुक्तता केलेली आहे. श्री. पारदुले यांना शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

## 4. प्राप्त तक्रारींबाबत कार्यवाहीचा अहवाल

उपविभागीय अधिकारी यांचेकडे प्रलंबित असलेल्या तक्रारींबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे. —

| उपविभाग | माहे डिसेंबर 2022 अखेर प्रलंबित तक्रारींची संख्या | माहे जानेवारी 2023 ते एप्रिल 2023 मध्ये प्राप्त तक्रारींची संख्या | एकुण तक्रारींची संख्या | निकाली तक्रारींची संख्या | शिल्लक तक्रारींची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी अहवाल प्राप्त प्रकरणांची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी अहवालासाठी प्रलंबित प्रकरणांची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी न्यायालयात प्रलंबित प्रकरणे | उपविभागीय अधिकारी यांचेकडे प्रलंबित |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दापोली | 14 | 2 | 16 | 0 | 16 | 4 | 12 | 6 | 6 |
| खेड | 1 | 0 | 1 | 0 | 1 | 0 | 1 | 0 | 1 |
| चिपळूण | 5 | 2 | 7 | 0 | 7 | 3 | 4 | 2 | 2 |
| रत्नागिरी | 15 | 0 | 15 | 0 | 15 | 2 | 13 | 9 | 4 |
| राजापूर | 5 | 0 | 5 | 0 | 5 | 1 | 4 | 1 | 3 |
| | 40 | 04 | 44 | 0 | 44 | 10 | 34 | 18 | 16 |

| उपविभाग | MCZMA कडील प्रलंबित तक्रारींची संख्या | अन्य व्यक्तींकडील प्रलंबित तक्रारींची संख्या | एकुण तक्रारींची संख्या |
|---|---|---|---|
| दापोली | 1 | 11 | 12 |
| खेड | 0 | 1 | 1 |
| चिपळूण | 1 | 3 | 4 |
| रत्नागिरी | 2 | 11 | 13 |
| राजापूर | 1 | 3 | 4 |
| | 5 | 29 | 34 |

तरी प्रलंबित तक्रारी अर्जांमध्ये तात्काळ स्थळपहाणी करुन सीआरझेड तरतूदींचे अनुषंगाने कार्यवाही करुन अनुपालन अहवाल तात्काळ सादर करता येईल याकडे विशेष लक्ष पुरवावे असे निर्देश सदस्य सचिव यांनी उपविभागीय अधिकारी यांना दिले.

## प्राप्त तक्रारींबाबत सर्वसाधारण सूचना —

१. प्रलंबित तक्रारी या ब-याच कालावधीपासून प्रलंबित असलेचे दिसून येते. तरी प्रलंबित तक्रारी अर्जांमध्ये तात्काळ स्थळपहाणी करुन सीआरझेड तरतूदींचे अनुषंगाने कार्यवाही करुन प्रकरणनिहाय अनुपालन अहवाल तात्काळ सादर करणेत येईल याकडे विशेष लक्ष पुरवावे.

२. न्यायालयीन स्तरावर प्रलंबित प्रकरणांची सदयस्थिती सादर करणेबाबत सर्व उपविभागीय अधिकारी यांना सांगण्यात आले. तसेच तपशिलामध्ये दाव्याची सुनावणीची पुढील तारीख व पुढील तारखेचे कारण नमुद करण्यात यावे.

३. न्यायालयीन स्तरावर प्रलंबित प्रकरणी अपिल दाखल करुन घेण्यात आले असल्यास अपिलाचा क्रमांक व सुनावणीची पुढील तारीख तपशिलामध्ये नमुद करण्यात यावी.
४. न्यायप्रविष्ट प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी यांनी पाठपुरावा करावा. तसेच सुनावणी तारखेस उपस्थित रहावे व दरमहा सदयस्थितीचा अहवाल कार्यालयास सादर करावा.
५. FIR दाखल प्रकरणांमध्ये सदयस्थितीचा अहवाल दर महाचे बैठकीपुर्वी सादर करणेबाबत सर्व उपविभागीय अधिकारी यांना सांगण्यात आले.
६. ज्या प्रकरणी नगर रचना विभाग/ भूमी अभिलेख विभागांचे अभिप्राय अपेक्षिलेले आहेत त्या प्रकरणी संबंधित विभागाने तात्काळ कार्यवाही करावी.
७. अभिप्राय अपेक्षिलेल्या प्रकरणांमध्ये वेळोवेळी संबंधित विभागास स्मरणपत्र काढणेची कार्यवाही करणेबाबत उपविभागीय अधिकारी यांना सांगण्यात आले.

**सीआरझेड क्षेत्रामधील अनधिकृत बांधकामाबाबत सर्वसाधारण सूचना —**

१. सर्व्हेक्षणामध्ये आढळून आलेल्या बांधकामाची यादी तयार करुन त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पाठविणेत आलेल्या विहीत नमुन्यात माहिती सादर करावी.
२. सीआरझेड क्षेत्रात बांधकामे होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.
३. उपविभागीय अधिकारी यांनी त्यांचेस्तरावर संबंधित विभागाची मासिक बैठक घेवून आढावा घ्यावा.
४. अकृषीक परवानगी तसेच बांधकाम परवानगीसाठी आलेल्या अर्जांबाबत सहाय्यक संचालक नगर रचना विभागाचे अभिप्राय घ्यावेत. सागरतटिय क्षेत्रात येणा-या महानगरपालिका/नगरपालिका/ नगरपरिषदा/ग्रामपंचायत व इतर ठिकाणी कोणत्याही बांधकामास परवानगी देण्यापूर्वी महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटी किंवा केंद्रिय पर्यावरण व वन मंत्रालयाची पूर्व परवानगी प्राप्त असल्याची खातरजमा संबंधितांनी करावयाची आहे. पूर्व परवानगी नसताना सागरतटिय क्षेत्रात कोणत्याही कामांना अनुमती देण्यात येवू नये.
५. सागरतटिय क्षेत्रातील निवासी/ वाणिज्य बांधकाम प्रकरणांमध्ये नियोजनाचे अनुषंगाने सहाय्यक संचालक, नगर रचना, रत्नागिरी यांनी तात्काळ अभिप्राय सादर करावेत. तसेच दरमहा अहवाल सादर करावा.
६. सागरतटिय क्षेत्रातील निवासी/ वाणिज्य बांधकाम प्रकरणांमध्ये सीआरझेड परवानगीचे प्रस्ताव तात्काळ महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटीकडे उपविभागीय अधिकारी यांनी सादर करावेत. तसेच दरमहा अहवाल सादर करावा.
७. सीआरझेड व कांदळवनासाठी शासनाने दिलेल्या आदेशाचे पालन करावे.
८. सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत/विनापरवाना बांधकाम प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत भूमी अभिलेख विभागाकडे मोजणीसाठी पाठविण्यात येणा-या प्रकरणांमध्ये भूमी अभिलेख विभागाने शासकीय मोजणी करुन दयावी.

वरीलप्रमाणे विचारविनीमय/चर्चा करुन जे निर्णय सर्वानुमते घेण्यात आले त्याबाबत आणखी काही शंका असल्यास त्यांचे निरसन सर्वानुमते करणेसाठी त्या उपस्थित करणेबाबत समिती सदस्य व संबंधित विभाग/यंत्रणा यांना विचारणा करण्यात आली असता कोणीही शंका उपस्थित केली नाही.

उपस्थितांचे आभार मानुन बैठक समाप्त झालेचे सदस्य सचिव तथा निवासी उपजिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी जाहीर केलेवरुन बैठक समाप्त करण्यात आली.

**स्थळप्रत मा. जिल्हाधिकारी**
**यांच्या स्वाक्षरीची.**

**(चंद्रकांत सुर्यवंशी)**
सदस्य सचिव, सागरी किनारा व्यवस्थापन समिती,
रत्नागिरी तथा निवासी उपजिल्हाधिकारी

क्र. महसूल/कार्या/अ.के. ६/DCZMA/०५/२०२३
जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
दिनांक - ०६/०६/२०२३

प्रतिलिपी - सर्व संबंधितांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी

**दिनांक २६/०६/२०२३ रोजी मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समितीच्या (DCZMA) आयोजित केलेल्या सभेचे इतिवृत्त**

---

सदर सभेस खालीलप्रमाणे समितीमधील अध्यक्ष व इतर सदस्य असलेले अधिकारी/ कर्मचारी प्रत्यक्ष/वेबेक्स व्ही.सी. द्वारे उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | निवासी उपजिल्हाधिकारी | सदस्य सचिव |
| 3. | जिल्हा पोलीस अधिक्षक, रत्नागिरी | सदस्य |
| ४. | प्रतिनिधी जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख रत्नागिरी | सदस्य |
| ५. | विभागीय वन अधिकारी चिपळूण | सदस्य |
| ६. | सहाय्यक संचालक, नगर रचना रत्नागिरी | सदस्य |
| ७. | उपविभागीय अधिकारी रत्नागिरी | सदस्य |
| ८. | उपविभागीय अधिकारी संगमेश्वर (देवरुख) | सदस्य |
| ९. | उपविभागीय अधिकारी दापोली | सदस्य |
| १०. | उपविभागीय अधिकारी खेड | सदस्य |
| ११. | उपविभागीय अधिकारी चिपळूण | सदस्य |
| १२. | उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी | सदस्य |
| १३. | उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण | सदस्य |
| १४. | प्रभारी सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय रत्नागिरी | सदस्य |

---

सदस्य सचिव, जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समिती, तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

1. **मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांनी केलेल्या बांधकामावर कारवाई करणेबाबत –**

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांनी केलेल्या बांधकामावर कारवाई करणेबाबत मा. MoEF&CC, नवी दिल्ली यांनी निर्गमीत केलेले दिनांक 22/08/2022 रोजीचे निर्देश या कार्यालयाकडे मा. अवर सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडून दिनांक 25/08/2022 रोजीचे पत्रान्वये प्राप्त झाले आहेत.

सदर पत्राचे अनुषंगाने यापुर्वी आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय सागरी किनारा व्यवस्थापन समिती (DCZMA) च्या बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. सदर बैठकींमध्ये संबंधीत सर्व अधिकारी/यंत्रणा यांना त्यांचे विभागाशी संबंधित विषयी करावयाच्या कार्यवाहीबाबत सविस्तर चर्चा करणेत आली व समितीचे मान्यतेने निर्णय घेण्यात आले असून सर्व संबंधीत विभागांना कार्यवाही करणेबाबतचे निर्देश देण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे आजच्या बैठकीमध्ये पुढील विषयांबाबत चर्चा होवुन केलेल्या कार्यवाहीबाबत समितीस अवगत करण्यात आले आहे -

**a) <u>कार्यारंभ आदेशानुसार बांधकाम निष्कासनाबाबत –</u>**

मौजे मुरुड, ता. दापोली येथील गट क्र. 446 संदर्भात अन्य न्यायालयाकडील आदेश अथवा मा. दिवाणी न्यायालय, खेड यांचे न्यायालयात दाखल दावा क्र. 57/2021 चा अंतीम आदेश यांना अधीन राहून साई रिसॉर्ट एनएक्सचे बांधकाम निष्कासन करणेच्या कार्यवाहीबाबत अलाहिदा बैठक आयोजित करुन निर्णय घेणेत येईल असे अध्यक्ष यांनी सांगितले.

**b) <u>पर्यावरणीय नुकसान भरपाईबाबत –</u>**

i) उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांनी दिनांक 14/02/2023 रोजीचे पत्रान्वये पर्यावरणीय नुकसान भरपाईची रक्कम जमीन महसूल वसूली म्हणून वसूल करणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केला आहे. सदर प्रस्तावास अनुसरुन तहसीलदार खेड व तहसीलदार दापोली यांना दिनांक 21/02/2023 रोजीचे पत्रान्वये कार्यवाही करणेबाबत कळविणेत आले होते. तरी तहसीलदार खेड व तहसीलदार दापोली यांचेमार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल संबंधित उपविभागीय अधिकारी यांनी सादर करावा असे निर्देश अध्यक्ष यांनी दिले.

ii) उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांनी दिनांक 14/02/2023 रोजीचे पत्रान्वये पर्यावरणीय नुकसान भरपाईची रक्कम जमीन महसूल वसूली म्हणून वसूल करणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केला आहे. श्री. अनिल परब व श्री. पुष्कर श्रीकृष्ण मुळये यांचे नांवे असलेल्या अन्य जमिनीचा/मालमत्तेचा शोध घेवून महसूल वसुली प्रमाणपत्र या कार्यालयाकडे सादर करणेबाबत उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांना या कार्यालयाकडील दिनांक 21/02/2023 रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले होते. उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांना दिनांक 15/05/2023 रोजीच्या बैठकीमध्ये पुढील केलेल्या कार्यवाहीबाबत अहवाल सादर करणेचे निर्देश देण्यात आले होते. तथापि उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांचा अहवाल अदयापपर्यंत प्राप्त झालेला नाही. तरी उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांनी उक्त प्रकरणी केलेल्या पुढील कार्यवाहीबाबत समितीस अवगत करणेबाबत अध्यक्ष यांनी पुनश्च निर्देश दिले.

**c) <u>न्यायालयीन बाबींबाबत कार्यवाही –</u>**

**i) <u>मा. दिवाणी न्यायालय, खेड येथील दावा क्र. 57/2021</u>**

- **मा. दिवाणी न्यायालय, खेड यांजकडील दिनांक 17/03/2023 रोजीचा आदेश -**

मा. दिवाणी न्यायालय,खेड यांजकडील दिनांक 17/03/2023 चे आदेशाविरुध्द मा. जिल्हा व सत्र न्यायालय, खेड येथे दिवाणी किरकोळ अपील क्र. 08/2023 दाखल करणेत आले आहे. सदर अपीलाची पुढील सुनावणीची तारीख दिनांक 07/07/2023 रोजी निश्चित करण्यात आली आहे.

- **<u>निशाणी-33 वरील अपीलबाबत -</u>**

मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, खेड यांजकडील दिनांक 11/10/2022 पारित केलेल्या सुनावणी आदेशांविरुध्द मा. जिल्हा सत्र न्यायालय, खेड येथे अपिल दाखल करणेबाबत उपविभागीय अधिकारी दापोली यांना लेखी कळविणेत आले होते.

तथापि, प्रस्तुत प्रकरणी मा. विधी व न्याय विभागाने दिनांक 01/06/2023 रोजीच्या पत्रान्वये मा. सरकारी वकील, उच्च न्यायालय, मुंबई (रिट शाखा) यांना दिनांक 11/10/2022 चे आदेशाविरुध्द अपील दाखल करणेकामी सूचित करण्यात आले आहे. त्यानुषंगाने सदर न्यायालयीन प्रकरणी आवश्यक ती कागदपत्रे सरकारी वकील, उच्च न्यायालय, मुंबई यांना पुरविण्याबाबत तसेच संबंधित प्रकरणी वेळोवेळी होणा-या सुनावणीस उपस्थित राहून वस्तुस्थिती शासनास अवगत करणेबाबतचे निर्देश मा. शासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडील दिनांक 05/06/2023 रोजीचे पत्रान्वये या कार्यालयास प्राप्त झाले आहेत.

त्यानुषंगाने या कार्यालयाकडील दिनांक 06/06/2023 रोजीचे पत्रान्वये मा. सरकारी वकील, उच्च न्यायालय, मुंबई (रिट शाखा) यांचेशी संपर्क साधुन आवश्यक ती कागदपत्रे संबंधितांना पुरविणेकामी तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे न्यायालयात निशाण 33 वरील दिनांक 11/10/2022 चे आदेशाविरुध्द कायदेशीर प्रक्रियेनुसार फेरतपासणी अपील दाखल करणेकामी व सुनावणी उपस्थित राहणेकामी उपविभागीय अधिकारी दापोली, उपविभाग दापोली यांना प्राधिकृत करण्यात आले होते.

उपविभागीय अधिकारी दापोली हे अपील दाखल करणेकामी दिनांक 12/06/2023 रोजी मा. सरकारी वकील, उच्च न्यायालय, मुंबई (अपील शाखा) यांची भेट घेतली असता या कार्यालयाकडील दिनांक 06/06/2023 रोजीचे पत्रामध्ये मा. सरकारी वकील, उच्च न्यायालय, मुंबई (रिट शाखा) असे नमुद असून त्याऐवजी अपील शाखा असे शुध्दीपत्रक तयार करुन मिळणेबाबतच्या सूचना मा. सरकारी वकील, उच्च न्यायालय, मुंबई (अपील शाखा) यांनी दिले असलेबाबत या कार्यालयास दिनांक 14/06/2023 रोजीचे पत्रान्वये या कार्यालयास कळविले आहे.

प्रस्तुत प्रकरणी मा. विधी व न्याय विभागाने दिनांक 01/06/2023 रोजीच्या पत्रान्वये मा. सरकारी वकील, उच्च न्यायालय, मुंबई (रिट शाखा) यांना दिनांक 11/10/2022 चे आदेशाविरुध्द अपील दाखल करणेकामी सूचित केलेले असलेमुळे, रिट शाखे ऐवजी अपील शाखा यांना पुढील निर्देश देणेकामी मा. विधी व न्यायविभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे अभिप्रायासह पुनश्च प्रस्ताव सादर करणेबाबत मा. शासन, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे विनंती करणेत आली आहे.

- **हस्तांतरण अर्जाबाबत (Transfer Application) -**

मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, खेड यांचे न्यायालयात दावा क्र. रेमुनं. 57/2021 दाखल आहे. सदर दावा हस्तांतरीत करणेबाबत मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, जिल्हा न्यायालय यांचे न्यायालयात Civil M.A. 11/2023 अन्वये हस्तांतरण अर्ज दाखल करण्यात आला असुन पुढील सुनावणीची तारीख दिनांक 26/07/2023 रोजी निश्चित करण्यात आली आहे.

- **पुढील सुनावणी –**

रेमुनं. 57/2021 दाव्यामध्ये पुढील सुनावणीची तारीख दिनांक 30/06/2023 रोजी निश्चित करण्यात आली आहे.

**ii) मा. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, पुणे येथील अर्ज क्र. 58/2021**

श्री. किरीट सोमय्या यांनी मौजे मुरुड, ता.दापोली येथील गट.नं 446 मधील बांधकामाबाबत 58/2021 अन्वये मा. राष्ट्रीय हरित लवाद वेस्टर्न झोन बेंच पुणे येथे दावा दाखल केला आहे. सदर दाव्याची सुनावणी दिनांक 02/05/2023 रोजी झाली असुन सदर दावा फेटाळून लावणेत (Dismissed) आला आहे.

**iii) मा. दिवाणी न्यायालय,खेड येथील दावा क्र. 12/2022**

मा. पर्यावरण, वन आणि जलवायू परिवर्तन मंत्रालय, एकात्मिक प्रादेशिक कार्यालय, नागपुर द्वारा श्री. सुरेशकुमार अडप्पा, शास्त्रज्ञ-डी यांनी मा. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, खेड यांचे न्यायालयात 1. श्री. अनिल दत्तात्रय परब, 2. साई

रिसॉर्ट एनएक्स 3. सी कौंच रिसॉर्ट यांचे विरुध्द पर्यावरण (संरक्षण) कायदा अधिनियम 1986 मधील कलम 19 व 15 चे 7 अन्वये रेग्युलर क्रिमीनल केस नंबर 12/2022 अन्वये दावा दाखल केलेला आहे. सदर दावा आज मितीस न्यायप्रविष्ठ असुन आरोपींचे जामीन कदबे घेण्यात आले आहेत. फिर्यादीतर्फे दोषारोपपुर्व पुरावा देणेकामी पुढील सुनावणीची तारीख दिनांक 13/07/2023 रोजी निश्चित करण्यात आलेली आहे.

iii) **<u>मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील दावा क्र. 11125/2022</u>**

मौजे मुरुड, ता. दापोली येथील सर्व्हे नं. 446 मधील साई रिसॉर्ट एनएक्स या रिसॉर्टचे सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत बांधकाम निष्कासीत करण्याबाबत सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल, मुंबई यांचेकडील दिनांक 31/01/2022 चे ज्ञापन व अंमलबजावणी पत्र दिनांक 22/08/2022 व उपविभागीय अधिकारी, दापोली यांचेकडील दिनांक 25/08/2022 चे पत्र रदद करण्याबाबत श्री. सदानंद गंगाराम कदम यांनी भारत सरकार व इतर यांचेविरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे Writ Petition No.11125/2022 दाखल केले आहे.

सदर दाव्यामध्ये सदर दाव्यामध्ये सुनावणीची तारीख दिनांक 03/04/2023 रोजी अर्जदार तर्फे वकील यांनी दिलेल्या अर्जावरुन मुळ दावा अर्जामध्ये सुधारणा (Amendment) करण्यात आलेली आहे. सदर सुधारणा अर्जानुसार अतिरिक्त मुद्दयांच्या अनुषंगाने प्रतिज्ञापत्र (Affidavit in Reply) तयार करणेची कार्यवाही या कार्यालयामार्फत सुरु आहे.

उक्त दावा प्रकरणी दुरुस्ती अर्जाच्या (Amendment) अनुषंगाने या कार्यालयातर्फे म्हणणे (Affidavit in Reply) मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल करणेकामी तसेच तद्नुषंगीक आवश्यक कायदेशीर बाबींची पुर्तता करणेकामी ॲड. श्री. राजीव एम. कुमार, वरीष्ठ वकील यांची विशेष अभियोक्ता (Special Counsel) म्हणुन नियुक्ती करुन मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. शासन, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई यांचेमार्फत मा. शासन, विधी व न्यायविभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे दिनांक 02/06/2023 रोजीच्या पत्रान्वये सादर करणेत आला होता.

प्रस्तुत प्रकरणी मा. विधी व न्यायविभागाने दिनांक 07/06/2023 च्या पत्रान्वये मा. सरकारी वकील, उच्च न्यायालय, मुंबई (रिट सेल) यांना प्रस्तुत प्रकरणी ॲड. राजीव कुमार, वरिष्ठ वकील यांची विशेष अभियोक्ता (Special Counsel) म्हणून नियुक्ती करण्यास मान्यता दिलेली असलेबाबत मा. शासन, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक 07/06/2023 रोजीचे पत्रान्वये या कार्यालयास कळविले आहे.

तरी उक्त प्रकरणी विशेष अभियोक्ता (Special Counsel) म्हणून नियुक्ती झालेबाबत ॲड. राजीव कुमार, वरिष्ठ वकील यांना तसेच ॲड. राजीव कुमार, वरिष्ठ वकील यांचेशी संपर्क साधून आवश्यक ती माहिती व कागदपत्रे पुरविणेबाबत उपविभागीय अधिकारी दापोली यांना या कार्यालयाकडील दिनांक 07/06/2023 रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले आहे. त्याप्रमाणे ॲड. राजीव कुमार, वरिष्ठ वकील दिनांक 12/06/2023 रोजीच्या सुनावणी तारखेस उपस्थित राहिलेले आहेत.

पुढील सुनावणीची तारीख दिनांक 28/06/2023 रोजी निश्चित करण्यात आलेली आहे.

## 2. मौजे मुरुड, ता. दापोली येथील समुद्र किना-यावरील साई रिसॉर्ट एनएकस/ सी कौंच रिसॉर्ट यांनी सरकारी जमिनीवर अतिक्रमण करुन बांधकाम केलेबाबत व भूमिगत ड्रेनेज पाईपलाईन बाबत - डॉ. किरीट सोमैया यांचा तक्रारी अर्ज

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 लगत पश्चिम दिशेच्या समुद्रावरील वाळूवर केलेले अतिक्रमण म.ज.म.अ.1966 चे कलम 50(3) व कलम 53 नुसार दिलेल्या नोटीसप्रमाणे संबंधितांनी शासकीय जमिनीवरील अतिक्रमण हे मुदतीत काढून टाकलेले आहे.

मौजे मुरुड, ता. दापोली येथील गट नं. 446 च्या बाहेरील अतिक्रमण करण्यात आलेली शासकीय जमीन ही गाळाने तयार झालेली किना-यालगतची जमीन (Foreshore Land) आहे. सबब सीआझेड तरतूदींचे अनुषंगाने प्रशासकीय विभाग म्हणुन पर्यावरण (संरक्षण आणि संवर्धन) अधिनियम 1986 चे कलम 15(1) प्रमाणे फिर्याद दाखल करावी अगर कसे? याबाबत मार्गदर्शन मिळणेबाबत या कार्यालयाकडील दिनांक 18/01/2023 रोजीचे पत्रान्वये प्रस्ताव मा. संचालक, पर्यावरण

व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे त्यांचे अभिप्रायासह मा. शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे सादर करणेबाबत विनंती करण्यात आली आहे. तथापि अदयाप पर्यंत मार्गदर्शन प्राप्त झालेले नाही.

## 3. तत्कालीन मंडळ अधिकारी, मुरुड यांचेविरुध्द करण्यात आलेली कारवाई –

मा. जिल्हा पोलीस अधिक्षक, रत्नागिरी यांजकडील दिनांक २४/०३/२०२३ रोजीचे पत्रान्वये पोलीस निरीक्षक, दापोली पोलीस ठाणे यांजकडील दिनांक २०/०३/२०२३ रोजीचा अहवाल या कार्यालयास प्राप्त झाला आहे.

सदर अहवालाचे अवलोकन केले असता, पोलीस ठाणे दापोली यांचे येथे दाखल गुन्हा रजि. नं. १७७/२०२३ मध्ये श्री. सुधीर शांताराम पारदुले, तत्कालीन मंडळ अधिकारी मुरुड यांना आरोपी करण्यात आले असुन त्यांना दिनांक १५/०३/२०२३ रोजी अटक करण्यात आली होती. श्री. सुधीर शांताराम पारदुले, तत्कालीन मंडळ अधिकारी मुरुड यांची मा. न्यायालयाने दिनांक २०/०३/२०२३ रोजी जामीनावर मुक्तता केलेली आहे. श्री. पारदुले यांना या कार्यालयाकडील दिनांक २३/०३/२०२३ रोजीचे आदेशान्वये दिनांक १५/०३/२०२३ रोजीपासुन शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

## 4. प्राप्त तक्रारींबाबत कार्यवाहीचा अहवाल

उपविभागीय अधिकारी यांचेकडे प्रलंबित असलेल्या तक्रारींबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे. –

| उपविभाग | माहे डिसेंबर 2022 अखेर प्रलंबित तक्रारींची संख्या | माहे जानेवारी 2023 ते जून 2023 मध्ये प्राप्त तक्रारींची संख्या | एकुण तक्रारींची संख्या | निकाली तक्रारींची संख्या | शिल्लक तक्रारींची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी अहवाल प्राप्त प्रकरणांची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी अहवालासाठी प्रलंबित प्रकरणांची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी न्यायालयात प्रलंबित प्रकरणे | उपविभागीय अधिकारी यांचेकडे प्रलंबित |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दापोली | 14 | 2 | 16 | 0 | 16 | 4 | 12 | 6 | 6 |
| खेड | 1 | 0 | 1 | 0 | 1 | 0 | 1 | 0 | 1 |
| चिपळूण | 5 | 2 | 7 | 0 | 7 | 3 | 4 | 2 | 2 |
| रत्नागिरी | 15 | 0 | 15 | 0 | 15 | 2 | 13 | 9 | 4 |
| राजापूर | 5 | 0 | 5 | 0 | 5 | 1 | 4 | 1 | 3 |
| | 40 | 04 | 44 | 0 | 44 | 10 | 34 | 18 | 16 |

| **उपविभाग** | **MCZMA कडील प्रलंबित तक्रारींची संख्या** | **अन्य व्यक्तींकडील प्रलंबित तक्रारींची संख्या** | **एकुण तक्रारींची संख्या** |
|---|---|---|---|
| दापोली | 1 | 11 | 12 |
| खेड | 0 | 1 | 1 |
| चिपळूण | 1 | 3 | 4 |
| रत्नागिरी | 2 | 11 | 13 |
| राजापूर | 1 | 3 | 4 |
| | 5 | 29 | 34 |

तरी प्रलंबित तक्रारी अर्जांमध्ये तात्काळ स्थळपहाणी करुन सीआरझेड तरतूदींचे अनुषंगाने कार्यवाही करुन अनुपालन अहवाल तात्काळ सादर करता येईल याकडे विशेष लक्ष पुरवावे असे निर्देश सदस्य सचिव यांनी उपविभागीय अधिकारी यांना दिले.

तसेच माहे जानेवारी 2023 पुर्वीच्या प्रलंबित प्रकरणांमध्ये तात्काळ कार्यवाही करुन त्यांचे चौकशी अहवाल पुढील बैठकीपुर्वी या कार्यालयाकडे सादर करणेबाबत सर्व उपविभागीय अधिकारी तथा सदस्य यांना अध्यक्ष यांनी निर्देश दिले.

**<u>प्राप्त तक्रारींबाबत सर्वसाधारण सूचना</u>** –

१. प्रलंबित तक्रारी या ब-याच कालावधीपासून प्रलंबित असलेचे दिसून येते. तरी प्रलंबित तक्रारी अर्जांमध्ये तात्काळ स्थळपहाणी करुन सीआरझेड तरतूदींचे अनुषंगाने कार्यवाही करुन प्रकरणनिहाय अनुपालन अहवाल तात्काळ सादर करणेत येईल याकडे विशेष लक्ष पुरवावे.
२. न्यायालयीन स्तरावर प्रलंबित प्रकरणांची सदयस्थिती सादर करणेबाबत सर्व उपविभागीय अधिकारी यांना सांगण्यात आले. तसेच तपशिलामध्ये दाव्याची सुनावणीची पुढील तारीख व पुढील तारखेचे कारण नमुद करण्यात यावे.
३. न्यायालयीन स्तरावर प्रलंबित प्रकरणी अपिल दाखल करुन घेण्यात आले असल्यास अपिलाचा क्रमांक व सुनावणीची पुढील तारीख तपशिलामध्ये नमुद करण्यात यावी.
४. न्यायप्रविष्ट प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी यांनी पाठपुरावा करावा. तसेच सुनावणी तारखेस उपस्थित रहावे व दरमहा सदयस्थितीचा अहवाल कार्यालयास सादर करावा.
५. FIR दाखल प्रकरणांमध्ये सदयस्थितीचा अहवाल दर महाचे बैठकीपुर्वी सादर करणेबाबत सर्व उपविभागीय अधिकारी यांना सांगण्यात आले.
६. ज्या प्रकरणी नगर रचना विभाग/ भूमी अभिलेख विभागांचे अभिप्राय अपेक्षिलेले आहेत त्या प्रकरणी संबंधित विभागाने तात्काळ कार्यवाही करावी.
७. अभिप्राय अपेक्षिलेल्या प्रकरणांमध्ये वेळोवेळी संबंधित विभागास स्मरणपत्र काढणेची कार्यवाही करणेबाबत उपविभागीय अधिकारी यांना सांगण्यात आले.

**<u>सीआरझेड क्षेत्रामधील अनधिकृत बांधकामाबाबत सर्वसाधारण सूचना</u>** –

१. सर्व्हेक्षणामध्ये आढळून आलेल्या बांधकामाची यादी तयार करुन त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पाठविणेत आलेल्या विहीत नमुन्यात माहिती सादर करावी.
२. सीआरझेड क्षेत्रात बांधकामे होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.
३. उपविभागीय अधिकारी यांनी त्यांचेस्तरावर संबंधित विभागाची मासिक बैठक घेवून आढावा घ्यावा.
४. अकृषीक परवानगी तसेच बांधकाम परवानगीसाठी आलेल्या अर्जांबाबत सहाय्यक संचालक नगर रचना विभागाचे अभिप्राय घ्यावेत. सागरतटिय क्षेत्रात येणा-या महानगरपालिका/नगरपालिका/ नगरपरिषदा/ग्रामपंचायत व इतर ठिकाणी कोणत्याही बांधकामास परवानगी देण्यापूर्वी महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटी किंवा केंद्रिय पर्यावरण व वन मंत्रालयाची पूर्व परवानगी प्राप्त असल्याची खातरजमा संबंधितांनी करावयाची आहे. पूर्व परवानगी नसताना सागरतटिय क्षेत्रात कोणत्याही कामांना अनुमती देण्यात येवू नये.
५. सागरतटिय क्षेत्रातील निवासी/ वाणिज्य बांधकाम प्रकरणांमध्ये नियोजनाचे अनुषंगाने सहाय्यक संचालक, नगर रचना, रत्नागिरी यांनी तात्काळ अभिप्राय सादर करावेत. तसेच दरमहा अहवाल सादर करावा.
६. सागरतटिय क्षेत्रातील निवासी/ वाणिज्य बांधकाम प्रकरणांमध्ये सीआरझेड परवानगीचे प्रस्ताव तात्काळ महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटीकडे उपविभागीय अधिकारी यांनी सादर करावेत. तसेच दरमहा अहवाल सादर करावा.
७. सीआरझेड व कांदळवनासाठी शासनाने दिलेल्या आदेशाचे पालन करावे.
८. सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत/विनापरवाना बांधकाम प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत भूमी अभिलेख विभागाकडे मोजणीसाठी पाठविण्यात येणा-या प्रकरणांमध्ये भूमी अभिलेख विभागाने शासकीय मोजणी करुन दयावी.

वरीलप्रमाणे विचारविनीमय/चर्चा करुन जे निर्णय सर्वानुमते घेण्यात आले त्याबाबत आणखी काही शंका असल्यास त्यांचे निरसन सर्वानुमते करणेसाठी त्या उपस्थित करणेबाबत समिती सदस्य व संबंधित विभाग/यंत्रणा यांना विचारणा करण्यात आली असता कोणीही शंका उपस्थित केली नाही.

पुढील बैठकीस जे सदस्य असतील (उपविभागीय अधिकारी वगळून) त्यांनी प्रत्यक्ष बैठकीस उपस्थित राहणेचे असून प्रतिनिधी पाठवू नयेत तसेच बैठकीस उपस्थित राहता येणे शक्य नसल्यास अध्यक्ष यांची पुर्वपरवानगी घेणेची आहे अशा सूचना अध्यक्ष यांनी दिल्या.

उपस्थितांचे आभार व्यक्त करुन बैठक समाप्त झालेचे सदस्य सचिव तथा निवासी उपजिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी जाहीर केलेवरुन बैठक समाप्त करण्यात आली.

**स्थळप्रत मा. जिल्हाधिकारी**
**यांच्या स्वाक्षरीची.**

(चंद्रकांत सुर्यवंशी)
सदस्य सचिव, सागरी किनारा व्यवस्थापन समिती,
रत्नागिरी तथा निवासी उपजिल्हाधिकारी

क्र. महसूल/कार्या/अे.के. ६/DCZMA/०६/२०२३
जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
दिनांक - १४/०७/२०२३

प्रतिलिपी - सर्व संबंधितांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी

**दिनांक २४/०७/२०२३ रोजी मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समितीच्या (DCZMA) आयोजित केलेल्या सभेचे इतिवृत्त**

---

सदर सभेस खालीलप्रमाणे समितीमधील अध्यक्ष व इतर सदस्य असलेले अधिकारी/ कर्मचारी प्रत्यक्ष/वेबेक्स व्ही.सी. द्वारे उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| 2. | जिल्हा पोलीस अधिक्षक, रत्नागिरी | सदस्य |
| ३. | जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख रत्नागिरी | सदस्य |
| ४. | विभागीय वन अधिकारी चिपळूण | सदस्य |
| ५. | सहाय्यक संचालक, नगर रचना रत्नागिरी | सदस्य |
| ६. | सहाय्यक आयुक्त, मत्स्य व्यवसाय रत्नागिरी | सदस्य |
| ७. | उपविभागीय अधिकारी रत्नागिरी | सदस्य |
| ८. | उपविभागीय अधिकारी दापोली | सदस्य |
| ९. | उपविभागीय अधिकारी खेड | सदस्य |
| १०. | उपविभागीय अधिकारी चिपळूण | सदस्य |
| ११. | उपविभागीय अधिकारी राजापूर | सदस्य |
| १२. | उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी/ चिपळूण (अतिरिक्त) | सदस्य |
| १३. | मुख्याधिकारी नगर परिषद रत्नागिरी तथा जिल्हा सह आयुक्त, नपाप्र रत्नागिरी | सदस्य |
| १४. | मुख्याधिकारी नगरपंचायत गुहागर (अतिरिक्त कार्यभार) | सदस्य |
| १५. | डॉ. ए.सी.ठाकूरदेसाई, प्राचार्य, गोगटे जोगळेकर कॉलेज रत्नागिरी | सदस्य |
| १६. | निवासी उपजिल्हाधिकारी | सदस्य सचिव |

तसेच वरील समिती सदस्यां व्यतिरीक्त खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी प्रत्यक्ष बैठकीस उपस्थित राहिलेले आहेत.

१. प्रादेशिक बंदर अधिकारी रत्नागिरी करीता बंदर निरीक्षक, दाभोळ

२. वनक्षेत्रपाल, कांदळवन कक्ष रत्नागिरी

---

सदस्य सचिव, जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समिती, तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

## 1. मौजे अंजनवेल, ता. गुहागर येथे कोकण एल.एन.जी. प्रा.लि. कंपनीसाठीच्या ब्रेक वॉटर वॉलच्या विस्तारीकरणाच्या सुरु असलेल्या कामाबाबत -

मौजे अंजनवेल, ता. गुहागर येथे कोकण एल.एन.जी. प्रा.लि. कंपनीसाठीच्या ब्रेक वॉटर वॉलच्या विस्तारीकरणाचे काम सुरु असलेबाबत श्री. विठ्ठल (बावा) विष्णू भालेकर, मु.पो. वेलदूर, ता. गुहागर, जि. रत्नागिरी तथा सदस्य (DCZMA)

यांच्या दिनांक 11/10/2022 रोजीच्या तक्रारी अर्जाचे अनुषंगाने उपविभागीय अधिकारी चिपळूण, उपविभाग चिपळूण यांचा दिनांक 18/04/2023 रोजीचे पत्रान्वये चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे.

सदर अहवालानुसार मौजे अंजनवेल, ता. गुहागर येथील समुद्रामध्ये कोंकण एलएनजी मार्फत ब्रेक वॉटरच्या कामाकरीता समुद्रामध्ये विदयमान जेट्टी व्यतिरिक्त विनापरवाना वाढीव बांधकाम केलेचे आढळून आले आहे. प्रस्तुत विदयमान जेट्टीच्या व्यतिरिक्त वाढीव जेट्टीचे बांधकामाबाबत पुढील कार्यवाही महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांचे अखत्यारीत येत असुन त्यानुषंगाने महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड मार्फत पुढील कार्यवाही होणे आवश्यक आहे, असा अहवाल उपविभागीय अधिकारी चिपळूण यांनी सादर केला आहे.

प्रस्तुत प्रकरणी सदयस्थितीचा वस्तुनिष्ठ अहवाल प्रादेशिक बंदर अधिकारी, रत्नागिरी मेरीटाईम बोर्ड यांचे अभिप्रायासह सादर करणेबाबत बंदर निरीक्षक, दाभोळ यांना अध्यक्ष यांनी निर्देश दिले. तसेच उपविभागीय अधिकारी चिपळूण, उपविभाग चिपळूण यांना सदयस्थितीबाबत वस्तुनिष्ठ अहवाल सादर करणेबाबत अध्यक्ष यांनी निर्देश दिले.

## 2. Status of violation cases and action taken on violation cases by States/Union Territories as per CRZ Notifications, 2011/2019

मा. अवर सचिव, पर्यावरण विभाग, मुंबई यांजकडील दिनांक 15/06/2023 रोजीच्या पत्रान्वये सीआरझेड क्षेत्रामध्ये सीआरझेड तरतूदींचे उल्लंघन करुन करण्यात आलेली अनधिकृत बांधकामे, त्यांची सदयस्थिती व त्यावर केलेल्या कारवाईचा अहवाल सादर करणेचे निर्देश दिलेले आहेत.

त्यानुषंगाने दिनांक 27/06/2023 अन्वये उपविभागीय अधिकारी (सर्व) यांना त्यांचे उपविभागाची तालुकानिहाय माहिती सादर करणेबाबत कळविणेत आले होते. उपविभागीय अधिकारी रत्नागिरी व दापोली यांजकडील अहवाल प्राप्त झाला असुन उपविभागीय अधिकारी खेड/चिपळूण/राजापूर यांजकडील अहवाल अदयाप पर्यंत अप्राप्त आहे. तरी उपविभागीय अधिकारी खेड/चिपळूण/राजापूर यांनी तात्काळ अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करणेबाबत अध्यक्ष यांनी निर्देश दिले.

## 3. मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांनी केलेल्या बांधकामावर कारवाई करणेबाबत -

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांनी केलेल्या बांधकामावर कारवाई करणेबाबत मा. MoEF&CC, नवी दिल्ली यांनी निर्गमीत केलेले दिनांक 22/08/2022 रोजीचे निर्देश या कार्यालयाकडे मा. अवर सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडून दिनांक 25/08/2022 रोजीचे पत्रान्वये प्राप्त झाले आहेत.

सदर पत्राचे अनुषंगाने आयोजित जिल्हास्तरीय सागरी किनारा व्यवस्थापन समिती (DCZMA) च्या बैठकीमध्ये समितीचे मान्यतेने निर्णय घेण्यात आले असून संबंधीत सर्व अधिकारी/यंत्रणा यांना कार्यवाही करणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

**a) कार्यारंभ आदेशानुसार बांधकाम निष्कासनाबाबत –**

मौजे मुरुड, ता. दापोली येथील गट क्र. 446 संदर्भात अन्य न्यायालयाकडील आदेश अथवा मा. दिवाणी न्यायालय, खेड यांचे न्यायालयात दाखल दावा क्र. 57/2021 चा अंतीम आदेश यांना अधीन राहून साई रिसॉर्ट एनएक्सचे बांधकाम निष्कासन करणेच्या कार्यवाहीबाबत निर्णय घेणेत येईल.

**b) पर्यावरणीय नुकसान भरपाईबाबत –**

उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांनी दिनांक 14/02/2023 रोजीचे पत्रान्वये पर्यावरणीय नुकसान भरपाईची रक्कम जमीन महसूल वसूली म्हणून वसूल करणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केला आहे. श्री. अनिल परब व श्री. पुष्कर श्रीकृष्ण मुळये यांचे नांवे असलेल्या अन्य जमिनीचा/मालमत्तेचा शोध घेवून महसूल वसुली प्रमाणपत्र या कार्यालयाकडे सादर करणेबाबत उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांना या कार्यालयाकडील दिनांक 21/02/2023 रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले आहे. तसेच केलेल्या कार्यवाहीबाबत समितीस अवगत करणेबाबत मासिक बैठकीमध्ये निर्देश देण्यात आले होते.

सदर बैठकीच्या इतिवृत्ताच्या अनुषंगाने उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांनी दिनांक 12/07/2023 रोजीचे पत्रान्वये ई-मेल द्वारे अहवाल या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. सदर अहवालानुसार विविध कार्यालयांकडून प्राप्त अहवालानुसार श्री. अनिल दत्तात्रय परब यांचे नांवे स्थावर जंगम मालमत्ता दाखल असल्याचे दिसून येत नाही. तसेच श्री. पुष्कर मुळये यांचे जमिनीचा/ मालमत्तेचा शोध घेण्यासाठी संबंधित कार्यालयांकडे पत्रव्यवहार करणेत आलेचे नमुद करण्यात आले आहे. तरी पर्यावरणीय नुकसान भरपाईची रक्कम जमीन महसूल वसूली म्हणून वसूल करणेबाबत उक्त माहितीची पुर्तता करुन महसूल वसुली प्रमाणपत्र जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करणेबाबत पुढील योग्य ती कार्यवाही उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांनी करावी असे निर्देश अध्यक्ष यांनी दिले.

**c) न्यायालयीन बाबींबाबत कार्यवाही –**

**i)** मा. दिवाणी न्यायालय, खेड येथील दावा क्र. 57/2021

- **मा. दिवाणी न्यायालय, खेड यांजकडील दिनांक 17/03/2023 रोजीचा आदेश -**

मा. दिवाणी न्यायालय, खेड यांजकडील दिनांक 17/03/2023 चे आदेशाविरुध्द मा. जिल्हा व सत्र न्यायालय, खेड येथे दिवाणी किरकोळ अपील क्र. 08/2023 दाखल करणेत आले असुन सदर अपीलाची पुढील सुनावणीची तारीख दिनांक 04/08/2023 रोजी निश्चित करण्यात आली आहे.

- **निशाणी-33 वरील अपीलबाबत -**

मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, खेड यांजकडील दिनांक 11/10/2022 पारित केलेल्या सुनावणी आदेशांविरुध्द मा. जिल्हा सत्र न्यायालय, खेड येथे अपिल दाखल करणेबाबत उपविभागीय अधिकारी दापोली यांना लेखी कळविणेत आले होते.

तथापि, प्रस्तुत प्रकरणी मा. विधी व न्याय विभागाने दिनांक 01/06/2023 रोजीच्या पत्रान्वये मा. सरकारी वकील, उच्च न्यायालय, मुंबई (रिट शाखा) यांना दिनांक 11/10/2022 चे आदेशाविरुध्द अपील दाखल करणेकामी सूचित करण्यात आले आहे. त्यानुषंगाने सदर न्यायालयीन प्रकरणी आवश्यक ती कागदपत्रे सरकारी वकील, उच्च न्यायालय, मुंबई यांना पुरविण्याबाबत तसेच संबंधित प्रकरणी वेळोवेळी होणा-या सुनावणीस उपस्थित राहून वस्तुस्थिती शासनास अवगत करणेबाबतचे निर्देश मा. शासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडील दिनांक 05/06/2023 रोजीचे पत्रान्वये या कार्यालयास प्राप्त झाले आहेत.

त्यानुषंगाने या कार्यालयाकडील दिनांक 06/06/2023 रोजीचे पत्रान्वये मा. सरकारी वकील, उच्च न्यायालय, मुंबई (रिट शाखा) यांचेशी संपर्क साधुन आवश्यक ती कागदपत्रे संबंधितांना पुरविणेकामी तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे न्यायालयात निशाण 33 वरील दिनांक 11/10/2022 चे आदेशाविरुध्द कायदेशीर प्रक्रियेनुसार फेरतपासणी अपील दाखल करणेकामी व सुनावणी उपस्थित राहणेकामी उपविभागीय अधिकारी दापोली, उपविभाग दापोली यांना प्राधिकृत करण्यात आले होते.

उपविभागीय अधिकारी दापोली हे अपील दाखल करणेकामी दिनांक 12/06/2023 रोजी मा. सरकारी वकील, उच्च न्यायालय, मुंबई (अपील शाखा) यांची भेट घेतली असता या कार्यालयाकडील दिनांक 06/06/2023 रोजीचे पत्रामध्ये मा. सरकारी वकील, उच्च न्यायालय, मुंबई (रिट शाखा) असे नमुद असून त्याऐवजी अपील शाखा असे शुध्दीपत्रक तयार करुन मिळणेबाबतच्या सूचना मा. सरकारी वकील, उच्च न्यायालय, मुंबई (अपील शाखा) यांनी दिले असलेबाबत या कार्यालयास दिनांक 14/06/2023 रोजीचे पत्रान्वये या कार्यालयास कळविले आहे.

प्रस्तुत प्रकरणी मा. विधी व न्याय विभागाने दिनांक 01/06/2023 रोजीच्या पत्रान्वये मा. सरकारी वकील, उच्च न्यायालय, मुंबई (रिट शाखा) यांना दिनांक 11/10/2022 चे आदेशाविरुध्द अपील दाखल करणेकामी सूचित केलेले असलेमुळे, रिट शाखे ऐवजी अपील शाखा यांना पुढील निर्देश देणेकामी मा. विधी व न्यायविभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे अभिप्रायासह पुनश्च प्रस्ताव सादर करणेबाबत मा. शासन, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे विनंती करणेत आली आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे न्यायालयात निशाण 33 वरील दिनांक 11/10/2022 चे आदेशाविरुध्द कायदेशीर प्रक्रियेनुसार फेरतपासणी अपील दाखल करणेचे अनुषंगाने उपविभागीय अधिकारी दापोली यांचेमार्फत कार्यवाही सुरु करण्यात आली असुन प्रतिज्ञापत्राचा मसुदा तयार करणेत आला असुन मा. सरकारी वकील, उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे तपासणीकामी सादर करणेत आले आहे. तद्नंतर सदरचे प्रतिज्ञापत्र अंतीम मान्यतेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करणेत येईल असे उपविभागीय अधिकारी दापोली तथा सदस्य यांनी अध्यक्ष यांना सांगितले.

- **हस्तांतरण अर्जाबाबत (Transfer Application) -**

मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, खेड यांचे न्यायालयात दावा क्र. रेमुनं. 57/2021 दाखल आहे. सदर दावा हस्तांतरीत करणेबाबत मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, जिल्हा न्यायालय यांचे न्यायालयात Civil M.A. 11/2023 अन्वये हस्तांतरण अर्ज दाखल करण्यात आला असुन पुढील सुनावणीची तारीख दिनांक 26/07/2023 रोजी निश्चित करण्यात आली आहे.

- **पुढील सुनावणी –**

रेमुनं. 57/2021 दाव्यामध्ये पुढील सुनावणीची तारीख दिनांक 04/08/2023 रोजी निश्चित करण्यात आली आहे.

### ii) मा. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, पुणे येथील अर्ज क्र. 58/2021

श्री. किरीट सोमय्या यांनी मौजे मुरुड, ता.दापोली येथील गट.नं 446 मधील बांधकामाबाबत 58/2021 अन्वये मा. राष्ट्रीय हरित लवाद वेस्टर्न झोन बेंच पुणे येथे दावा दाखल केला आहे. सदर दाव्याची सुनावणी दिनांक 02/05/2023 रोजी झाली असुन सदर दावा फेटाळून लावणेत (Dismissed) आला आहे.

### iii) मा. दिवाणी न्यायालय,खेड येथील दावा क्र. 12/2022

वरीलप्रमाणे विचारविनीमय/चर्चा करुन जे निर्णय सर्वानुमते घेण्यात आले त्याबाबत आणखी काही शंका असल्यास त्यांचे निरसन सर्वानुमते करणेसाठी त्या उपस्थित करणेबाबत समिती सदस्य व संबंधित विभाग/यंत्रणा यांना विचारणा करण्यात आली असता कोणीही शंका उपस्थित केली नाही.

पुढील बैठकीस जे सदस्य असतील त्यांनी बैठकीस उपस्थित राहणेचे असून प्रतिनिधी पाठवू नयेत तसेच बैठकीस उपस्थित राहता येणे शक्य नसल्यास अध्यक्ष यांची पुर्वपरवानगी घेणेची आहे अशा सूचना अध्यक्ष यांनी दिल्या.

उपस्थितांचे आभार व्यक्त करुन बैठक समाप्त झालेचे सदस्य सचिव तथा निवासी उपजिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी जाहीर केलेवरुन बैठक समाप्त करण्यात आली.

**स्थळप्रत मा. जिल्हाधिकारी**
**यांच्या स्वाक्षरीची.**

**(चंद्रकांत सुर्यवंशी)**
सदस्य सचिव, सागरी किनारा व्यवस्थापन समिती,
रत्नागिरी तथा निवासी उपजिल्हाधिकारी

क्र. महसूल/कार्या/अे.के. ६/DCZMA/०९/२०२३
जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
दिनांक - ०३/११/२०२३

प्रतिलिपी - सर्व संबंधितांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी

**दिनांक ३०/१०/२०२३ रोजी मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समितीच्या (DCZMA) आयोजित केलेल्या सभेचे इतिवृत्त**

---

सदर सभेस खालीलप्रमाणे समितीमधील अध्यक्ष व इतर सदस्य असलेले अधिकारी/ कर्मचारी प्रत्यक्ष/वेबेक्स व्ही.सी. द्वारे उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | प्रतिनिधी जिल्हा पोलीस अधिक्षक, रत्नागिरी | सदस्य |
| ३. | जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख रत्नागिरी | सदस्य |
| ४. | विभागीय वन अधिकारी चिपळूण | सदस्य |
| ५. | सहाय्यक संचालक, नगर रचना रत्नागिरी | सदस्य |
| ६. | सहाय्यक आयुक्त, मत्स्य व्यवसाय रत्नागिरी | सदस्य |
| ७. | उपविभागीय अधिकारी रत्नागिरी | सदस्य |
| ८. | उपविभागीय अधिकारी संगमेश्वर | सदस्य |
| ९. | उपविभागीय अधिकारी दापोली | सदस्य |
| १०. | उपविभागीय अधिकारी खेड | सदस्य |
| ११. | उपविभागीय अधिकारी चिपळूण | सदस्य |
| १२. | उपविभागीय अधिकारी राजापूर | सदस्य |
| १३. | उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी | सदस्य |
| १४. | उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण | सदस्य |
| १५. | मुख्याधिकारी नगर परिषद रत्नागिरी तथा जिल्हा सह आयुक्त, नपाप्र रत्नागिरी | सदस्य |
| १६. | डॉ. ए.सी.ठाकूरदेसाई प्राचार्य, गोगटे जोगळेकर कॉलेज रत्नागिरी | सदस्य |
| १७. | श्री. इम्रान मुकादम, मच्छिमार प्रतिनिधी, रा. मिरकरवाडा, ता.जि. रत्नागिरी | सदस्य |
| १८. | निवासी उपजिल्हाधिकारी | सदस्य सचिव |

---

सदस्य सचिव, जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समिती, तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

## 1. मा. एमसीझेडएमए, मुंबई कडील प्रलंबित तक्रारींबाबत आढावा –

मा. प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय सागरी किनारा व्यवस्थापन समितींची बैठक दिनांक 27/07/2023 रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये मा. एमसीझेडएमए, मुंबई यांचेमार्फत प्राप्त झालेल्या प्रलंबित तक्रारींचे अनुषंगाने आढावा घेण्यात आला.

मा. अध्यक्ष, एमसीझेडएमए, मुंबई यांजकडून सन 2019 ते 2023 पर्यंत प्राप्त 31 तक्रारींबाबतचा विहित नमुन्यातील तपशील पुढीलप्रमाणे आहे -

| | Construction in NDZ area within CRZ area | Constructions in CRZ II/ III without CRZ permission from competent authority | Construction beyond CRZ permission | C&D waste/ Debris dumping in Mangroves & its 50 m. buffer, CRZ I | Total |
|---|---|---|---|---|---|
| Complaint received | 06 | 17 | 0 | 08 | 31 |
| Action Taken | 02 | 02 | 0 | 04 | 08 |
| Action pending with reason | 04<br>03-Pending at Court for hearing.<br>01-Report received from SDO, Dapoli. But pending at this office for compliance report | 15<br>02- Pending at Court for hearing.<br>04-Pending at Chief Office, Nagar Panchayat /Parishad.<br>03- Pending at Sub Divisional Office for report (site inspection and measurement).<br>01- Pending at DFO, Chiplun for report.<br>03- Report received from SDO's. But pending at this office for compliance report.<br>02- Complaint at Sr.no. 2,6 of 2023 not received to this office | 0 | 04<br>01-Pending at Sub Divisional Office for report (site inspection and measurement).<br>02-Pending at MPCB, Chiplun for report.<br>01-Pending at DFO, Chiplun for report | 23 |

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता तक्रारींचे अनुषंगाने पुर्तता अहवाल सादर करणेवर प्रलंबित तक्रारींची संख्या 19 आहे. सदर तक्रारी या सन 2019 पासून प्रलंबित असलेमुळे अध्यक्ष यांनी नाराजी व्यक्त केली. सदर तक्रारींचे अनुषंगाने उपविभागीय अधिकारी राजापूर यांनी सन 2019 ची तक्रार यापुर्वी प्राप्त न झालेली नसुन चालू महात तक्रार प्राप्त झालेबाबत समितीस सांगितले. अध्यक्ष यांनी यावर निर्देश दिले की, पर्यावरण विभाग मंत्रालय, मुंबई यांचेमार्फत प्राप्त झालेल्या तक्रारी संबंधित उपविभागीय अधिकारी आणि मुख्याधिकारी नगर पंचायत/नगर परिषद यांजकडे यापुर्वी पाठविलेल्या असल्या तरी पुनश्च अनुपालन अहवालासाठी पाठविणेत याव्यात. जेणेकरुन तक्रारींचे अनुषंगाने पुढील कार्यवाही प्रस्तावित करता येवु शकेल. तसेच उपविभागीय अधिकारी आणि मुख्याधिकारी नगर पंचायत/नगर परिषद यांजकडून प्राप्त अहवाल प्रकरणी तात्काळ पर्यावरण विभाग, मंत्रालय मुंबई यांजकडे अनुपालन अहवाल सादर करणेत येईल याकडे विशेष लक्ष पुरवावे अश्या सूचना अध्यक्ष यांनी दिल्या.

मा. प्रधान सचिव पर्यावरण विभाग मंत्रालय, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय सागरी किनारा व्यवस्थापन समितींचे अध्यक्ष यांची दरमहा बैठक आयोजित करण्यात येत असलेमुळे माहे मार्च 2023 पुर्वीच्या प्रलंबित प्रकरणांमध्ये तसेच मा. एमसीझेडएमए, मुंबई यांजकडून प्राप्त होणा-या प्रकरणांमध्ये तात्काळ कार्यवाही करुन त्यांचे चौकशी अहवाल पुढील बैठकीपुर्वी या कार्यालयाकडे सादर करणेबाबत सर्व उपविभागीय अधिकारी/ मुख्याधिकारी तथा सदस्य यांना अध्यक्ष यांनी निर्देश दिले.

## 2. प्राप्त तक्रारींबाबत कार्यवाहीचा अहवाल

रत्नागिरी जिल्हयातील सीआरझेड क्षेत्रातील बांधकामाबाबत प्राप्त झालेल्या मा. एमसीझेडएमए, मुंबई व अन्य व्यक्तींकडील तक्रारींबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे. –

| उपविभाग | माहे डिसेंबर 2022 अखेर प्रलंबित तक्रारींची संख्या | माहे जानेवारी 2023 ते ऑक्टोबर 2023 मध्ये प्राप्त तक्रारींची संख्या | एकुण तक्रारींची संख्या | निकाली तक्रारींची संख्या | शिल्लक तक्रारींची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी अहवाल प्राप्त प्रकरणांची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी अहवालासाठी प्रलंबित प्रकरणांची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी न्यायालयात प्रलंबित प्रकरणे | उपविभागीय अधिकारी यांचेकडे प्रलंबित |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दापोली | 14 | 6 | 20 | 1 | 19 | 5 | 14 | 9 | 5 |
| खेड | 1 | 1 | 2 | 0 | 2 | 0 | 2 | 0 | 2 |
| चिपळूण | 5 | 6 | 11 | 2 | 9 | 1 | 8 | 2 | 6 |
| रत्नागिरी | 15 | 4 | 19 | 0 | 19 | 2 | 17 | 10 | 7 |
| राजापूर | 5 | 3 | 8 | 0 | 8 | 2 | 6 | 1 | 5 |
| | 40 | 20 | 60 | 03 | 57 | 10 | 47 | 22 | 25 |

| **उपविभाग** | **MCZMA कडील प्रलंबित तक्रारींची संख्या** | **अन्य व्यक्तींकडील प्रलंबित तक्रारींची संख्या** | **एकुण तक्रारींची संख्या** |
|---|---|---|---|
| दापोली | 4 | 10 | 14 |
| खेड | 1 | 1 | 2 |
| चिपळूण | 5 | 3 | 8 |
| रत्नागिरी | 6 | 11 | 17 |
| राजापूर | 3 | 3 | 6 |
| | 19 | 28 | 47 |

| **कार्यालय** | **तपशील** | **दिलेल्या सूचना** |
|---|---|---|
| उप प्रादेशिक अधिकारी, चिपळूण | कोतवली सोनपात्रा नदीमधील पाणी प्रदुषणाचा अहवाल उपविभागीय अधिकारी यांना सन 2020 मध्ये पाठविणेत आलेला आहे. | सदर अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करणेत यावा अशा सूचना अध्यक्ष यांनी दिल्या |
| उपविभागीय अधिकारी दापोली | 3 प्रकरणांमध्ये चौकशीची कार्यवाही सुरु आहे. 9 प्रकरणे न्यायालयीन स्तरावर प्रलंबित आहेत. 2 प्रकरणे प्रदुषण व वन विभागाकडील आहेत. | न्यायालयीन स्तरावरील प्रकरणांची सदयस्थिती पुढील बैठकीपुर्वी अदयावत करावी. तसेच अन्य विभागांकडे पाठपुरावा करुन अनुपालन अहवाल सादर होईल याकडे लक्ष दयावे. |
| उपविभागीय अधिकारी चिपळूण | 2 प्रकरणांमध्ये चौकशीची कार्यवाही सुरु आहे. 2 प्रकरणे न्यायालयीन स्तरावर प्रलंबित आहेत. 3 प्रकरणे अन्य विभागाकडे अहवालासाठी प्रलंबित आहेत. | न्यायालयीन स्तरावरील प्रकरणांची सदयस्थिती पुढील बैठकीपुर्वी अदयावत करावी. तसेच अन्य विभागांकडे पाठपुरावा करुन अनुपालन अहवाल सादर होईल याकडे लक्ष दयावे. |

| कार्यालय | तपशील | दिलेल्या सूचना |
|---|---|---|
| उपविभागीय अधिकारी राजापूर | 3 प्रकरणांमध्ये चौकशीची कार्यवाही सुरु आहे. 2 प्रकरणांमध्ये मोजणीसाठी भुमी अभिलेख स्तरावर प्रलंबित आहे. 1 प्रकरणे न्यायालयीन स्तरावर प्रलंबित आहेत. | भुमी अभिलेख कार्यालयाशी बैठक आयोजित करुन मोजणीबाबत कार्यवाही पुढील बैठकीपुर्वी पुर्ण करुन घ्यावी. |
| उपविभागीय अधिकारी खेड | 1 प्रकरणांमध्ये मोजणीसाठी भुमी अभिलेख स्तरावर प्रलंबित आहे. 1 प्रकरण मुख्याधिकारी यांचे स्तरावरील आहे. | भुमी अभिलेख कार्यालयाशी बैठक आयोजित करुन मोजणीबाबत कार्यवाही पुढील बैठकीपुर्वी पुर्ण करुन घ्यावी. मुख्याधिकारी यांचे स्तरावरील प्रकरणांमध्ये पाठपुरावा करुन अनुपालन अहवाल सादर होईल याकडे लक्ष दयावे. |
| उपविभागीय अधिकारी रत्नागिरी | 2 प्रकरणांमध्ये बांधकाम निष्कासनाची नोटीस व आदेश देण्यात आले आहेत. 3 प्रकरणांमध्ये चौकशीची कार्यवाही सुरु आहे. 1 प्रकरणांमध्ये मोजणीसाठी भुमी अभिलेख स्तरावर प्रलंबित आहे. 1 प्रकरण जिल्हा सह आयुक्त यांजकडे प्रलंबित आहे. 10 प्रकरणे न्यायालयीन स्तरावर प्रलंबित आहेत. | न्यायालयीन स्तरावरील प्रकरणांची सदयस्थिती पुढील बैठकीपुर्वी अदयावत करावी. तसेच अन्य विभागांकडे पाठपुरावा करुन अनुपालन अहवाल सादर होईल याकडे लक्ष दयावे. |

तरी प्रलंबित तक्रारी अर्जांमध्ये तात्काळ स्थळपहाणी करुन सीआरझेड तरतूदींचे अनुषंगाने कार्यवाही करुन अनुपालन अहवाल तात्काळ सादर करता येईल याकडे विशेष लक्ष पुरवावे असे निर्देश सदस्य सचिव यांनी उपविभागीय अधिकारी यांना दिले.

उपविभागीय अधिकारी खेड व राजापूर यांचे स्तरावरील मोजणीचे प्रकरण बराच कालावधीपासून प्रलंबित आहे. तरी भूमी अभिलेख विभागाची बैठक आयोजित करुन मोजणीची कार्यवाही प्राधान्याने पुर्ण होईल याकडे लक्ष पुरविणेबाबत अध्यक्ष यांनी सूचना दिल्या.

मा. प्रधान सचिव पर्यावरण विभाग मंत्रालय, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय सागरी किनारा व्यवस्थापन समितींचे अध्यक्ष यांची दरमहा बैठक आयोजित करण्यात येत असलेमुळे माहे मार्च 2023 पुर्वीच्या प्रलंबित प्रकरणांमध्ये तसेच मा. एमसीझेडएमए, मुंबई यांजकडून प्राप्त होणा-या प्रकरणांमध्ये तात्काळ कार्यवाही करुन त्यांचे चौकशी अहवाल पुढील बैठकीपुर्वी या कार्यालयाकडे सादर करणेबाबत सर्व उपविभागीय अधिकारी तथा सदस्य यांना अध्यक्ष यांनी निर्देश दिले.

## 3. Status of violation cases and action taken on violation cases by States/Union Territories as per CRZ Notifications, 2011/2019

मा. अवर सचिव, पर्यावरण विभाग, मुंबई यांजकडील दिनांक 15/06/2023 रोजीच्या पत्रान्वये सीआरझेड क्षेत्रामध्ये सीआरझेड तरतूदींचे उल्लंघन करुन करण्यात आलेली अनधिकृत बांधकामे, त्यांची सदयस्थिती व त्यावर केलेल्या कारवाईचा अहवाल सादर करणेचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुषंगाने उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत अनधिकृत बांधकामाबाबतची यादी प्राप्त झाली आहे. सदर यादी नुसार रत्नागिरी जिल्हयातील सीआझेड क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांची एकुण संख्या 1029 असुन उपविभाग निहाय गोषवारा पुढीलप्रमाणे आहे -

**सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाबाबत माहिती**

| उपविभागाचे नांव | सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांची संख्या | | | निर्गमित केलेल्या नोटिसांची संख्या | | | न्यायालयीन स्तरावर दाखल प्रकरणे | | | स्थगिती आदेश मिळालेली प्रकरणे | | | निष्कासनाचे आदेश पारीत संख्या | | | निष्कासनाची कार्यवाही केलेली संख्या | | | पर्यावरण कायदयांतर्गत गुन्हे दाखल केलेली संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CRZ III |
| दापोली | 4 | 0 | 191 | 4 | 0 | 191 | 0 | 0 | 45 | 0 | 0 | 24 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 7 |
| मंडणगड | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **एकुण** | 4 | 0 | 192 | 4 | 0 | 192 | 0 | 0 | 45 | 0 | 0 | 24 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 7 |
| खेड | 0 | 11 | 0 | 0 | 11 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **एकुण** | 0 | 11 | 0 | 0 | 11 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| चिपळूण | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| गुहागर | 0 | 0 | 177 | 0 | 0 | 177 | 0 | 0 | 38 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **एकुण** | 0 | 0 | 177 | 0 | 0 | 177 | 0 | 0 | 38 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 10 |
| रत्नागिरी | 0 | 0 | 139 | 0 | 0 | 139 | 0 | 0 | 5 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 7 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 10 |
| संगमेश्वर | 0 | 0 | 6 | 0 | 0 | 6 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 |
| **एकुण** | 0 | 0 | 145 | 0 | 0 | 145 | 0 | 0 | 6 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 8 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| राजापूर | 0 | 0 | 500 | 0 | 0 | 463 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 |
| लांजा | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **एकुण** | 0 | 0 | 500 | 0 | 0 | 463 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **जिल्हयाची एकुण** | 4 | 11 | 1014 | 4 | 11 | 977 | 0 | 0 | 90 | 0 | 0 | 25 | 0 | 0 | 13 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 19 |

➢ उपविभाग राजापूर : राजापूर तालुक्यातील 500 प्रकरणांपैकी 463 प्रकरणांमध्ये नोटिसा देण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. उर्वरित 37 प्रकरणांमध्ये नोटीसा देण्याचे काम प्राधान्याने पुर्ण करणेत येईल असे उपविभागीय अधिकारी राजापूर यांनी सांगितले

## 4. मौजे अंजनवेल, ता. गुहागर येथे कोकण एल.एन.जी. प्रा.लि. कंपनीसाठीच्या ब्रेक वॉटर वॉलच्या विस्तारीकरणाच्या सुरु असलेल्या कामाबाबत -

मौजे अंजनवेल, ता. गुहागर येथे कोकण एल.एन.जी. प्रा.लि. कंपनीसाठीच्या ब्रेक वॉटर वॉलच्या विस्तारीकरणाचे काम सुरु असलेबाबत श्री. विठ्ठल (बावा) विष्णू भालेकर, मु.पो. वेलदूर, ता. गुहागर, जि. रत्नागिरी तथा सदस्य (DCZMA) यांच्या दिनांक 11/10/2022 रोजीच्या तक्रारी अर्जाचे अनुषंगाने उपविभागीय अधिकारी चिपळूण, उपविभाग चिपळूण यांचा दिनांक 18/04/2023 रोजीचे पत्रान्वये चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे.

प्रस्तुत प्रकरणी सदयस्थितीचा वस्तुनिष्ठ अहवाल प्रादेशिक बंदर अधिकारी, रत्नागिरी मेरीटाईम बोर्ड यांचे अभिप्रायासह सादर करणेबाबत बंदर निरीक्षक, दाभोळ यांना दिनांक 24/07/2023 रोजीच्या बैठकीमध्ये निर्देश देण्यात आले होते. तसेच उपविभागीय अधिकारी चिपळूण, उपविभाग चिपळूण यांना सदयस्थितीबाबत वस्तुनिष्ठ अहवाल सादर करणेबाबत दिनांक 24/07/2023 रोजीच्या बैठकीमध्ये निर्देश देण्यात आले होते. तथापि संबंधितांचे अहवाल प्राप्त झालेले नाहीत. तरी संबंधितांनी वस्तुनिष्ठ अहवाल स्वयंस्पष्ट अभिप्रायासह सादर करावेत.

## 5. मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांनी केलेल्या बांधकामावर कारवाई करणेबाबत -

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांनी केलेल्या बांधकामावर कारवाई करणेबाबत मा. MoEF&CC, नवी

दिल्ली यांनी निर्गमीत केलेले दिनांक 22/08/2022 रोजीचे निर्देश या कार्यालयाकडे मा. अवर सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडून दिनांक 25/08/2022 रोजीचे पत्रान्वये प्राप्त झाले आहेत.

सदर पत्राचे अनुषंगाने आयोजित जिल्हास्तरीय सागरी किनारा व्यवस्थापन समिती (DCZMA) च्या बैठकीमध्ये समितीचे मान्यतेने निर्णय घेण्यात आले असून संबंधीत सर्व अधिकारी/यंत्रणा यांना कार्यवाही करणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

**a) कार्यारंभ आदेशानुसार बांधकाम निष्कासनाबाबत –**

मौजे मुरुड, ता. दापोली येथील गट क्र. 446 संदर्भात अन्य न्यायालयाकडील आदेश अथवा मा. दिवाणी न्यायालय, खेड यांचे न्यायालयात दाखल दावा क्र. 57/2021 चा अंतीम आदेश यांना अधीन राहून साई रिसॉर्ट एनएक्सचे बांधकाम निष्कासन करणेच्या कार्यवाहीबाबत निर्णय घेणेत येईल.

**b) पर्यावरणीय नुकसान भरपाईबाबत –**

उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांनी दिनांक 14/02/2023 रोजीचे पत्रान्वये पर्यावरणीय नुकसान भरपाईची रक्कम जमीन महसूल वसूली म्हणून वसूल करणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केला आहे. श्री. अनिल परब व श्री. पुष्कर श्रीकृष्ण मुळये यांचे नांवे असलेल्या अन्य जमिनीचा/मालमत्तेचा शोध घेवून महसूल वसुली प्रमाणपत्र या कार्यालयाकडे सादर करणेबाबत उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांना या कार्यालयाकडील दिनांक 21/02/2023 रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले आहे. तसेच केलेल्या कार्यवाहीबाबत समितीस अवगत करणेबाबत मासिक बैठकीमध्ये निर्देश देण्यात आले होते.

सदर बैठकीच्या इतिवृत्ताच्या अनुषंगाने उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांजकडील अनुपालन अहवाल अदयाप पर्यंत या कार्यालयाकडे प्राप्त झालेला नाही. तरी पर्यावरणीय नुकसान भरपाईची रक्कम जमीन महसूल वसूली म्हणून वसूल करणेबाबत उक्त माहितीची पुर्तता करुन महसूल वसुली प्रमाणपत्र जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करणेबाबत पुढील योग्य ती कार्यवाही उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांनी करावी.

**c) न्यायालयीन बाबींबाबत कार्यवाही –**

**i) मा. दिवाणी न्यायालय, खेड येथील दावा क्र. 57/2021**

- **मा. दिवाणी न्यायालय, खेड यांजकडील दिनांक 17/03/2023 रोजीचा आदेश -**

मा. दिवाणी न्यायालय, खेड यांजकडील दिनांक 17/03/2023 चे आदेशाविरुध्द मा. जिल्हा व सत्र न्यायालय, खेड येथे दिवाणी किरकोळ अपील क्र. 08/2023 दाखल करणेत आले असुन सदर अपीलाची पुढील सुनावणीची तारीख दिनांक 06/10/2023 रोजी निश्चित करण्यात आली आहे असे उपविभागीय अधिकारी दापोली यांनी सांगितले.

- **निशाणी-33 वरील अपीलबाबत -**

सुधारित अपील अर्जाच्या मसुदयानुसार मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे निशाण 33 वरील दिनांक 11/10/2022 चे आदेशाविरुध्द कायदेशीर प्रक्रियेनुसार दिनांक 26/09/2023 रोजी रिट याचिका दाखल करण्यात आली आहे असे उपविभागीय अधिकारी दापोली यांनी सांगितले. सदर रिट याचिका Pre-admission वर आहे.

- **हस्तांतरण अर्जाबाबत (Transfer Application) -**

मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, खेड यांचे न्यायालयात दावा क्र. रेमुनं. 57/2021 दाखल आहे. सदर दावा हस्तांतरीत करणेबाबत मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, जिल्हा न्यायालय यांचे न्यायालयात Civil M.A. 11/2023 अन्वये हस्तांतरण अर्ज दाखल करण्यात आला असुन पुढील सुनावणीची तारीख दिनांक 30/10/2023 रोजी निश्चित करण्यात आली असलेबाबत उपविभागीय अधिकारी दापोली यांनी सांगितले.

* **पुढील सुनावणी –**

रेमुनं. 57/2021 दाव्यामध्ये पुढील सुनावणीची तारीख दिनांक 03/11/2023 रोजी निश्चित करण्यात आली आहे असे उपविभागीय अधिकारी दापोली यांनी सांगितले.

**ii) मा. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, पुणे येथील अर्ज क्र. 58/2021**

श्री. किरीट सोमय्या यांनी मौजे मुरुड, ता.दापोली येथील गट.नं 446 मधील बांधकामाबाबत 58/2021 अन्वये मा. राष्ट्रीय हरित लवाद वेस्टर्न झोन बेंच पुणे येथे दावा दाखल केला आहे. सदर दाव्याची सुनावणी दिनांक 02/05/2023 रोजी झाली असुन सदर दावा फेटाळून लावणेत (Dismissed) आला आहे.

**iii) मा. दिवाणी न्यायालय,खेड येथील दावा क्र. 12/2022**

मा. पर्यावरण, वन आणि जलवायू परिवर्तन मंत्रालय, एकात्मिक प्रादेशिक कार्यालय, नागपुर द्वारा श्री. सुरेशकुमार अडप्पा, शास्त्रज्ञ-डी यांनी मा. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, खेड यांचे न्यायालयात 1. श्री. अनिल दत्तात्रय परब, 2. साई रिसॉर्ट एनएक्स 3. सी कौंच रिसॉर्ट यांचे विरुध्द पर्यावरण (संरक्षण) कायदा अधिनियम 1986 मधील कलम 19 व 15 चे 7 अन्वये रेग्युलर क्रिमीनल केस नंबर 12/2022 अन्वये दावा दाखल केलेला आहे. सदर दावा आज मितीस न्यायप्रविष्ठ असुन आरोपींचे जामीन कदबे घेण्यात आले आहेत. फिर्यादीतर्फे दोषारोपपुर्व पुरावा देणेकामी पुढील सुनावणीची तारीख दिनांक 14/12/2023 रोजी निश्चित करण्यात आली आहे.

**iv) मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील दावा क्र. 11125/2022**

मौजे मुरुड, ता. दापोली येथील सर्व्हे नं. 446 मधील साई रिसॉर्ट एनएक्स या रिसॉर्टचे सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत बांधकाम निष्कासीत करण्याबाबत सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल, मुंबई यांचेकडील दिनांक 31/01/2022 चे ज्ञापन व अंमलबजावणी पत्र दिनांक 22/08/2022 व उपविभागीय अधिकारी, दापोली यांचेकडील दिनांक 25/08/2022 चे पत्र रदद करण्याबाबत श्री. सदानंद गंगाराम कदम यांनी भारत सरकार व इतर यांचेविरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे Writ Petition No.11125/2022 दाखल केले आहे.

उक्त दावा प्रकरणी दुरुस्ती अर्जाच्या (Amendment) अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे अतिरिक्त प्रतिज्ञापत्र (Affidavit in Reply) आणि Interim Application उपविभागीय अधिकारी, दापोली यांचेमार्फत दिनांक 04/10/2023 रोजी दाखल करणेत आलेचे उपविभागीय अधिकारी दापोली यांनी सांगितले. तसेच प्रकरणी पुढील सुनावणीची तारीख दिनांक 02/01/2024 रोजी निश्चित करण्यात आलेली आहे.

## 6. मौजे मुरुड, ता. दापोली येथील समुद्र किना-यावरील साई रिसॉर्ट एनएकस/ सी कौंच रिसॉर्ट यांनी सरकारी जमिनीवर अतिक्रमण करुन बांधकाम केलेबाबत व भूमिगत ड्रेनेज पाईपलाईन बाबत - डॉ. किरीट सोमैया यांचा तक्रारी अर्ज

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 लगत पश्चिम दिशेच्या समुद्रावरील वाळूवर केलेले अतिक्रमण म.ज.म.अ.1966 चे कलम 50(3) व कलम 53 नुसार दिलेल्या नोटीसप्रमाणे संबंधितांनी शासकीय जमिनीवरील अतिक्रमण हे मुदतीत काढून टाकलेले आहे.

मौजे मुरुड, ता. दापोली येथील गट नं. 446 च्या बाहेरील अतिक्रमण करण्यात आलेली शासकीय जमीन ही गाळाने तयार झालेली किना-यालगतची जमीन (Foreshore Land) आहे. सबब सीआझेड तरतूदींचे अनुषंगाने प्रशासकीय विभाग म्हणुन पर्यावरण (संरक्षण आणि संवर्धन) अधिनियम 1986 चे कलम 15(1) प्रमाणे फिर्याद दाखल करावी अगर कसे? याबाबत मार्गदर्शन मिळणेबाबत या कार्यालयाकडील दिनांक 18/01/2023 रोजीचे पत्रान्वये प्रस्ताव मा. संचालक, पर्यावरण

व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे त्यांचे अभिप्रायासह मा. शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे सादर करणेबाबत विनंती करण्यात आली आहे. तथापि अदयाप पर्यंत मार्गदर्शन प्राप्त झालेले नाही.

## 7. तत्कालीन मंडळ अधिकारी, मुरुड यांचेविरुध्द करण्यात आलेली कारवाई –

मा. जिल्हा पोलीस अधिक्षक, रत्नागिरी यांजकडील दिनांक २४/०३/२०२३ रोजीचे पत्रान्वये पोलीस निरीक्षक, दापोली पोलीस ठाणे यांजकडील दिनांक २०/०३/२०२३ रोजीचा अहवाल या कार्यालयास प्राप्त झाला आहे.

सदर अहवालाचे अवलोकन केले असता, पोलीस ठाणे दापोली यांचे येथे दाखल गुन्हा रजि. नं. १७७/२०२३ मध्ये श्री. सुधीर शांताराम पारदुले, तत्कालीन मंडळ अधिकारी मुरुड यांना आरोपी करण्यात आले असुन त्यांना दिनांक १५/०३/२०२३ रोजी अटक करण्यात आली होती. श्री. सुधीर शांताराम पारदुले, तत्कालीन मंडळ अधिकारी मुरुड यांची मा. न्यायालयाने दिनांक २०/०३/२०२३ रोजी जामीनावर मुक्तता केलेली आहे. श्री. पारदुले यांना शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

## प्राप्त तक्रारींबाबत सर्वसाधारण सूचना –

१. प्रलंबित तक्रारी या ब-याच कालावधीपासून प्रलंबित असलेचे दिसून येते. तरी प्रलंबित तक्रारी अर्जामध्ये तात्काळ स्थळपहाणी करुन सीआरझेड तरतूदींचे अनुषंगाने कार्यवाही करुन प्रकरणनिहाय अनुपालन अहवाल तात्काळ सादर करणेत येईल याकडे विशेष लक्ष पुरवावे.
२. मा. एमसीझेडएमए, मुंबई यांजकडून प्राप्त होणा-या प्रकरणांमध्ये तात्काळ कार्यवाही करावी.
३. न्यायालयीन स्तरावर प्रलंबित प्रकरणांची सदयस्थिती सादर करणेबाबत सर्व उपविभागीय अधिकारी यांना सांगण्यात आले. तसेच तपशिलामध्ये दाव्याची सुनावणीची पुढील तारीख व पुढील तारखेचे कारण नमुद करण्यात यावे.
४. न्यायालयीन स्तरावर प्रलंबित प्रकरणी अपिल दाखल करुन घेण्यात आले असल्यास अपिलाचा क्रमांक व सुनावणीची पुढील तारीख तपशिलामध्ये नमुद करण्यात यावी.
५. न्यायप्रविष्ट प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी यांनी पाठपुरावा करावा. तसेच सुनावणी तारखेस उपस्थित रहावे व दरमहा सदयस्थितीचा अहवाल कार्यालयास सादर करावा.
६. FIR दाखल प्रकरणांमध्ये सदयस्थितीचा अहवाल दर महाचे बैठकीपुर्वी सादर करणेबाबत सर्व उपविभागीय अधिकारी यांना सांगण्यात आले.
७. ज्या प्रकरणी नगर रचना विभाग/ भूमी अभिलेख विभागांचे अभिप्राय अपेक्षिलेले आहेत तथापी बराच काळ प्रलंबित आहेत, अशा प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी यांनी संबंधित विभागाची बैठक आयोजित करुन व पाठपुरावा करुन अहवाल प्राप्त होतील याकडे लक्ष पुरवावे.
८. अभिप्राय अपेक्षिलेल्या प्रकरणांमध्ये वेळोवेळी संबंधित विभागास स्मरणपत्र काढणेची कार्यवाही करणेबाबत उपविभागीय अधिकारी यांना सांगण्यात आले.

## सीआरझेड क्षेत्रामधील अनधिकृत बांधकामाबाबत सर्वसाधारण सूचना –

१. सर्व्हेक्षणामध्ये आढळून आलेल्या बांधकामाची यादी तयार करुन त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पाठविणेत आलेल्या विहीत नमुन्यात माहिती सादर करावी.
२. सीआरझेड क्षेत्रात बांधकामे होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.
३. उपविभागीय अधिकारी यांनी त्यांचेस्तरावर संबंधित विभागाची मासिक बैठक घेवून आढावा घ्यावा.

४. अकृषीक परवानगी तसेच बांधकाम परवानगीसाठी आलेल्या अर्जांबाबत सहाय्यक संचालक नगर रचना विभागाचे अभिप्राय घ्यावेत. सागरतटिय क्षेत्रात येणा-या महानगरपालिका/नगरपालिका/ नगरपरिषदा/ग्रामपंचायत व इतर ठिकाणी कोणत्याही बांधकामास परवानगी देण्यापूर्वी महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटी किंवा केंद्रिय पर्यावरण व वन मंत्रालयाची पूर्व परवानगी प्राप्त असल्याची खातरजमा संबंधितांनी करावयाची आहे. पूर्व परवानगी नसताना सागरतटिय क्षेत्रात कोणत्याही कामांना अनुमती देण्यात येवू नये.

५. सागरतटिय क्षेत्रातील निवासी/ वाणिज्य बांधकाम प्रकरणांमध्ये नियोजनाचे अनुषंगाने सहाय्यक संचालक, नगर रचना, रत्नागिरी यांनी तात्काळ अभिप्राय सादर करावेत. तसेच दरमहा अहवाल सादर करावा.

६. सागरतटिय क्षेत्रातील निवासी/ वाणिज्य बांधकाम प्रकरणांमध्ये सीआरझेड परवानगीचे प्रस्ताव तात्काळ महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटीकडे उपविभागीय अधिकारी यांनी सादर करावेत. तसेच दरमहा अहवाल सादर करावा.

७. सीआरझेड व कांदळवनासाठी शासनाने दिलेल्या आदेशाचे पालन करावे.

८. सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत/विनापरवाना बांधकाम प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत भूमी अभिलेख विभागाकडे मोजणीसाठी पाठविण्यात येणा-या प्रकरणांमध्ये भूमी अभिलेख विभागाने शासकीय मोजणी करुन दयावी.

वरीलप्रमाणे विचारविनीमय/चर्चा करुन जे निर्णय सर्वानुमते घेण्यात आले त्याबाबत आणखी काही शंका असल्यास त्यांचे निरसन सर्वानुमते करणेसाठी त्या उपस्थित करणेबाबत समिती सदस्य व संबंधित विभाग/यंत्रणा यांना विचारणा करण्यात आली असता कोणीही शंका उपस्थित केली नाही.

पुढील बैठकीस जे सदस्य असतील त्यांनी बैठकीस उपस्थित राहणेचे असून प्रतिनिधी पाठवू नयेत तसेच बैठकीस उपस्थित राहता येणे शक्य नसल्यास, अध्यक्ष यांची पुर्वपरवानगी घेणेची आहे अशा सूचना अध्यक्ष यांनी दिल्या.

उपस्थितांचे आभार व्यक्त करुन बैठक समाप्त झालेचे सदस्य सचिव तथा निवासी उपजिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी जाहीर केलेवरुन बैठक समाप्त करण्यात आली.

**स्थळप्रत मा. जिल्हाधिकारी**
**यांच्या स्वाक्षरीची.**

**(चंद्रकांत सुर्यवंशी)**
सदस्य सचिव, सागरी किनारा व्यवस्थापन समिती,
रत्नागिरी तथा निवासी उपजिल्हाधिकारी

क्र. महसूल/कार्या/अे.के. ६/DCZMA/१०/२०२३
जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
दिनांक - ०३/११/२०२३

प्रतिलिपी - सर्व संबंधितांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी

**दिनांक २९/१२/२०२३ रोजी मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समितीच्या (DCZMA) आयोजित केलेल्या सभेचे इतिवृत्त**

---

माहे नोव्हेंबर २०२३ ची जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समितीची सभा प्रशासकीय कारणास्तव घेण्यात आलेली नसलेमुळे माहे नोव्हेंबर २०२३ व डिसेंबर २०२३ ची एकत्रीत सभा आयोजीत करण्यात आली आहे. सदर सभेस खालीलप्रमाणे समितीमधील अध्यक्ष व इतर सदस्य असलेले अधिकारी/ कर्मचारी प्रत्यक्ष/वेबेक्स व्ही.सी. द्वारे उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | प्रतिनिधी जिल्हा पोलीस अधिक्षक, रत्नागिरी | सदस्य |
| २. | जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख रत्नागिरी | सदस्य |
| ३. | विभागीय वन अधिकारी चिपळूण | सदस्य |
| ४. | सहाय्यक संचालक, नगर रचना रत्नागिरी | सदस्य |
| ५. | प्रतिनिधी सहाय्यक आयुक्त, मत्स्य व्यवसाय रत्नागिरी | सदस्य |
| ६. | उपविभागीय अधिकारी रत्नागिरी | सदस्य |
| ७. | उपविभागीय अधिकारी दापोली | सदस्य |
| ८. | उपविभागीय अधिकारी खेड | सदस्य |
| ९. | उपविभागीय अधिकारी चिपळूण | सदस्य |
| १०. | उपविभागीय अधिकारी राजापूर | सदस्य |
| ११. | प्रतिनिधी उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी | सदस्य |
| १२. | उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण | सदस्य |
| १३. | मुख्याधिकारी नगर परिषद रत्नागिरी तथा जिल्हा सह आयुक्त, नपाप्र रत्नागिरी | सदस्य |
| १४. | मुख्याधिकारी, नगर पंचायत गुहागर | सदस्य |
| १५. | निवासी उपजिल्हाधिकारी | सदस्य सचिव |

---

सदस्य सचिव, जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समिती, तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

## 1. **मा. एमसीझेडएमए, मुंबई कडील प्रलंबित तक्रारींबाबत आढावा –**

मा. प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय सागरी किनारा व्यवस्थापन समितींची बैठक दिनांक 27/07/2023 रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये मा. एमसीझेडएमए, मुंबई यांचेमार्फत प्राप्त झालेल्या प्रलंबित तक्रारींचे अनुषंगाने आढावा घेण्यात आला.

मा. अध्यक्ष, एमसीझेडएमए, मुंबई यांजकडून सन 2019 ते 2023 पर्यंत प्राप्त 31 तक्रारींबाबतचा विहित नमुन्यातील तपशील पुढीलप्रमाणे आहे -

| | Construction in NDZ area within CRZ area | Constructions in CRZ II/ III without CRZ permission from competent authority | Construction beyond CRZ permission | C&D waste/ Debris dumping in Mangroves & its 50 m. buffer, CRZ I | Total |
|---|---|---|---|---|---|
| **Complaint received** | 06 | 17 | 0 | 08 | 31 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Action Taken** | 02 | 05 | 0 | 04 | 11 |
| **Action pending with reason** | 04<br>03-Pending at Court for hearing.<br>01-Report received from SDO, Dapoli. But pending at this office for compliance report | 12<br>02- Pending at Court for hearing.<br>02-Pending at Chief Office, Nagar Panchayat /Parishad.<br>04- Pending at Sub Divisional Office for report (site inspection and measurement).<br>02- Report received, but pending at this office for compliance report.<br>02- Complaint at Sr.no. 2,6 of 2023 not received to this office | 0 | 04<br>01-Pending at Sub Divisional Office for report (site inspection and measurement).<br>02-Pending at MPCB, Chiplun for report.<br>01-Report received from DFO, Chiplun but pending at this office for compliance report. | 20 |

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता तक्रारींचे अनुषंगाने पुर्तता अहवाल सादर करणेवर प्रलंबित तक्रारींची संख्या 15 व मा. न्यायालयात प्रलंबित तक्रारी 5 आहेत. सदर तक्रारी या सन 2019 पासून प्रलंबित असलेमुळे अध्यक्ष यांनी नाराजी व्यक्त केली असलेबाबत सदस्य सचिव यांनी सांगितले. पर्यावरण विभाग मंत्रालय, मुंबई यांचेमार्फत प्राप्त झालेल्या तक्रारी संबंधित उपविभागीय अधिकारी आणि मुख्याधिकारी नगर पंचायत/नगर परिषद यांजकडे यापुर्वी पाठविलेल्या असल्या तरी पुनश्च अनुपालन अहवालासाठी पाठविणेत याव्यात असे निर्देश सदस्य सचिव यांनी दिले. जेणेकरुन तक्रारींचे अनुषंगाने पुढील कार्यवाही प्रस्तावित करता येवु शकेल. तसेच उपविभागीय अधिकारी आणि मुख्याधिकारी नगर पंचायत/नगर परिषद यांजकडून प्राप्त अहवाल प्रकरणी तात्काळ पर्यावरण विभाग, मंत्रालय मुंबई यांजकडे अनुपालन अहवाल सादर करणेत येईल याकडे विशेष लक्ष पुरवावे अश्या सूचना सदस्य सचिव यांनी दिल्या.

मा. प्रधान सचिव पर्यावरण विभाग मंत्रालय, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय सागरी किनारा व्यवस्थापन समितींचे अध्यक्ष यांची दरमहा बैठक आयोजित करण्यात येत असलेमुळे माहे मार्च 2023 पुर्वीच्या प्रलंबित प्रकरणांमध्ये तसेच मा. एमसीझेडएमए, मुंबई यांजकडून प्राप्त होणा-या प्रकरणांमध्ये तात्काळ कार्यवाही करुन त्यांचे चौकशी अहवाल पुढील बैठकीपुर्वी या कार्यालयाकडे सादर करणेबाबत सर्व उपविभागीय अधिकारी/ मुख्याधिकारी तथा सदस्य यांना सदस्य सचिव यांनी निर्देश दिले.

## 2. प्राप्त तक्रारींबाबत कार्यवाहीचा अहवाल

रत्नागिरी जिल्हयातील सीआरझेड क्षेत्रातील बांधकामाबाबत प्राप्त झालेल्या मा. एमसीझेडएमए, मुंबई व अन्य व्यक्तींकडील तक्रारींबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे. –

| उपविभाग | माहे डिसेंबर 2022 अखेर प्रलंबित तक्रारींची संख्या | माहे जानेवारी 2023 ते डिसेंबर 2023 मध्ये प्राप्त तक्रारींची संख्या | एकुण तक्रारींची संख्या | निकाली तक्रारींची संख्या | शिल्लक तक्रारींची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी अहवाल प्राप्त प्रकरणांची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी अहवालासाठी प्रलंबित प्रकरणांची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी न्यायालयात प्रलंबित प्रकरणे | उपविभागीय अधिकारी यांचेकडे प्रलंबित |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दापोली | 14 | 6 | 20 | 3 | 17 | 3 | 14 | 9 | 5 |
| खेड | 1 | 2 | 3 | 0 | 3 | 0 | 3 | 0 | 3 |
| चिपळूण | 5 | 7 | 12 | 3 | 9 | 3 | 6 | 3 | 3 |
| रत्नागिरी | 15 | 7 | 22 | 1 | 21 | 2 | 19 | 10 | 9 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| राजापूर | 5 | 3 | 8 | 1 | 7 | 1 | 6 | 1 | 5 |
| | 40 | 25 | 65 | 08 | 57 | 09 | 48 | 23 | 25 |

| उपविभाग | MCZMA कडील प्रलंबित तक्रारींची संख्या | अन्य व्यक्तींकडील प्रलंबित तक्रारींची संख्या | एकुण तक्रारींची संख्या |
|---|---|---|---|
| दापोली | 4 | 10 | 14 |
| खेड | 2 | 1 | 3 |
| चिपळूण | 2 | 4 | 6 |
| रत्नागिरी | 5 | 14 | 19 |
| राजापूर | 3 | 3 | 6 |
| | 16 | 32 | 48 |

आवक तक्रारी व निकाली तक्रारी यांचा मेळ घेतला असता निकाली तक्रारींची संख्या खूप कमी असलेचे सदस्य सचिव यांनी सांगितले.

| कार्यालय | तपशील | दिलेल्या सूचना |
|---|---|---|
| उप प्रादेशिक अधिकारी, चिपळूण | कोतवली सोनपात्रा नदीमधील पाणी प्रदुषणाचा अहवाल उपविभागीय अधिकारी यांना सन 2020 मध्ये पाठविणेत आलेला आहे. | सदर अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करणेत यावा अशा सूचना अध्यक्ष यांनी दिल्या |
| उपविभागीय अधिकारी दापोली | 4 प्रकरणांमध्ये चौकशीची कार्यवाही सुरु आहे. 9 प्रकरणे न्यायालयीन स्तरावर प्रलंबित आहेत. 1 प्रकरण प्रदुषण विभागाकडील आहे. | न्यायालयीन स्तरावरील प्रकरणांची सदयस्थिती पुढील बैठकीपुर्वी अदयावत करावी. तसेच अन्य विभागांकडे पाठपुरावा करुन अनुपालन अहवाल सादर होईल याकडे लक्ष दयावे. |
| उपविभागीय अधिकारी चिपळूण | 2 प्रकरणांमध्ये चौकशीची कार्यवाही सुरु आहे. 3 प्रकरणे न्यायालयीन स्तरावर प्रलंबित आहेत. 1 प्रकरण मुख्याधिकारी, न.पं. गुहागर यांजकडे अहवालासाठी प्रलंबित आहेत. | न्यायालयीन स्तरावरील प्रकरणांची सदयस्थिती पुढील बैठकीपुर्वी अदयावत करावी. तसेच अन्य विभागांकडे पाठपुरावा करुन अनुपालन अहवाल सादर होईल याकडे लक्ष दयावे. |
| उपविभागीय अधिकारी राजापूर | 3 प्रकरणांमध्ये चौकशीची कार्यवाही सुरु आहे. 2 प्रकरणांमध्ये मोजणीसाठी भुमी अभिलेख स्तरावर प्रलंबित आहे. 1 प्रकरणे न्यायालयीन स्तरावर प्रलंबित आहेत. | भुमी अभिलेख कार्यालयाशी बैठक आयोजित करुन मोजणीबाबत कार्यवाही पुढील बैठकीपुर्वी पुर्ण करुन घ्यावी. |
| उपविभागीय अधिकारी खेड | 1 प्रकरणांमध्ये मोजणीसाठी भुमी अभिलेख स्तरावर प्रलंबित आहे. 1 प्रकरण मुख्याधिकारी यांचे स्तरावरील आहे. | भुमी अभिलेख कार्यालयाशी बैठक आयोजित करुन मोजणीबाबत कार्यवाही पुढील बैठकीपुर्वी पुर्ण करुन घ्यावी. मुख्याधिकारी यांचे स्तरावरील प्रकरणांमध्ये पाठपुरावा करुन अनुपालन अहवाल सादर होईल याकडे लक्ष दयावे. |
| उपविभागीय अधिकारी रत्नागिरी | 2 प्रकरणांमध्ये बांधकाम निष्कासनाची नोटीस व आदेश देण्यात आले आहेत. 6 प्रकरणांमध्ये चौकशीची कार्यवाही सुरु आहे. 1 प्रकरणांमध्ये मोजणीसाठी भुमी अभिलेख स्तरावर प्रलंबित आहे. 10 प्रकरणे न्यायालयीन स्तरावर प्रलंबित आहेत. | न्यायालयीन स्तरावरील प्रकरणांची सदयस्थिती पुढील बैठकीपुर्वी अदयावत करावी. तसेच अन्य विभागांकडे पाठपुरावा करुन अनुपालन अहवाल सादर होईल याकडे लक्ष दयावे. |

तरी प्रलंबित तक्रारी अर्जांमध्ये तात्काळ स्थळपहाणी करुन सीआरझेड तरतूदींचे अनुषंगाने कार्यवाही करुन अनुपालन अहवाल तात्काळ सादर करता येईल याकडे विशेष लक्ष पुरवावे असे निर्देश सदस्य सचिव यांनी उपविभागीय अधिकारी यांना दिले.

उपविभागीय अधिकारी खेड व राजापूर यांचे स्तरावरील मोजणीचे प्रकरण बराच कालावधीपासून प्रलंबित आहे. तरी भूमी अभिलेख विभागाची बैठक आयोजित करुन मोजणीची कार्यवाही प्राधान्याने पुर्ण होईल याकडे लक्ष पुरविणेबाबत सदस्य सचिव यांनी सूचना दिल्या.

मा. प्रधान सचिव पर्यावरण विभाग मंत्रालय, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय सागरी किनारा व्यवस्थापन समितींचे अध्यक्ष यांची दरमहा बैठक आयोजित करण्यात येत असलेमुळे माहे मार्च 2023 पुर्वीच्या प्रलंबित प्रकरणांमध्ये तसेच मा. एमसीझेडएमए, मुंबई यांजकडून प्राप्त होणा-या प्रकरणांमध्ये तात्काळ कार्यवाही करुन त्यांचे चौकशी अहवाल पुढील बैठकीपुर्वी या कार्यालयाकडे सादर करणेबाबत सर्व उपविभागीय अधिकारी तथा सदस्य यांना सदस्य सचिव यांनी निर्देश दिले.

## 3. Status of violation cases and action taken on violation cases by States/Union Territories as per CRZ Notifications, 2011/2019

मा. अवर सचिव, पर्यावरण विभाग, मुंबई यांजकडील दिनांक 15/06/2023 रोजीच्या पत्रान्वये सीआरझेड क्षेत्रामध्ये सीआरझेड तरतूदींचे उल्लंघन करुन करण्यात आलेली अनधिकृत बांधकामे, त्यांची सदयस्थिती व त्यावर केलेल्या कारवाईचा अहवाल सादर करणेचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुषंगाने उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत अनधिकृत बांधकामाबाबतची यादी प्राप्त झाली आहे. सदर यादी नुसार रत्नागिरी जिल्हयातील सीआझेड क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांची एकुण संख्या 1029 असुन उपविभाग निहाय गोषवारा पुढीलप्रमाणे आहे -

**सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाबाबत माहिती**

| उपविभागाचे नांव | सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांची संख्या | | | निर्गमित केलेल्या नोटिसांची संख्या | | | न्यायालयीन स्तरावर दाखल प्रकरणे | | | स्थगिती आदेश मिळालेली प्रकरणे | | | निष्कासनाचे आदेश पारीत संख्या | | | निष्कासनाची कार्यवाही केलेली संख्या | | | पर्यावरण कायदयांतर्गत गुन्हे दाखल केलेली संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CRZ III |
| दापोली | 4 | 0 | 191 | 4 | 0 | 191 | 0 | 0 | 45 | 0 | 0 | 24 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 7 |
| मंडणगड | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **एकुण** | **4** | **0** | **192** | **4** | **0** | **192** | **0** | **0** | **45** | **0** | **0** | **24** | **0** | **0** | **2** | **0** | **0** | **1** | **0** | **0** | **7** |
| खेड | 0 | 11 | 0 | 0 | 11 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **एकुण** | **0** | **11** | **0** | **0** | **11** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** |
| चिपळूण | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| गुहागर | 0 | 0 | 177 | 0 | 0 | 177 | 0 | 0 | 38 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 10 |
| **एकुण** | **0** | **0** | **177** | **0** | **0** | **177** | **0** | **0** | **38** | **0** | **0** | **1** | **0** | **0** | **2** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **10** |
| रत्नागिरी | 0 | 0 | 139 | 0 | 0 | 139 | 0 | 0 | 5 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 7 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 |
| संगमेश्वर | 0 | 0 | 6 | 0 | 0 | 6 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **एकुण** | **0** | **0** | **145** | **0** | **0** | **145** | **0** | **0** | **6** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **8** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **2** |
| राजापूर | 0 | 0 | 500 | 0 | 0 | 494 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| लांजा | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **एकुण** | **0** | **0** | **500** | **0** | **0** | **494** | **0** | **0** | **1** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **1** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** |
| **जिल्हयाची एकुण** | 4 | 11 | 1014 | 4 | 11 | 1008 | 0 | 0 | 90 | 0 | 0 | 25 | 0 | 0 | 13 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 19 |

- उपविभाग राजापूर : राजापूर तालुक्यातील 500 प्रकरणांपैकी 494 प्रकरणांमध्ये नोटिसा देण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. उर्वरित 6 प्रकरणांमध्ये नोटीसा देण्याचे काम प्राधान्याने पुर्ण करणेत येईल असे उपविभागीय अधिकारी राजापूर यांनी सांगितले

## 4. मौजे अंजनवेल, ता. गुहागर येथे कोकण एल.एन.जी. प्रा.लि. कंपनीसाठीच्या ब्रेक वॉटर वॉलच्या विस्तारीकरणाच्या सुरु असलेल्या कामाबाबत -

मौजे अंजनवेल, ता. गुहागर येथे कोकण एल.एन.जी. प्रा.लि. कंपनीसाठीच्या ब्रेक वॉटर वॉलच्या विस्तारीकरणाचे काम सुरु असलेबाबत श्री. विठ्ठल (बावा) विष्णू भालेकर, मु.पो. वेलदूर, ता. गुहागर, जि. रत्नागिरी तथा सदस्य (DCZMA) यांच्या दिनांक 11/10/2022 रोजीच्या तक्रारी अर्जाचे अनुषंगाने उपविभागीय अधिकारी चिपळूण, उपविभाग चिपळूण यांचा दिनांक 18/04/2023 रोजीचे पत्रान्वये चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे.

प्रस्तुत प्रकरणी सदयस्थितीचा वस्तुनिष्ठ अहवाल प्रादेशिक बंदर अधिकारी, रत्नागिरी मेरीटाईम बोर्ड यांचे अभिप्रायासह सादर करणेबाबत बंदर निरीक्षक, दाभोळ यांना दिनांक 21/08/2023 रोजीच्या बैठकीमध्ये निर्देश देण्यात आले होते. तसेच उपविभागीय अधिकारी चिपळूण, उपविभाग चिपळूण यांना सदयस्थितीबाबत वस्तुनिष्ठ अहवाल सादर करणेबाबत दिनांक 21/08/2023 रोजीच्या बैठकीमध्ये निर्देश देण्यात आले होते. त्यानुषंगाने उपविभागीय अधिकारी चिपळूण, उपविभाग चिपळूण यांजकडील दिनांक 19/12/2023 रोजीचे पत्रान्वये अहवाल प्राप्त झालेला आहे.

प्रस्तुत प्रकरणी प्राप्त अहवालानुसार मा. संचालक, पर्यावरण विभाग, मुंबई यांजकडे अहवाल सादर करणेत यावा असे समितीमध्ये ठरविणेत आले आहे. मा. संचालक, पर्यावरण विभाग, मुंबई यांजकडे अहवाल सादर करणेपुर्वी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करुन घेवुन व सीआरझेड अधिसूचनामधील तरतूदींनुसार स्वयंस्पष्ट अहवाल सादर करावा असे निर्देश सदस्य सचिव यांनी दिले.

## 5. मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांनी केलेल्या बांधकामावर कारवाई करणेबाबत -

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांनी केलेल्या बांधकामावर कारवाई करणेबाबत मा. MoEF&CC, नवी दिल्ली यांनी निर्गमीत केलेले दिनांक 22/08/2022 रोजीचे निर्देश या कार्यालयाकडे मा. अवर सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडून दिनांक 25/08/2022 रोजीचे पत्रान्वये प्राप्त झाले आहेत.

सदर पत्राचे अनुषंगाने आयोजित जिल्हास्तरीय सागरी किनारा व्यवस्थापन समिती (DCZMA) च्या बैठकीमध्ये समितीचे मान्यतेने निर्णय घेण्यात आले असून संबंधीत सर्व अधिकारी/यंत्रणा यांना कार्यवाही करणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

### a) कार्यारंभ आदेशानुसार बांधकाम निष्कासनाबाबत –

मौजे मुरुड, ता. दापोली येथील गट क्र. 446 संदर्भात अन्य न्यायालयाकडील आदेश अथवा मा. दिवाणी न्यायालय, खेड यांचे न्यायालयात दाखल दावा क्र. 57/2021 चा अंतीम आदेश यांना अधीन राहून साई रिसॉर्ट एनएक्सचे बांधकाम निष्कासन करणेच्या कार्यवाहीबाबत निर्णय घेणेत येईल.

### b) पर्यावरणीय नुकसान भरपाईबाबत –

उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांनी दिनांक 14/02/2023 रोजीचे पत्रान्वये पर्यावरणीय नुकसान भरपाईची रक्कम जमीन महसूल वसूली म्हणून वसूल करणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केला आहे. श्री. अनिल परब व श्री. पुष्कर श्रीकृष्ण मुळये यांचे नांवे असलेल्या अन्य जमिनीचा/मालमत्तेचा शोध घेवून महसूल वसुली प्रमाणपत्र या कार्यालयाकडे सादर करणेबाबत उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांना या कार्यालयाकडील दिनांक 21/02/2023 रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले आहे. तसेच केलेल्या कार्यवाहीबाबत समितीस अवगत करणेबाबत मासिक बैठकीमध्ये निर्देश देण्यात आले होते.

उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांना या कार्यालयाकडील दिनांक 13/12/2023 रोजीचे पत्रान्वये संबंधितांच्या अन्य जमिनीचा/मालमत्तेचा शोध घेवुन महसूल वसुली प्रमाणपत्राचा प्रस्ताव सादर करणेबाबत कळविणेत आले आहे. सदर पत्राचे अनुषंगाने उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांजकडील दिनांक 15/12/2023 रोजीचे पत्र या कार्यालयाकडे प्राप्त झाले आहे. सदर पत्राचे अवलोकन केले असता जमीन महसूल वसुलीची कार्यवाही त्यांचे विभागाशी संबंधित नसलेबाबत या कार्यालयास कळविले आहे. जमीन महसूल वसुलीची कार्यवाही प्रदुषण विभागाशी संबंधित नसली तरी सदर वसुली करणेकामी सादर केलेल्या महसूल वसुली प्रमाणपत्र प्रस्तावामध्ये संबंधितांच्या जमिन मिळकतीची माहिती देणे आवश्यक असलेबाबत उपप्रादेशिक अधिकारी चिपळूण यांना अध्यक्ष यांनी सांगितले. तसेच पर्यावरणीय नुकसान भरपाईची रक्कम जमीन महसूल वसूली म्हणून वसूल करणेबाबत तहसीलदार दापोली/खेड यांचेमार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत संबंधित उपविभागीय अधिकारी यांनी समितीस अवगत करावे.

**c) <u>न्यायालयीन बाबींबाबत कार्यवाही –</u>**

**i) <u>मा. दिवाणी न्यायालय, खेड येथील दावा क्र. 57/2021</u>**

- **<u>मा. दिवाणी न्यायालय, खेड यांजकडील दिनांक 17/03/2023 रोजीचा आदेश -</u>**

मा. दिवाणी न्यायालय, खेड यांजकडील दिनांक 17/03/2023 चे आदेशाविरुध्द मा. जिल्हा व सत्र न्यायालय, खेड येथे दिवाणी किरकोळ अपील क्र. 08/2023 दाखल करणेत आले असुन सदर अपीलाची अंतीम सुनावणी दिनांक 04/11/2023 रोजी झालेली असुन अपील मान्य करणेत आले आहे.

- **<u>मा. दिवाणी न्यायालय, खेड यांजकडील दिनांक 04/11/2023 रोजीच्या आदेशाविरुध्द अपील -</u>**

मा. दिवाणी न्यायालय, खेड यांजकडील दिनांक 04/11/2023 रोजीच्या आदेशान्वये या कार्यालयामार्फत दाखल अपील मान्य करणेत आले आहे. सदर आदेश रद्द करणेबाबत श्री. सदानंद कदम यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. 14850/2023 दाखल केली असुन दिनांक 11/12/2023 रोजी प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले आहे. सदर याचिका Pre-admission वर असुन सुनावणीची पुढील तारीख दिनांक 11/01/2024 रोजी ठेवण्यात आली आहे.

- **<u>निशाणी-33 वरील अपीलबाबत -</u>**

मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, खेड यांजकडील निशाण 33 वरील दिनांक 11/10/2022 चे आदेशाविरुध्द फेरतपासणी अपील क्र. Writ Petition WPST 26447/2023 उपविभागीय अधिकारी दापोली यांनी दिनांक 26/09/2023 रोजी दाखल केले आहे. सदर रिट याचिका Pre-admission वर आहे.

- **हस्तांतरण अर्जाबाबत (Transfer Application) -**

मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, खेड यांचे न्यायालयात दावा क्र. रेमुनं. 57/2021 दाखल आहे. सदर दावा हस्तांतरीत करणेबाबत मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, जिल्हा न्यायालय यांचे न्यायालयात Civil M.A. 11/2023 अन्वये हस्तांतरण अर्ज दाखल करण्यात आला आहे. प्रतिवादी श्री. सदानंद गंगाराम कदम तर्फे ॲड. नेने हजर झाले आहेत. प्रस्तुत अर्ज प्रकरणी अर्जदाराच्या युक्तीवादावर प्रलंबित आहे. पुढील सुनावणीची तारीख दिनांक 09/01/2024 रोजी निश्चित करण्यात आली आहे.

- **<u>पुढील सुनावणी –</u>**

रेमुनं. 57/2021 दाव्यामध्ये वादीने निशाणी 62 वर म्हणणे देणेसाठी, निशाणी 81 वर युक्तीवादासाठी व पुराव्यासाठी पुढील सुनावणीची तारीख दिनांक 11/01/2024 रोजी निश्चित करण्यात आली आहे.

**ii) मा. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, पुणे येथील अर्ज क्र. 58/2021**

श्री. किरीट सोमय्या यांनी मौजे मुरुड, ता.दापोली येथील गट.नं 446 मधील बांधकामाबाबत 58/2021 अन्वये मा. राष्ट्रीय हरित लवाद वेस्टर्न झोन बेंच पुणे येथे दावा दाखल केला आहे. सदर दाव्याची सुनावणी दिनांक 02/05/2023 रोजी झाली असुन सदर दावा फेटाळून लावणेत (Dismissed) आला आहे.

**iii) मा. दिवाणी न्यायालय,खेड येथील दावा क्र. 12/2022**

मा. पर्यावरण, वन आणि जलवायू परिवर्तन मंत्रालय, एकात्मिक प्रादेशिक कार्यालय, नागपुर द्वारा श्री. सुरेशकुमार अडप्पा, शास्त्रज्ञ-डी यांनी मा. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, खेड यांचे न्यायालयात 1. श्री. अनिल दत्तात्रय परब, 2. साई रिसॉर्ट एनएक्स 3. सी कौंच रिसॉर्ट यांचे विरुध्द पर्यावरण (संरक्षण) कायदा अधिनियम 1986 मधील कलम 19 व 15 चे 7 अन्वये रेग्युलर क्रिमीनल केस नंबर 12/2022 अन्वये दावा दाखल केलेला आहे. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील क्रिमीनल रिव्हीजन अर्ज क्र. 11/2022 प्रलंबित असुन सदर अर्जावरील न्यायनिर्णय होईपर्यंत उक्त दावा अर्ज 12/2022 स्थगितीवर ठेवण्यात आलेला आहे. पुढील सुनावणीची तारीख दिनांक 30/01/2024 रोजी निश्चित करण्यात आली आहे.

**iv) मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील दावा क्र. 11125/2022**

मौजे मुरुड, ता. दापोली येथील सर्व्हे नं. 446 मधील साई रिसॉर्ट एनएक्स या रिसॉर्टचे सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत बांधकाम निष्कासीत करण्याबाबत सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल, मुंबई यांचेकडील दिनांक 31/01/2022 चे ज्ञापन व अंमलबजावणी पत्र दिनांक 22/08/2022 व उपविभागीय अधिकारी, दापोली यांचेकडील दिनांक 25/08/2022 चे पत्र रदद करण्याबाबत श्री. सदानंद गंगाराम कदम यांनी भारत सरकार व इतर यांचेविरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे Writ Petition No.11125/2022 दाखल केले आहे.

सदर दाव्यामध्ये अतिरिक्त मुद्दयांच्या अनुषंगाने प्रतिज्ञापत्र आणि Interim Application उपविभागीय अधिकारी दापोली यांचेमार्फत दिनांक 04/10/2023 रोजी दाखल करणेत आले आहे. पुढील सुनावणीची तारीख दिनांक 02/01/2024 रोजी निश्चित करण्यात आली आहे.

## 6. मौजे मुरुड, ता. दापोली येथील समुद्र किना-यावरील साई रिसॉर्ट एनएकस/ सी कौंच रिसॉर्ट यांनी सरकारी जमिनीवर अतिक्रमण करुन बांधकाम केलेबाबत व भूमिगत ड्रेनेज पाईपलाईन बाबत - डॉ. किरीट सोमैया यांचा तक्रारी अर्ज

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 लगत पश्चिम दिशेच्या समुद्रावरील वाळूवर केलेले अतिक्रमण म.ज.म.अ.1966 चे कलम 50(3) व कलम 53 नुसार दिलेल्या नोटीसप्रमाणे संबंधितांनी शासकीय जमिनीवरील अतिक्रमण हे मुदतीत काढून टाकलेले आहे.

मौजे मुरुड, ता. दापोली येथील गट नं. 446 च्या बाहेरील अतिक्रमण करण्यात आलेली शासकीय जमीन ही गाळाने तयार झालेली किना-यालगतची जमीन (Foreshore Land) आहे. सबब सीआझेड तरतूदींचे अनुषंगाने प्रशासकीय विभाग म्हणुन पर्यावरण (संरक्षण आणि संवर्धन) अधिनियम 1986 चे कलम 15(1) प्रमाणे फिर्याद दाखल करावी अगर कसे? याबाबत मार्गदर्शन मिळणेबाबत या कार्यालयाकडील दिनांक 18/01/2023 रोजीचे पत्रान्वये प्रस्ताव मा. संचालक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे त्यांचे अभिप्रायासह मा. शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे सादर करणेबाबत विनंती करण्यात आली आहे. तथापि अदयाप पर्यंत मार्गदर्शन प्राप्त झालेले नाही.

## 7. तत्कालीन मंडळ अधिकारी, मुरुड यांचेविरुध्द करण्यात आलेली कारवाई –

मा. जिल्हा पोलीस अधिक्षक, रत्नागिरी यांजकडील दिनांक २४/०३/२०२३ रोजीचे पत्रान्वये पोलीस निरीक्षक, दापोली पोलीस ठाणे यांजकडील दिनांक २०/०३/२०२३ रोजीचा अहवाल या कार्यालयास प्राप्त झाला आहे.

सदर अहवालाचे अवलोकन केले असता, पोलीस ठाणे दापोली यांचे येथे दाखल गुन्हा रजि. नं. १७७/२०२३ मध्ये श्री. सुधीर शांताराम पारदुले, तत्कालीन मंडळ अधिकारी मुरुड यांना आरोपी करण्यात आले असुन त्यांना दिनांक १५/०३/२०२३ रोजी अटक करण्यात आली होती. श्री. सुधीर शांताराम पारदुले, तत्कालीन मंडळ अधिकारी मुरुड यांची मा. न्यायालयाने दिनांक २०/०३/२०२३ रोजी जामीनावर मुक्तता केलेली आहे. श्री. पारदुले यांना शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

**<u>प्राप्त तक्रारींबाबत सर्वसाधारण सूचना</u>** –

१. प्रलंबित तक्रारी या ब-याच कालावधीपासून प्रलंबित असलेचे दिसून येते. तरी प्रलंबित तक्रारी अर्जांमध्ये तात्काळ स्थळपहाणी करुन सीआरझेड तरतूदींचे अनुषंगाने कार्यवाही करुन प्रकरणनिहाय अनुपालन अहवाल तात्काळ सादर करणेत येईल याकडे विशेष लक्ष पुरवावे.
२. मा. एमसीझेडएमए, मुंबई यांजकडून प्राप्त होणा-या प्रकरणांमध्ये तात्काळ कार्यवाही करावी.
३. न्यायालयीन स्तरावर प्रलंबित प्रकरणांची सदयस्थिती सादर करणेबाबत सर्व उपविभागीय अधिकारी यांना सांगण्यात आले. तसेच तपशिलामध्ये दाव्याची सुनावणीची पुढील तारीख व पुढील तारखेचे कारण नमुद करण्यात यावे.
४. न्यायालयीन स्तरावर प्रलंबित प्रकरणी अपिल दाखल करुन घेण्यात आले असल्यास अपिलाचा क्रमांक व सुनावणीची पुढील तारीख तपशिलामध्ये नमुद करण्यात यावी.
५. न्यायप्रविष्ट प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी यांनी पाठपुरावा करावा. तसेच सुनावणी तारखेस उपस्थित रहावे व दरमहा सदयस्थितीचा अहवाल कार्यालयास सादर करावा.
६. FIR दाखल प्रकरणांमध्ये सदयस्थितीचा अहवाल दर महाचे बैठकीपुर्वी सादर करणेबाबत सर्व उपविभागीय अधिकारी यांना सांगण्यात आले.
७. ज्या प्रकरणी नगर रचना विभाग/ भूमी अभिलेख विभागांचे अभिप्राय अपेक्षिलेले आहेत तथापी बराच काळ प्रलंबित आहेत, अशा प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी यांनी संबंधित विभागाची बैठक आयोजित करुन व पाठपुरावा करुन अहवाल प्राप्त होतील याकडे लक्ष पुरवावे.
८. अभिप्राय अपेक्षिलेल्या प्रकरणांमध्ये वेळोवेळी संबंधित विभागास स्मरणपत्र काढणेची कार्यवाही करणेबाबत उपविभागीय अधिकारी यांना सांगण्यात आले.

**<u>सीआरझेड क्षेत्रामधील अनधिकृत बांधकामाबाबत सर्वसाधारण सूचना</u>** –

१. सर्व्हेक्षणामध्ये आढळून आलेल्या बांधकामाची यादी तयार करुन त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पाठविणेत आलेल्या विहीत नमुन्यात माहिती सादर करावी.
२. सीआरझेड क्षेत्रात बांधकामे होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.
३. उपविभागीय अधिकारी यांनी त्यांचेस्तरावर संबंधित विभागाची मासिक बैठक घेवून आढावा घ्यावा.
४. अकृषीक परवानगी तसेच बांधकाम परवानगीसाठी आलेल्या अर्जांबाबत सहाय्यक संचालक नगर रचना विभागाचे अभिप्राय घ्यावेत. सागरतटिय क्षेत्रात येणा-या महानगरपालिका/नगरपालिका/ नगरपरिषदा/ग्रामपंचायत व इतर ठिकाणी कोणत्याही बांधकामास परवानगी देण्यापूर्वी महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटी किंवा केंद्रिय पर्यावरण व वन मंत्रालयाची पूर्व परवानगी प्राप्त असल्याची खातरजमा संबंधितांनी करावयाची आहे. पूर्व परवानगी नसताना सागरतटिय क्षेत्रात कोणत्याही कामांना अनुमती देण्यात येवू नये.

५. सागरतटिय क्षेत्रातील निवासी/ वाणिज्य बांधकाम प्रकरणांमध्ये नियोजनाचे अनुषंगाने सहाय्यक संचालक, नगर रचना, रत्नागिरी यांनी तात्काळ अभिप्राय सादर करावेत. तसेच दरमहा अहवाल सादर करावा.
६. सागरतटिय क्षेत्रातील निवासी/ वाणिज्य बांधकाम प्रकरणांमध्ये सीआरझेड परवानगीचे प्रस्ताव तात्काळ महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट अॅथोरिटीकडे उपविभागीय अधिकारी यांनी सादर करावेत. तसेच दरमहा अहवाल सादर करावा.
७. सीआरझेड व कांदळवनासाठी शासनाने दिलेल्या आदेशाचे पालन करावे.
८. सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत/विनापरवाना बांधकाम प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत भूमी अभिलेख विभागाकडे मोजणीसाठी पाठविण्यात येणा-या प्रकरणांमध्ये भूमी अभिलेख विभागाने शासकीय मोजणी करुन दयावी.

वरीलप्रमाणे विचारविनीमय/चर्चा करुन जे निर्णय सर्वानुमते घेण्यात आले त्याबाबत आणखी काही शंका असल्यास त्यांचे निरसन सर्वानुमते करणेसाठी त्या उपस्थित करणेबाबत समिती सदस्य व संबंधित विभाग/यंत्रणा यांना विचारणा करण्यात आली असता कोणीही शंका उपस्थित केली नाही.

पुढील बैठकीस जे सदस्य असतील त्यांनी बैठकीस उपस्थित राहणेचे असून प्रतिनिधी पाठवू नयेत तसेच बैठकीस उपस्थित राहता येणे शक्य नसल्यास अध्यक्ष यांची पुर्वपरवानगी घेणेची आहे अशा सूचना सदस्य सचिव यांनी दिल्या.

उपस्थितांचे आभार व्यक्त करुन बैठक समाप्त झालेचे सदस्य सचिव तथा निवासी उपजिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी जाहीर केलेवरुन बैठक समाप्त करण्यात आली.

**स्थळप्रत मा. जिल्हाधिकारी**
**यांच्या स्वाक्षरीची.**

**(चंद्रकांत सुर्यवंशी)**
सदस्य सचिव, सागरी किनारा व्यवस्थापन समिती,
रत्नागिरी तथा निवासी उपजिल्हाधिकारी

क्र. महसूल/कार्या/अे.के. ६/DCZMA/११-१२/२०२३
जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
दिनांक - ०२/०२/२०२४

प्रतिलिपी - सर्व संबंधितांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी